मुंबई ते कलकत्ता



विठ्ठल नारायण शिरोळे

मोटारनें

मुंबई ते कलकत्ता

लेखक

विठ्ठल नारायण शिरोळे

शके १८६०] किंमत ६ आणे [सन १९३८

प्रकाशक
केशव नारायण शिरोळे,
बी. ए., बी. टी.
हेडमास्तर, श्रीशिवाजी मराठा हायस्कूल, पुणें २.

मुद्रक
शंकर रामचंद्र दाते,
अ. वि. गृहाचा लोकसंग्रह छापखाना,
६२४ सदाशिव पेठ, पुणें २.

प्रस्तावना

प्रवासाची हौस आपल्या लोकांमध्यें कमी दिसून येते. 'आपण बरे व आपलें घर बरें' हीच प्रवृत्ति सर्वत्र दिसून येते. प्रवास करणारांमध्यें दुसऱ्याकरितां प्रवासवर्णनें लिहिणारे तर फार थोडे. परक्या देशाला भेट देण्यापूर्वी स्वदेशामध्यें पाहण्यासारखें काय आहे हें अगोदर पाहणें जरूर आहे. नाना प्रकारचे लोक, भिन्न प्रकारचें हवामान, विविध प्रकारचे प्राणी, फळें, फुलें, वनस्पती ज्या हिंदुस्थान देशांत सांपडतात त्या हिंदुस्थान देशांत पाहण्यासारखें असें किती तरी आहे ! देशपर्यटण हें खर्चाचें काम आहे. ज्यांचे हातीं पैसा तेच लोक हें कार्य हातीं घेऊं शकतील. सुखाचा जीव उगीच संकटामध्यें घालणारे धनिक किती सांपडतात ? श्री. राजारामशेट राउतांसारखे फिरतीची दगदग हौसेनें सोसणारे धनिक फारच विरळा ! त्यांनीं आपल्या मित्रमंडळीबरोबर प्रवास करून आपण मिळविलेली माहिती इतरांकरितां प्रसिद्ध करविली हें त्यांना भूषणास्पद आहे.

प्रवासाचें वर्णन तपशीलवार देण्यांत आल्यामुळें मनोरंजक व उपयुक्त झालें आहे. जणूं काय आपणच हा प्रवास करीत आहों, असा क्षणभर भास होतो. मुंबई ते कलकत्ता, मुंबई ते दिल्ली असे प्रवासवर्णन करण्याविषयींचे प्रश्न हायस्कूलच्या मुलांना विचारण्यांत येतात. परंतु प्रत्यक्ष कोणताही प्रवास न घडल्यामुळें व प्रवासवर्णनें न वाचल्यामुळें रेल्वेरस्त्यावर असलेल्या कांहीं स्टेशनांचीं नांवें देण्यापलीकडे मुलांना कांहींही करतां येत नाहीं. प्रवासवर्णनांच्या पुस्तकावरून मुलें भूगोलाचें बरेंच ज्ञान मिळवूं शकतील व तें तीं विसरणारही नाहींत.

फिरतीचा गोड अनुभव उपभोगीत असतां बारीकसारीक माहिती टिपून, ती एकत्रित करून, तिला सुसंघटित कथेचें स्वरूप दिल्याबद्दल लेखक रा. विठ्ठलराव शिरोळे यांचें आम्ही अभिनंदन करतों.

पुणें शहर
ता. २४।४।३८

बा. ग. जगताप

प्रवासानंतर

" The world is a great book, of which they that never stir from home read only a page. "

—*St. Augustine*

आपण ज्या ज्या नवीन उपयुक्त गोष्टी प्रवासामध्यें पाहतों, त्या आपल्या मित्रांस व इतरांस केव्हां सांगून टाकूं, अशी प्रबळ उत्कंठा, प्रवासानंतर वाटूं लागते. म्हणून प्रवासाचें वर्णन पुस्तकरूपानें सादर करीत आहें. प्रवासापासून होणारे तोटे व फायदे नुसते आपण वाचतों व ऐकतों; परंतु प्रवास केल्यावर त्यांचा अनुभव आपल्या प्रत्ययास येतो.

हिंदुस्थान देशामध्यें, प्रवास करून पाहण्यासारखें इतकें आहे कीं, तें पाहण्यास आपणांस आपलें आयुष्य अपुरेंच पडेल. हिंदुस्थान देश, म्हणजे परमेश्वराच्या आगाध लीलेचा उत्कृष्ट नमुनाच होय. त्यांत उत्तम अशा मानवी कलावंतांनीं आपल्या कलाकौशल्याची भर टाकून, तो जास्तच सुशोभित केला आहे. उत्तरेकडील हिमालयाच्या गौरीशंकर शिखरापासून ते दक्षिणेकडील कन्या कुमारीपर्यंत, पश्चिमेकडील कराची बंदरापासून ते पूर्वेकडील जगन्नाथपुरीपर्यंत, गगनचुंबित पर्वत, काळेंकुट्ट व करड्या रंगाचे कडेपठार, नद्या, ओढे, नाले, हिरवींगार शेतें व अफाट कुरणें, तसेंच किल्ले, ताजमहाल, गोलघुमट, गोपुरें, व विपुल देवळें यांनीं हिंदुस्थान नुसता भरलेला आहे. अनेक वर्णांचें, भिन्न भिन्न धर्मांचें, पंथांचें, तसेंच नानातऱ्हेच्या जातींचे, भाषांचे व चालीरीतींच्या लोकांचें हें माहेरघरच आहे. अशा या भारतभूमीचें निरीक्षण अवश्य करावयास पाहिजे.

प्रवास करण्याची संवय अजून आपल्या लोकांमध्यें रूढ झालेली नाहीं. पैसा लागतो, परंतु आजकाल प्रवासाचीं साधनें विपुल झालेलीं आहेत व सोयीही पुष्कळ उपलब्ध आहेत. त्याचा फायदा प्रत्येकानें घेऊन, सुट्टींतील काळाचा विनिमय प्रवासरूपानें योग्य तो करून, आपल्या मातृभूमीची सर्व माहिती घ्यावी.

श्री. राजाराम बा. राऊत यांच्या साहाय्यानें हा प्रवास घडला असून, हें छोटें पुस्तक, त्यांच्या साहाय्यामुळेंच बाहेर येत आहे. त्याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी आहें.

प्रस्तुत पुस्तकास ती. बा. ग. जगताप यांनीं प्रस्तावना लिहून मला उपकृत केलें आहे.

गु. अजगांवकर, माझे मित्र श्री. कानेगांवकर, लोकसंग्रह छापखान्यांतील श्री. न. वि. सरदेशपांडे, आनंद कार्यालयाचे चालक, कोहिनूरचे मालक श्री. देशपांडे, माझे बंधु चि. केशवराव शिरोळे व चि. जयवंत जगताप, या सर्वांनीं जी वेळोवेळीं मदत केली त्याबद्दल मी त्यांचा व्यक्तिशः फार आभारी आहें.

प्रवासवर्णनाचीं पुस्तकें, मराठी वाङ्मयांत तुरळक आढळतात, व तीं वाचण्याची गोडीही अल्पच दिसते; याला निरनिराळीं कारणें असूं शकतील. असा रुक्ष वाटणारा विषय, मनोरंजक करण्याचे प्रयत्न मी सदर पुस्तकांत केलेले आहेत. प्रस्तुतचा प्रयत्न प्रथमचा असल्यामुळें, वाचकांनीं तो गोड करून घ्यावा अशी विनंति आहे.

१२४८ शुक्रवार पेठ,
पुणें शहर

आपला
विठ्ठल नारायण शिरोळे

मुंबई ते कलकत्ता

ती संध्याकाळची वेळ होती. घरीं येण्यास मला उशीर झाला. घरीं आल्याबरोबर मला तार मिळाली. ती वाचून मी पुढील तयारीस लागलों. पुढील म्हणजे शेवटच्या नव्हे; प्रवासाचें सामानसुमान वगैरे घेण्याच्या! तार पुन्हां वाचून पाहिली. तारेच्या शेवटीं माझ्या परम स्नेह्याची 'राजाराम' ही सही होती. श्री. राजाराम बाळकृष्ण राऊत हे माझे बालपणचे मित्र असून मुंबई नगरांतील एक श्रीमान् व उदार गृहस्थ आहेत.

रात्रीच्या गाडीनें पुण्याहून निघून मी मुंबईस सकाळीं पोहोंचलों. प्रवासास लागणाऱ्या वस्तूंची यादी व सामान यांची तयारी करून ठेविली होतीच. मुंबई ते कलकत्त्याची सफर आम्ही मोटारनें केली. आतां आम्ही म्हणजे कोण? 'आम्ही' या शब्दामध्यें पुढील प्रवाश्यांचा समावेश झालेला आहे. (१) रा. राजाराम बाळकृष्ण राऊत. (२) रा. सुमंतराव देसाई. (३) रा. नारायणराव नाखवा. (४) रा. विठ्ठलराव शिरोळे. (५) जोसेफ ड्रायव्हर.

आम्ही निघालों तो दिवस बुधवार असून इ. स. १९३३ डिसेंबरची २७ तारीख होती. त्या दिवशीं दुपारीं ३–३० वाजतां आम्ही मुंबई सोडली. ठाणें येथें आम्हास नारायणराव नाखवा येऊन मिळाले. ठाण्याहून आम्हीं मोठ्या उत्साहानें व आनंदानें सफरीचा कार्यक्रम आक्रमण करण्यास सुरुवात केली. प्रवास ज्या मोटारीनें केला ती 'फियाट' जातीची असून, X 7196 हा तिचा नंबर आहे. प्रवासांत पहिला मुक्काम कोठें करावयाचा हें आम्हीं ठरविलें नव्हतें. बरोबर गाईड घेतलें होतें, तें उघडून मालेगांव येथें रात्रीचा मुक्काम करण्याचें ठरविलें. मोटारीचा वेग वाढत चालल्यामुळें वारा जोरानें वाहूं लागला. विश्रांति घेण्याकरितां भगवान् सूर्यनारायण आपल्या घरीं आपले मावळते सोनेरी किरण पसरून परतूं लागला, पक्षी

आपल्या घरट्यांकडे लगबगीनें धावूं लागले. रस्त्यांतून गुराख्यांचीं पोरें गुरांना शेतांतून घराकडे घेऊन चाललीं. इतक्यांत आमची मोटार थांबली. ड्रायव्हरखेरीज आम्ही सर्व आश्चर्यचकित होऊन पाहूं लागलों तों एक माणूस तांबडें निशाण हातांत घेऊन दत्त म्हणून उभा. तो टोल-नाक्यावरचा टोल घेणारा मनुष्य होता. झालें, टोलबाजीस सुरुवात झाली. सबंध प्रवासामध्यें मुंबई इलाख्याइतका टोल आम्हीं कोठेंच दिला नाहीं. त्यामुळें खर्चाच्या दृष्टीनें मुंबई ते खानदेश प्रांत ओलांडीपर्यंत प्रवास आम्हांस फारच महाग पडला. वाटेंत एकंदर ३६ टोलनाकीं लागलीं. एवढा टोल देऊन रस्ते पाहावे तर ते फारच वाईट स्थितींत आहेत. असो;

ठाणें सोडल्यावर आम्ही आमचा पुढील मार्ग आक्रमण करूं लागलों. वाटेंत पुष्कळशीं खेडीं लागलीं. खेड्यांतील राहणी अर्थात् खेडवळ व मागासलेल्या स्थितींत होती. शेतकरी आपले गुरांचे कळप घेऊन शेतावरून दमूनभागून आलेले दिसत. त्यांच्या पेहरावावरून अठरा विश्वे दारिद्र्याची छटा त्यांच्या एकंदर राहणीवर पसरलेली दिसत होती. वाटेंत शेवंडी, खारडी व इतर बरींच खेडीं लागलीं. रेल्वे लाईन रस्त्याच्या बाजूनें गेल्यामुळें, एके ठिकाणीं आमचा एक तास फुकट गेला. रेल्वे लाईन ओलांडून आम्हांस जावयाचें होतें. परंतु पंजाब मेल जाणार असल्यामुळें व मालगाडीचे डबे त्या ठिकाणीं जोडीत असल्याकारणानें, आम्हांस बराच वेळ फाटकाजवळ थांबावें लागलें. आमच्या मोटारीच्या मागें ख्रिसमसची मजा मारून, दारूनें तर्र झालेल्या एका अँग्लो इंडियनची मोटार येऊन थडकली. त्यानें पोर्टरास मोठ्यानें हाक मारून फाटक उघडण्यास सांगितलें. नुसतें सांगितलेंच नाहीं, तर दहा पंधरा शिव्याही हांसडल्या. बिचारा पोर्टर, हुकुमाचा ताबेदार, त्यानें साहेबांनीं वाहिलेली पुष्पांजली शांतपणें सहन केली. फाटक उघडत नाहीं असें पाहतांच साहेबांचा क्रोधाग्नि भडकूं लागला व ते अद्वातद्वा बोलूं लागले. इतक्यांत त्यांच्या छोट्या चिरंजीवास शौचास लागलें, त्यामुळें साहेबास दांतओंठ खात गप्प बसावें लागलें. फाटक उघडल्यावर आमची मोटार वेगानें चालू लागली, त्यामुळें साहेबास बराच धुराळा खावा लागला. इतक्यांत तांबडें निशाण व आमची गाडी उभी! ही संधि साधून, साहेबानें आपली गाडी पुढें काढली, व मोठ्यानें

हांसत व आम्हांस खिजवीत साहेब पुढें चालू लागले. आम्हीं थोडा वेळ थांबून साहेबाच्या गाडीस गांठलें. तेथेंही फाटक बंद असल्यामुळें साहेबास नाइलाजास्तव थांबावें लागलें. आम्ही तेथें न थांबतां, टान्सा तलावाच्या रस्त्यानें साहेबांच्या पुढें गाडी काढली. अशा रीतीनें आमची गाडी पुढें गेलेली पाहून साहेब मनांत बरेच विरमले असावेत. या वेळीं आम्ही ठाणें जिल्हयांतून प्रवास करीत, सृष्टीची शोभा पाहात वेगानें चाललों होतों.

सह्याद्रीचीं अभेद्य गगनचुंबित शिखरें, त्यांमधून ओढे नाले मंद गतीनें उड्या टाकीत वाहात चाललेले, मोठमोठ्या वृक्षांचे थवे हिरव्या पानांनीं फुलून वाऱ्यामुळें हलत असल्यामुळें, हा देखावा फारच प्रेक्षणीय दिसत होता. वारा सारखा सों सों करीत जणुं काय आमच्या मोटारगाडीबरोबर शर्यतीची पैज घेऊन, आमच्याबरोबर मोठ्या वेगानें वाहात होता. सृष्टिसुंदरी पिवळ्या ठिपक्यांचा हिरवा शालू नेसून आम्हांस प्रवासास उत्तेजन देत होती. ही सर्व शोभा पाहण्यांत आम्ही दंग होऊन, त्या विश्वचालकाच्या लीलेचें मोठ्या आनंदानें कुतूहल करीत रात्रीं ८ चे सुमारास इगतपुरीस येऊन पोहोंचलों. तेथें आल्यावर स्टेशनवरील बाररूममध्यें आम्ही आमचें जेवण उरकलें. आमच्यामध्यें वयानें वृद्ध असलेले नारायणराव नाखवा यांस आमच्या बरोबर जेवतां आलें नाहीं. कारण, त्यांस एकादशी होती. इगतपुरी हें जी. आय. पी. रेल्वेचें एक मोठें स्टेशन असून, व्यापाराची पेठ आहे. त्या ठिकाणीं फौजदार कचेरी आहे. हवा उत्तम असल्यामुळें तें एक हवेचें उत्कृष्ट ठिकाण गणलें गेलें आहे. रात्रीं सुमारें नऊ वाजतां आम्ही पुढच्या प्रवासास सुरुवात केली. आम्ही निघणार तोंच पोलिसांतले एक गृहस्थ, आपणास पांच मैलांवर सोडा म्हणून विनवूं लागले; तेव्हां त्यांस, मोटारींत आपणास उभें राहवें लागेल असें आम्हीं सांगितलें. ते मोठ्या खुषीनें तयार झाले. त्यांनीं गप्पा मारीत ५ मैलांची मजल केव्हांच पुरी केली व आमचे मनःपूर्वक आभार मानले.

रात्रीचा वेळ. नीलवर्ण आकाशांत तारे चमकत होते. चंद्राचा आल्हादकारक प्रकाश पसरला होता, म्हणजे ती चांदणी रात्र होती, थोड्या वेळानें आमच्या मोटारीचा आवाज ऐकूं येऊं लागला, म्हणून आम्ही मोटार उभी केली. पाहतों तों टाकींतून पाणी गळत होतें. त्यामुळें प्रत्येक १०–१२ मैलांनंतर ओढ्यांतून आम्हांस पाणी घ्यावें लागलें, ठिकठिकाणीं पाट्या

लाविल्या असल्यामुळें आम्ही रस्ता चुकलों नाहीं. इकडच्या तिकडच्या गप्पा मारीत आम्ही चांदोरघाटापर्यंत जाऊन पोहोंचलों. हा घाट लहान असला तरी चढण्यास जरा अवघड आहे. चांदोरघाटाच्या पायथ्याशीं लहानसें चांदोर खेडें आहे, म्हणून या घाटास चांदोरघाट म्हटलें आहे.

घाट चढून गेल्यावर थोड्या वेळांत आम्हांस नाशिक शहर लागलें. रात्रीची वेळ असल्यामुळें नाशिक येथें आम्हीं पेट्रोल घेऊन मालेगांवचा रस्ता धरला. नाशिकहून मालेगांव ६८ मैल आहे. गोदावरी नदी ओलांडून जातांना बरीच थंडी वाजूं लागली. रात्रौ १२ ला मालेगांव शहरीं आम्ही पोहोंचलों. मालेगांवास आमचे एक मित्र राहतात, त्यांच्याकडे मुक्काम करण्याचें ठरलें. त्यांचें नांव कोटणीस वकील. शहरांत शिरतांच एक दोन गृहस्थांस त्यांचा पत्ता आम्हीं विचारला; परंतु त्यांनीं भलतेच रस्ते दाखविल्यामुळें आमची बरीच फसगत झाली. रात्रीचे बारा बाजून गेल्यामुळें मालेगांव शहरांत जिकडे तिकडे शांतता होती. त्या वेळेस मुसलमान लोकांचे रोझे चालू असल्यामुळें रस्त्यांत त्या लोकांची ये जा सुरू होती. त्यांना वकीलसाहेबांचा पत्ता विचारून शेवटीं एक तासभर फिरल्यावर त्यांचें घर आम्हीं शोधून काढिलें. बिचारे वकील, कोर्टांतील कामकाज करून दमल्यामुळें स्वस्थ झोंपले होते. आमची हाक ऐकून, कदाचित् एकादें कूळ आलें असेल या समजुतीनें ते धडपडून उठले, व कोण आहे म्हणून त्यांनीं घराचा दरवाजा उघडला. श्री. राऊत यांस पाहतांच आश्चर्यचकित मुद्रा करून, "अरे, तुम्ही इकडे कोठें ? आणि आणखी कोण कोण आले आहेत ?" वगैरे प्रश्न त्यांनीं विचारले. वकीलसाहेबांस आमच्यापैकीं एकजण थट्टेनें म्हणाले, " काय वकीलसाहेब, एकादें कूळच आलें असें तुम्हांस वाटलें असेल ना ? " "तसें मुळींच नाहीं" असें म्हणून वकीलसाहेब चहाच्या तयारीस लागले. वकीलसाहेब म्हणजे खरोखरच फार भले माणूस. चहा घेतांना आम्ही आमच्या सफरीचा इतिहास त्यांस सांगितला. नंतर रात्र बरीच झाल्यामुळें आम्ही झोंपण्यास गेलों. एका दमांत १६७ मैलांचा प्रवास केल्याबद्दल आम्हास आमचें मोठें कौतुक वाटलें. एकंदर प्रवासाच्या दृष्टीनें आम्हीं १/१० देखील प्रवास पुरा केला नव्हता. असो; ढेकणांनीं इतका त्रास दिला कीं, सर्व रात्र झोंपेशिवाय काढणें भाग पडलें.

मालेगांव

मालेगांव येथें झालेला आमच्या प्रवासाचा हा पहिला टप्पा होय. रस्त्यानें मुंबईहून मालेगांव १६७ मैल आहे. गुरुवारीं २८-१२-३३ ला सकाळीं उठून गाडींतून पाणी गळत असलेल्या जागीं डाग लावण्यास ड्रायव्हर यास पाठवून दिलें. इकडे वकीलसाहेबांनीं फलाहार आणला, व करमणुकीसाठीं फोनोही लाविला. वकीलसाहेबांजवळ चांगल्या प्लेटींचा बराच संग्रह आहे. त्यांनीं सरतेशेवटीं एका महाराची नक्कल असलेली प्लेट लाविली. ती प्लेट मालेगांवच्या लोकांस फार आवडते असें ते म्हणाले. ती प्लेट लावल्याबरोबर १-२ मिनिटांनीं आम्हीं ती त्यांस बंद करण्यास सांगितलें; कारण तेवढयांतच आम्ही अगदीं संतुष्ट होऊन गेलों. थंडी फार म्हणून आम्हीं मालेगांवीं गरम कानटोप्या खरेदी केल्या, आणि साखर व तूप विकत घेऊन गांव पाहात पाहात परत मुक्कामीं आलों. मालेगांव साधारण मोठें गांव असून व्यापारी दृष्टीनें त्यास फार महत्त्व आहे. शहरांत वस्ती हिंदु व मुसलमान यांची आहे; परंतु मुसलमान बहुसंख्यांक आहेत. रस्त्यांची मांडणी बरी आहे; परंतु ते फार अरुंद आहेत. घरें मोठीं व मोठमोठ्या तुळयांनीं बांधलेलीं; गांवाजवळ लहानशी नदी असून नदीकांठीं मार्केट आहे. त्याचप्रमाणें धर्मार्थ दवाखाना व भुईकोट किल्ला असून तालुक्याच्या कचेऱ्या आहेत. वकील लोकांची एक निराळी पेठच आहे. निरनिराळ्या गांवांस जाण्यास मोटार स्टँड असून तेथें मोटारी मिळू शकतात. फळफळावळ व सर्व तऱ्हेच्या भाज्या मुबलक मिळतात. आम्ही सर्व शहर पाहून, वकीलसाहेबांचा सकाळीं सुमारें १० ला निरोप घेतला. निघतांना पेट्रोल गाडींत भरलें. पेट्रोलचा भाव १ रु. ८ आ. होता. शहरांतून बाहेर पडल्यावर आम्ही आमच्या रस्त्यास लागलों. आम्ही ज्या रस्त्यानें प्रवास करीत होतों, त्यास मुंबई-आग्रा रोड म्हणतात. दहा मैलांवर जातों तोंच पुन्हां तांबडें निशाण! दुसरा मुक्काम इंदूर येथें करण्याचें ठरविलें. मालेगांव ते इंदूर रस्त्यावर आर्वी, धुळें, वगैरे गांवें लागलीं. धुळें येथें प्रवाश्यांकरितां डाक बंगला आहे. धुळें सोडल्यानंतर शिरपूर येथेंसुद्धां प्रवाश्यांकरितां डाक बंगला आहे. शिरपूरपुढें गोरगंध, सेंडवा, खरमपूर या तिन्ही गांवीं डाक बंगले

आहेत. आम्ही या बंगल्यांचा उपयोग केला नाहीं. खरमपुरानंतर तिकरी, गुजरी, मानपूर, महू व इंदूर वगैरे गांवें लागलीं.

मालेगांव ते इंदूर हें अंतर १८६ मैल आहे. मालेगांव ते धुळें ३१ मैल, धुळें ते सोनगीर १३ मैल, सोनगीर ते शिरपूर, शिरपूरहून जुलवानिया. जुलवानिया येथें पेट्रोल घेतलें. पेट्रोलचा भाव १ रु. १५ आ. होता. या ठिकाणीं सेंट्रल इंडिया व ग्वाल्हेर येथें व्यापार करणारी कंपनी आहे. सोनगीरहून मोहू ११६ मैल आहे.

आमचा हा प्रवास पश्चिम खानदेशमधून चालला होता. लोक साधारणतः सशक्त व शिक्षणांत मागासलेले, राहणी अजागळासारखी; अंगावर कपडे मात्र भरपूर, कारण कापूस फार पिकतो. मालेगांव ते इंदूरच्या वाटेंत हजारों कापसाच्या गाड्या व शेंकडों जिनिंग मिल्स आढळतात. कापसाचा व्यापार फार चालतो, व त्यामुळें मालाची नेआण सारखी चालल्याकारणानें प्रवाश्यास फार त्रास होतो. गाडीवान आपली बैलगाडी कोणत्याही बाजूनें लहर येईल त्या दिशेनें हांकलीत जातो. लोकांचा मुख्य धंदा शेतकीचा. जमीन सुपीक असून कापसाचें व ज्वारीचें पीक भरपूर येतें. खानदेशांत सृष्टिसौंदर्य क्वचितच पाहण्यास मिळतें. प्रदेश रुक्ष व रखरखीत वाटतो. येथील मराठी भाषा कांहीं औरच. "काय रं, व नाहीं रं बापा; कोण भाऊ," हे शब्द वारंवार ऐकूं येतात. लोक फार मवाळ व नम्र. आमची मोटारगाडी पाहून व आमचा एकंदर साहेबी थाट पाहून, त्यांस मोठें नवल वाटे, व ते आम्हांस मोठ्या अदबीनें मुजरा करीत. जणुं काय आम्ही कोणी तरी मोठे अधिकारी किंवा संस्थानिकच आहोंत. खानदेशच्या उत्तरेस सातपुड्याचे डोंगर व दक्षिणेस सातपाळा किंवा अजिठ्यांचे डोंगर आहेत. पूर्वेकडील भागांत कांहीं लहान लहान डोंगरांच्या ओळी आहेत. अशा एका डोंगराच्या पायथ्याशीं आम्हीं दुपारीं ३–३० ला मोटार उभी केली.

डोंगराची उतरण उतरून व मालेगांव सोडून जवळ जवळ चार पांच तास झाल्यामुळें व भुकेची छटा सर्वांच्या तोंडावर दिसूं लागल्यामुळें विश्रांतीसाठीं आम्हीं ही मोठी रम्य जागा शोधून काढिली होती. ही जागा खरोखरच रम्य होती. चोहों बाजूंनीं डोंगरांचे सुळके, जिकडे तिकडे

हिरवीगार दाट झाडी, व त्यामधून शुभ्र स्फटिकासारखा आनंदानें उड्या मारीत व खळखळा गाणें गात वाहणारा तो चिमकुला ओढा, मधून मधून डोकावणारे ते रविकिरण, सूं सूं आवाज करीत वाहणारा वारा, व त्याला टीव टीव टो टोचा ध्वनि करून साथ करणारे पक्षिगण वगैरे देखावा पाहून, आलेला शीण एका क्षणांत नाहींसा झाला. ओढ्याच्या कांठीं आम्हीं आमचें चहाचें व खाण्याचें साहित्य काढिलें. तोंड, हात, पाय वगैरे धुऊन खाद्य तयार करण्याच्या तयारीस लागलों. एकानें स्टोव्ह पेटविला, दुसऱ्यानें पाणी आणिलें, तिसरे व चौथे फराळाच्या तयारीस लागले. स्वतःच्या हातानें बनविलेला चहा व त्याबरोबर लोणी लावलेले पावाचे तुकडे, त्या रमणीय जागीं फार रुचकर लागत होते. अधाशाप्रमाणें बरोबर आणलेल्या पावांचा आम्हीं फडशा उडविला. अशा रीतीनें एक तास विश्रांति घेऊन आम्ही आमच्या मार्गास ४–३० ला लागलों.

हा खानदेश जिल्ह्याचा पश्चिम भाग उंचवट्याचा व त्यांत दाट झाडी असून, त्यामध्यें भिल्ल लोक राहतात. शेतकी हा लोकांचा मुख्य धंदा आहे. वाटेंत पुष्कळसे भिल्ल लोक पाहण्यास मिळतात. त्यांचा पेहेराव विचित्र असतो. डोक्यास फाटकें तुटकें मुंडासें, त्यांतून केसांत लांब लांब झुबके सुटलेले, अंगांत फाटकासा अंगरखा व गुडघ्यापर्यंत धोतर व पायांत एक कडें. भिल्ल लोक काळ्या वर्णाचे असून रागीट व उग्र दिसतात. गुरांचे कळपच्या कळप घेऊन ते सतत हिंडत असतात. फार प्राचीन काळीं, ज्या मनुष्याजवळ जनावरांचीं खिल्लारें फार, तो फार श्रीमान् मानला जाई. त्याची आठवण, आम्हास खानदेश प्रांतांतून जातांना, ते गुरांचे कळप पाहून झाली. नाना प्रकारचे डिंक व सागवानी लाकूड यांचें या प्रांतांत मुख्य उत्पन्न आहे.

आमच्या गाडीच्या झंझावातामुळें, झाडांचा झडलेला निर्जीव गळाठा उंच उंच उडे व त्यामुळें जनावरें बुजत. त्याचप्रमाणें हिरव्या व पिकलेल्या बोरांनीं भरलेलीं बोरीचीं झाडें दुतर्फा दिसत होतीं. अशा रीतीनें सातपुडा डोंगरावरील सृष्टिसौन्दर्य पाहात पाहात आम्ही तापी नदीपर्यंत आलों. तापी नदीवर नवीन रस्ता बांधलेला असून, आम्ही सुमारें दीड फर्लांग पहिल्या रस्त्यानें गेल्यावर आमची चूक आमच्या लक्षांत येऊन आम्ही मागें

परतलों व नव्या रस्त्यानें तापी नदीवरील पूल ओलांडण्यास सुरुवात केली. तापी नदीवरील हा पूल नुकताच बांधिला आहे. पूल सर्व दगडांनीं बांधिला आहे. पुलाची लांबी सुमारें एक मैल असावी. या पुलामुळें व्यापार व दळणवळण यांची चांगली सोय झाली आहे. या पुलावरून जाणाऱ्या प्रत्येक प्राण्यावर व वाहनावर कर बसविला आहे. टुरिंग मोटार गाडीस २ रुपये, लॉरीस ४ रुपये, बैलगाडीस ८ आणे, उंटास ८ आणे, घोड्यास ४ आणे, शेळीस २ आणे व माणसास ३ पै याप्रमाणें टोल द्यावा लागतो. दिवसांतून जितके वेळां माणसें, ज़नावरें व वाहनें जातील तितके वेळां टोल द्यावा लागतो. पुलाच्या दोन्हीं तोंडावर टोल नाकीं आहेत. तेथें जातांना किंवा येतांना टोल दिल्याची जी पावती मिळते, ती परत द्यावी लागते.

तापी नदीचा उगम सातपुड्यांत बैतुलाजवळ होतो व ती पश्चिमेकडे वाहात जाऊन खंबायतच्या आखातास सुरतेजवळ मिळते पूल ओलांडल्यानंतर नवीन रस्ता फार चांगला असून, रस्त्याच्या दुतर्फा ज्वारीचीं, गव्हाचीं शेतें लागतात. ठिकठिकाणीं शेतें, रस्त्यांतून भरगच्च भरलेल्या गाड्या, गुरांचे कळप दृष्टीस पडतात. तापी ओलांडल्यानंतर शिरपूर लागतें. शिरपूरहून जुलवानिया येथें आम्ही गेलों. सातपुड्याच्या उंच उंच टेकड्यांतून प्रवास करावा लागला. जुलवानियांतून खारपूर व राजपूर या ठिकाणीं जाणारे रस्ते फुटतात. पुढें नर्मदा नदी लागते. तेथें ८ आणे देऊन नर्मदेचा पूल ओलांडला. पुढें तीन चार मैलांवर आम्हांस कालघाट (Khal Ghat) लागला. तेथून दोन फर्लांग गेल्यावर मुंबई इलाख्याची हद्द संपून इंदूर संस्थानची हद्द लागते.

टोलबाजी एकदांची टळली म्हणून आम्ही सुटकेचा उच्छ्वास टाकला. इतक्यांत इंदूर १०९ मैल आहे असें दाखविणारा पांढरा दगड व इंदूर स्टेटची हद्द सुरू झाली असें दाखविणारी पाटी दिसली. कालघाट साधारण अवघड असून, त्यांतील रस्ते फारच चांगले आहेत. कालघाट उतरल्यावर महेश्वर, मानपूर हीं गांवें लागतात. टोल न घेतां इंदूर सरकारनें रस्त्याची व्यवस्था फारच उत्तम ठेविली आहे. मुंबई इलाखा सोडून आम्ही मध्य हिंदुस्थानांत प्रवेश केला. महूचा घाट उतरून रात्र बरीच झाली होती; म्हणजे ८ वाजले होते. म्हणून आम्ही इंदूरपासून १२ मैलांवरील

मह्रू शहरीं पोहोंचलों. मह्रू येथें इंग्रजांची छावणी आहे. आम्हीं छावणींत प्रवेश केला, व तेथील शीख शिपायांस इंदूरचा रस्ता विचारीत विचारीत चाललों. या वेळीं गाडी ताशीं १० मैलांच्या वेगानें चालली होती. येथें एक गोष्ट सांगण्यास विसरलों. आम्ही आमच्या बरोबर दोन बंदुका घेतल्या होत्या, त्या काढून व थोड्या गोळ्या खिशांत घालून आमच्यापैकीं रा. सुमंतराव देसाई हे एका बाजूस व नारायणराव नाखवा हे दुसऱ्या बाजूस बंदुका घेऊन बसले होते. यदाकदाचित् भिल्लांनीं किंवा इतर चोरट्यांनीं हल्ला केला, किंवा वाघोबानें उडी मारिली तर त्यापासून बचाव व्हावा याकरितां ही सर्व तजवीज होती. परंतु सबंध प्रवासांत आम्हांस चोरटे व वाघोबा मळींच भेटले नाहींत. कोल्हे, ससे, रानमांजरें, मोर मात्र अतोनात भेटले.

मह्रू ते इंदूर सर्व रस्ता डांबराचा आहे. गर्द धुक्यामुळें रस्ता बरोबर दिसत नसे. मह्रूची छावणी सोडल्यावर गाडीचा वेग वाढवून आम्ही रात्रीं ८–२५ ला इंदूर शहरांत प्रवेश केला. चार पांच रस्ते फुटतात, तेथें पोलिस उभा होता, व त्याच्या नजीक रस्ता दर्शविणाऱ्या पाट्या होत्या. टॉर्च लाइटनें पाट्या वाचण्याचें काम मी स्वतः करीत होतों. माझ्या हातून पाट्यांवर प्रकाश पडण्याच्या ऐवजीं पोलिसाच्या तोंडावर एकदम प्रकाश पाडला गेला, त्यामुळें माझ्या पोटांत धस्स झालें. कारण, मुंबई व पुणेरी पोलिसांच्या करड्या अंमलाची आठवण झाली. परंतु इंदूरचा तो पोलिस, आम्ही प्रवाशी आहोंत हें जाणून मोठ्या शांतपणानें म्हणाला " बाया हातसे जाना, और उधर (हातानें दर्शवून) घुम कर सिदा जाना जी. " एवढें म्हणून 'आलर्ट' उभें राहून त्यानें आम्हांस सलाम केला. विचारपूस करून आम्ही डाक बंगला शोधून काढिला; व तेथें रात्रीचा मुक्काम करण्याचें ठरविलें. डाक बंगला इतर प्रवाश्यांनीं भरला होता, त्यामळें तेथें जागा नव्हती. आम्हास एक दीड हाताचा माणूस तेथें भेटला, त्यानें " आपण ग्रँड हॉटेलमध्यें उतरा व मी आपली सर्व व्यवस्था करतों, " असें सांगितलें. आम्हां सर्वांस भूक लागली होती. थंडीनें सर्वजण गारठलों होतों, म्हणून नाइलाजास्तव, त्या दीड हाताच्या माणसाचें म्हणणें आम्हीं कबूल केलें व त्याच्या मोटारगाडीमागें ग्रँड हॉटेलचा रस्ता

परतलों व नव्या रस्त्यानें तापी नदीवरील पूल ओलांडण्यास सुरुवात केली. तापी नदीवरील हा पूल नुकताच बांधिला आहे. पूल सर्व दगडांनीं बांधिला आहे. पुलाची लांबी सुमारें एक मैल असावी. या पुलामुळें व्यापार व दळणवळण यांची चांगली सोय झाली आहे. या पुलावरून जाणाऱ्या प्रत्येक प्राण्यावर व वाहनावर कर बसविला आहे. टुरिंग मोटार गाडीस २ रुपये, लॉरीस ४ रुपये, बैलगाडीस ८ आणे, उंटास ८ आणे, घोड्यास ४ आणे, शेळीस २ आणे व माणसास ३ पै याप्रमाणें टोल द्यावा लागतो. दिवसांतून जितके वेळां माणसें, जनावरें व वाहनें जातील तितके वेळां टोल द्यावा लागतो. पुलाच्या दोन्ही तोंडावर टोल नाकीं आहेत. तेथें जातांना किंवा येतांना टोल दिल्याची जी पावती मिळते, ती परत द्यावी लागते.

तापी नदीचा उगम सातपुड्यांत बैतुलाजवळ होतो व ती पश्चिमेकडे वाहात जाऊन खंबायतच्या आखातास सुरतेजवळ मिळते पूल ओलांडल्यानंतर नवीन रस्ता फार चांगला असून, रस्त्याच्या दुतर्फा ज्वारीचीं, गव्हाचीं शेतें लागतात. ठिकठिकाणीं शेतें, रस्त्यांतून भरगच्च भरलेल्या गाड्या, गुरांचे कळप दृष्टीस पडतात. तापी ओलांडल्यानंतर शिरपूर लागतें. शिरपूरहून जुलवानिया येथें आम्ही गेलों. सातपुड्याच्या उंच उंच टेकड्यांतून प्रवास करावा लागला. जुलवानियांतून खारपूर व राजपूर या ठिकाणीं जाणारे रस्ते फुटतात. पुढें नर्मदा नदी लागते. तेथें ८ आणे देऊन नर्मदेचा पूल ओलांडला. पुढें तीन चार मैलांवर आम्हांस कालघाट (Khal Ghat) लागला. तेथून दोन फर्लांग गेल्यावर मुंबई इलाख्याची हद्द संपून इंदूर संस्थानची हद्द लागते.

टोलबाजी एकदांची टळली म्हणून आम्ही सुटकेचा उच्छ्वास टाकला. इतक्यांत इंदूर १०९ मैल आहे असें दाखविणारा पांढरा दगड व इंदूर स्टेटची हद्द सुरू झाली असें दाखविणारी पाटी दिसली. कालघाट साधारण अवघड असून, त्यांतील रस्ते फारच चांगले आहेत. कालघाट उतरल्यावर महेश्वर, मानपूर हीं गांवें लागतात. टोल न घेतां इंदूर सरकारनें रस्त्याची व्यवस्था फारच उत्तम ठेविली आहे. मुंबई इलाखा सोडून आम्ही मध्य हिंदुस्थानांत प्रवेश केला. महूचा घाट उतरून रात्र बरीच झाली होती; म्हणजे ८ वाजले होते. म्हणून आम्ही इंदूरपासून १२ मैलांवरील

महू शहरीं पोहोंचलों. महू येथें इंग्रजांची छावणी आहे. आम्हीं छावणींत प्रवेश केला, व तेथील शीख शिपायांस इंदूरचा रस्ता विचारीत विचारीत चाललों. या वेळीं गाडीताशीं १० मैलांच्या वेगानें चालली होती. येथें एक गोष्ट सांगण्यास विसरलों. आम्ही आमच्या बरोबर दोन बंदुका घेतल्या होत्या, त्या काढून व थोड्या गोळ्या खिशांत घालून आमच्यापैकीं रा. सुमंतराव देसाई हे एका बाजूस व नारायणराव नाखवा हे दुसऱ्या बाजूस बंदुका घेऊन बसले होते. यदाकदाचित् भिल्लांनीं किंवा इतर चोरट्यांनीं हल्ला केला, किंवा वाघोबानें उडी मारिली तर त्यापासून बचाव व्हावा याकरितां ही सर्व तजवीज होती. परंतु सबंध प्रवासांत आम्हांस चोरटे व वाघोबा मळींच भेटले नाहींत. कोल्हे, ससे, रानमांजरें, मोर मात्र अतोनात भेटले.

महू ते इंदूर सर्व रस्ता डांबराचा आहे. गर्द धुक्यामुळें रस्ता बरोबर दिसत नसे. महूची छावणी सोडल्यावर गाडीचा वेग वाढवून आम्ही रात्रीं ८–२५ ला इंदूर शहरांत प्रवेश केला. चार पांच रस्ते फुटतात, तेथें पोलिस उभा होता, व त्याच्या नजीक रस्ता दर्शविणाऱ्या पाट्या होत्या. टॉर्च लाइटनें पाट्या वाचण्याचें काम मी स्वतः करीत होतों. माझ्या हातून पाट्यांवर प्रकाश पडण्याच्या ऐवजीं पोलिसाच्या तोंडावर एकदम प्रकाश पाडला गेला, त्यामुळें माझ्या पोटांत धस्स झालें. कारण, मुंबई व पुणेरी पोलिसांच्या करड्या अंमलाची आठवण झाली. परंतु इंदूरचा तो पोलिस, आम्ही प्रवाशी आहोंत हें जाणून मोठ्या शांतपणानें म्हणाला " बाया हातसे जाना, और उधर (हातानें दर्शवून) घुम कर सिदा जाना जी. " एवढें म्हणून 'आलर्ट' उभें राहून त्यानें आम्हांस सलाम केला. विचारपूस करून आम्ही डाक बंगला शोधून काढिला; व तेथें रात्रीचा मुक्काम करण्याचें ठरविलें. डाक बंगला इतर प्रवाश्यांनीं भरला होता, त्यामळें तेथें जागा नव्हती. आम्हास एक दीड हाताचा माणूस तेथें भेटला, त्यानें " आपण ग्रँड हॉटेलमध्यें उतरा व मी आपली सर्व व्यवस्था करतों, " असें सांगितलें. आम्हां सर्वांस भूक लागली होती. थंडीनें सर्वजण गारठलों होतों, म्हणून नाइलाजास्तव, त्या दीड हाताच्या माणसाचें म्हणणें आम्हीं कबूल केलें व त्याच्या मोटारगाडीमागें ग्रँड हॉटेलचा रस्ता

धरला. हॉटेलची इमारत दोन मजली असून, स्टेशननजीक हें हॉटेल आहे. आम्ही रात्रीं ९ ला तेथें पोहोंचलों. खोली पाहून सामानसुमान उतरून घेतलें. अर्ध्या तासानंतर आमचें जेवण संपत आल्यावर Are you all happy ? असा त्या दीड हाताच्या मनुष्यानें आम्हांस प्रश्न विचारला; व " Oh yes, we are all happy. " असें उत्तर आमच्याकडून मिळतांच " May I go then ? " असें म्हणून व आम्हांस Good night करून तो गृहस्थ पुन्हां डाक बंगल्यांत गेला. हा दीड हाताचा माणूस, मध्यम उंचीचा, गौरवर्ण व जातीनें पार्शी होता. त्याचा एक हात अर्धाच होता. तो इंदूरमधील ग्रँड हॉटेलचा मालक व मॅनेजर होता.

सकाळीं उठून इंदूर शहरांत काय काय पाहावयाचें हें ठरवून आम्ही रात्रीं ११ च्या सुमारास झोंपलों. हा प्रवासांतील दुसरा मुक्काम व प्रवासाचा दुसरा दिवस. आमचा एकंदर प्रवास ३७६ मैल झाला होता.

इंदूर

शुक्रवार ता. २९।१२।३३ रोजीं सकाळीं उठून इंदूर शहरचा देखावा पाहूं लागलों. जिकडे तिकडे धुकेंच धुकें, व थंडी. शहराच्या मध्यभागीं उंच इमारती व कापसाच्या आणि कापडाच्या गिरण्यांचीं धुराडीं दृष्टीस पडलीं. नंतर सकाळची न्याहरी करून इंदूरच्या ग्रँड हॉटेलचा ८–३० ला आम्हीं निरोप घेतला; व स्टेशननजीक पेट्रोल भरून पुन्हां शहर पाहण्यास निघालों.

इंदूर हें होळकरांच्या संस्थानचें राजधानीचें शहर. शहर सुंदर असून त्यांतील इमारती उत्तम आहेत. जुना व नवा असे दोन राजवाडे असून, कौन्सिल, कोर्ट, माणिक बाग, वगैरे स्थळें पाहण्यासारखीं आहेत. इंदूर संस्थानांतील कुबेर शेट हुकुमचंद यांनीं बरेच पैसे खर्चून संगमरवरी दगडांचें तीन मजली बालाजीचें देऊळ बांधलें आहे, तें पाहण्यासारखें

आहे. दोन मैलांच्या अंतरावर एजंटचा बंगला आहे. शिक्षणाची उत्तम सोय असून 'होळकर आर्टस्-कॉलेज,' व मेडिकल् स्कूल आहे. कापडाच्या नऊ गिरण्या असून, सर्व प्रकारचा व्यापारही तेथें चालतो. स्टेशन नजीक देवास, धार, वगैरे ठिकाणीं जाण्यास मोटार लॉरींचा स्टॅन्ड आहे. बडोदा पद्धतीचे सुंदर टांगे आहेत. मारवाडी, महाराष्ट्रीय व इतर तत्सम व्यापारी लोकांची वस्ती असून त्यांची राहणी चांगली आहे. मुख्य भाषा हिन्दी; सर्व व्यवहार हिन्दीमध्येंच चालतो.

इंदूर सरकारचें राज्य प्रजेस सुखकारक वाटतें. प्रजेच्या सुख-सोयींकडे, ठिकठिकाणीं बागबगीचे, वाहनें, वाचनालयें, क्रीडांगणें, धर्मार्थ दवाखाने, शाळा व कॉलेजें, उत्तम डांबरी सडका, विजेचे दिवे, व इतर सर्व जरूरीच्या सोयी करण्याकडे इंदूर सरकारनें पूर्ण लक्ष दिलें आहे. सर्व इंदूर शहर पाहून ९–३० ला आम्हीं पुढच्या मुक्कामाचा मार्ग धरला. पुढचा मुक्काम गुणा शहरीं करण्याचें ठरविलें. इंदूर ते गुणा १८२ मैल आहे व बादुरा २१२ मैल आहे. इंदूर शहरापासून आम्हीं ९–३० ला गुणाचा मार्ग मुंबई-आग्रा रोडनें धरला. रस्त्याच्या दुतर्फा हिरवीगार शेतें, त्यांमध्यें गहूं, तूर, कापूस, तंबाखू व अळशी वगैरे पिकें प्रामुख्यानें दिसत होतीं.

इंदूरहून २१ मैलांवर देवास शहर लागलें. तेथें आम्ही मुख्य रस्त्यानें जाऊन देवास शहरास एक फेरी घातली. गांव फारच लहान आहे. शहराच्या मध्यभागीं मार्केट असून एक उंच टावर आहे. त्यावर घडयाळ व तेथील महाराजांच्या एका पूर्वजाचा लहानसा अर्ध पुतळा आहे. तेथें रा. देसाई यांच्या ओळखीचे देवासचे चीफ जस्टीस रा. मानकर यांच्याकडे आम्ही गेलों. तेथें फलाहार करून व कॉफी घेऊन १०–३० च्या सुमारास कूच केलें. देवास नजीक एक देवीचें देऊळ डोंगरावर आहे. तेथें लोक रविवारीं दर्शनास जात असतात.

देवासहून उज्जयिनीस रस्ता फुटतो. देवासहून उज्जयिनी २२ मैल आहे. आम्ही आमच्या गाडीचा वेग वाढवून म्हणजे ताशीं ५० मैल करून प्रवास झपाटयानें करण्याचें ठरविलें. रस्ते फारच चांगले, परंतु गाडीचा तोच वेग कायम ठेवतां येईना, कारण कापसाच्या गाडयांची वर्दळ आणि मेंढरांचा व शेळयांचा सारखा सुळसुळाट. मेंढरें पाहून इंदूरच्या राज्याची

आठवण झाली, व त्यांचें मेंढरें हें राजचिन्ह आहे कीं काय अशी मला शंका आली. इतक्यांत वाटेंत उभा असलेल्या एका प्रवाश्यानें आम्हांस थांबण्यास हातानें खूण केली. आम्ही गाडी उभी केली. त्या प्रवाश्याची गाडी नादुरुस्त झालेली होती. त्याची गाडी फियाट व आमचीही गाडी फियाट, अर्थात् त्यानें आमच्या मदतीची इच्छा दर्शविली. आमचा ड्रायव्हर नुसता ड्रायव्हर नसून उत्तम मेकॅनिस्ट आहे. 'त्या मोटारला काय झालें आहे पहा,' असा हुकूम मिळतांच त्यानें त्याची गाडी तपासून पाहण्यास सुरुवात केली. इकडे आम्हीं बरोबर आणलेल्या संत्र्यांचा व सफरचंदांचा समाचार घेतला. त्या रस्त्यानें एक वृद्ध गृहस्थ गाढव घेऊन येत होता. तें पाहून आमच्यापैकीं वृद्ध गृहस्थास त्या गाढवावर वसण्याची इच्छा झाली. तें बसण्याचेंच गाढव होतें. तें साधारण लहान म्हणजे ३–३॥ फूट उंच होतें. कोणास ठाऊक काय झालें, आमच्या वृद्धानें त्यावर बसण्याचें रहित करून, "अरे, ओ बेचने का हाय काय ?" असा प्रश्न विचारला. बिचारा गाढवाचा वृद्ध मालक, 'जी हुजूर, नही बेचने का' म्हणत थोड्या अंतरावर जाऊन त्यावर स्वार झाला. हिंदी भाषा बोलण्याचा पहिला धडा इंदूरमध्यें मिळाला.

त्या प्रवाश्याची गाडी चालू करून दिल्यावर त्यास खाण्यास देऊन आम्ही पुढील मार्गास लागलों. थोड्या वेळांत शेजपूर लागलें, तेथें डाक बंगला आहे. तेथून सारंगपूरला गेलों. तेथेंही डाक बंगला आहे. जवळच नदी आहे, व उत्तम खेडेगांव आहे. सारंगपूरहून पाचोरा व नंतर बिओरा येथें शुक्रवारीं दुपारीं २–३० ला पोहोंचलों. इंदूर ते बिओरा ११२ मैल आहे. बिओरा हें राजगढ येथील रजपूत संस्थानिकांच्या ताब्यांत आहे. येथें डाक बंगला आहे. तेथें आम्ही आमचा विश्रांतीचा मुक्काम केला. डाक बंगल्याच्या रखवालदारास चहा करण्यास सांगून बाजारांतून पुरी, भाजी, कचोरी, रसगुल्ले वगैरे घेऊन नारायणराव आले.

मुंबई सोडल्यापासून आम्ही स्नान केलें नव्हतें, म्हणून सर्वांनीं गरम पाण्यानें स्नान करून, यथेच्छ जेवण केलें. डाक बंगल्यांत उत्तम सामान असून व्यवस्थाही चांगली आहे. तेथें ३ तास राहिल्यास प्रत्येकीं ८ आणे व सबंध दिवस राहिल्यास प्रत्येकीं १ रुपया द्यावा लागतो. प्रत्येक गरम पाण्याच्या बादलीस दोन आणे द्यावे लागतात. इतर कांहीं लागल्यास त्या

बद्दल किती पैसे द्यावयाचे त्याचा तक्ता भिंतीस लाविला आहे. कोण कोण प्रवासी येऊन गेले त्यांचें नोंदणी-बुक ठेविलें आहे. त्यामध्यें नांवें लिहून, केव्हां व किती वेळ बंगल्यांत होतों व किती पैसे दिले तें नमूद करावें लागतें. हें नमूद केल्यावर आम्ही बिओरा डाक बंगल्याच्या बाहेर आलों. तेथें राजगढचे संस्थानिक, बिओरा गांवांतील लोकांच्या उत्सवास आले होते. उत्सवाचा मंडप लतापल्लवांनीं शृंगारला होता, एवढेंच आम्हांस पाहण्यास मिळालें.

बिओरा गांव मोठें असून व्यापाराची पेठ आहे. त्या ठिकाणीं शाळा आहे. जवळच नदी आहे. आम्ही मंडप पाहूनच मनाची तृप्ति केली, व गुण्याचा रस्ता धरिला. बिओरा सोडल्यावर बिना, खातकीया, रोथान हीं गांवें वाटेंत लागलीं. शेवटीं गुणा लागलें, तेथें आम्ही रात्रीं ८ चे सुमारास पोहोंचलों. शहरांत न जातां स्टेशनवर गेलों व पत्रें वगैरे आलीं आहेत कीं काय वगैरे शोध केला. रस्त्यांतच एक मुलगा भेटला. त्याच्या मदतीनें डाक बंगल्यावर गेलों. तो डाक बंगला युरोपियन प्रवाश्यांनीं भरलेला होता. त्यामुळें आतां उतरावें कोठें हा आम्हांस मोठा प्रश्न पडला, त्या मुलानें, धर्मशाळेंत चला म्हटलें, म्हणून धर्मशाळा पाहण्यास गेलों. धर्मशाळेचा दरवाजा पुण्यांतील शनवारवाड्याच्या गणेश दरवाज्याएवढा मोठा आहे. मालकास भेटून राहण्याची परवानगी मिळविली, व आंतील धर्मशाळा पाहण्यास गेलों. धर्मशाळा मोठी असून तींत पुष्कळ खोल्या आहेत, पण त्या ठिकाणीं भयंकर घाण व गलिच्छता पाहून तेथून आम्ही लौकरच पाय काढिला. मला तर कलकत्त्याच्या अंधार कोठडीची आठवण झाली. तेथून आम्ही पेट्रोल घेण्यास बाजार-पेठेंत गेलों. बाजार पेठ नुसती गजबजून गेली होती. मोटारीकडे सगळे टकमक पाहात होते, व आपसांत कांहीं तरी कुजबुजत होते. या ठिकाणीं आम्ही रामसिंग दुर्गासिंग याच्या दुकानांत पानाच्या पट्टया व चहा घेतला. अशा रीतीनें त्या मुलामुळें आमची बरीच करमणूक झाली. आम्ही त्यास नाना तऱ्हेचे प्रश्न विचारून भंडावून सोडलें. पण तो पक्का बोलका खंदा वीर होता. त्यानें, " जी साब्, है साब्, नहीं साब्, ए रस्ता, ओ रस्ता,"

व पुन्हां 'नही साब्' इत्यादि शब्द सारखे उच्चारून आपल्या मुलूख-मैदान तोंडाची चर्पटपंजरी सारखी चालूच ठेविली होती.

गुणा

गुणा हें ग्वाल्हेर संस्थानांतलें एक टुमदार मनोवेधक गांव आहे. मुंबई-आग्रा रोडवरील हें गांव जी. आय. पी. रेल्वेचें स्टेशन असून त्या ठिकाणीं ग्वाल्हेर संस्थानची लष्करी छावणी आहे. येथील हवा फार चांगली असून, आजुबाजूस नयनमनोहर सृष्टिसौंदर्य पाहण्यास मिळतें. रस्ते फार चांगले आहेत. येथें सर्व कांहीं मिळतें. वस्ती हिंदु, विशेषतः मारवाड्यांची आहे. ही व्यापाराची पेठ असून येथें ग्वाल्हेर सरकारची कचेरी आहे. रात्रीचा मुक्काम कोठें करावयाचा ह्याचा आम्हांस विचार पडला, शेवटीं तेथून ३० मैलांवर ग्वाल्हेर संस्थानच्या हद्दींत असलेल्या बादुरा गांवीं मुक्काम करण्याचें निश्चित झालें. थंडी खूप होती. आम्ही आमचे गरम कपडे व मालेगांवीं खरेदी केलेल्या माकड टोप्या व बंदुका काढून बादुराचा रस्ता धरला.

चांदणी रात्र ती. शुभ्र चांदणें चोहोंकडे पसरलेलें. त्यांतून चांदण्या हळूच डोळे मिचकावीत व चंद्र मोठ्या तोऱ्यानें आमच्या गाडीच्या पुढें धांवे. ड्रायव्हरास विश्रांति देऊन भाऊसाहेब स्वतः गाडी चालवूं लागले. गुण्यापासून २० मैलांवर एक अपघात झाला. अकस्मात् फट् असा आवाज ऐकूं आला, तों एक फर्लांग गाडी पुढें गेली. गाडी थांबवून आवाज झालेल्या जागीं परत आलों. गाडी सुरक्षित होती. फट् झालेल्या जागीं गाडीच्या विजेच्या दिव्यानें प्रकाश पाडून पाहूं लागलों. तों १॥ फूट लांबीचें एक लहान जनावर पाय पसरून पडलेलें दिसलें. खालीं उतरण्यापूर्वीं आमच्यापैकीं एकजण म्हणाले, "अरे, वाघाचें पिलूं ! छान शिकार

झाली बुवा." नंतर भीत भीत जवळ जाऊन पाहतों तों तें एक रिंगटेल रानटी मांजर असल्याचें आढळून आलें. आम्ही त्या मेलेल्या मांजरास बरोबर घेऊन निघालों व बादुरापासून ३ मैलांवर असलेल्या डाक बंगल्याची एका झोंपडींत विचारपूस केली.

तीन मैलांवरील डाक बंगला पडला आहे. पुढें नवीन बंगला आहे, असें कळतांच आम्ही अंगावर ब्लँकेट घेऊन बादुरा गांवीं रात्रीं ९–३० ला पोहोंचलों. रखवालदार ऊर्फ मुशाफर यास बोलावून बंगला उघडला. त्यांत सर्व सामान ठेवून मुशाफरास चहा व जेवण तयार करण्यास सांगितलें. थंडी फार वाजत होती म्हणून चहाची जरूरी होती. चहा पिऊन झाल्यावर वाटेंत सांपडलेली शिकार त्या मुशाफरास दाखविली, तें वाघाचें पिलूं आहे असें आमच्यापैकीं कांहींचें ठाम मत होतें. कारण त्याच्या अंगावर वाघासारखे पट्टे होते. मुशाफर " ये रानका बिल्ली है " असें म्हणून पुढील व्यवस्थेस लागला.

ती शिकार आम्ही तेथेंच टाकून दिली. रात्रीं १०–३० ला जेवण केलें. गरम गरम भात, व त्याबरोबर सूप. रा. देसाई व मी यांनीं त्याचा खरपूस व मनसोक्त समाचार घेतला. श्री. भाऊसाहेब व नारायणराव जेवले नाहींत, त्यांस झोंपेनें फार पछाडलें होतें. नंतर आम्हीही झोंपलों.

बादुरा हें खेडेगांव ग्वाल्हेर संस्थानांत आहे. डाक बंगल्याची व्यवस्था फारच उत्तम असून, प्रवासांत कसल्याही तऱ्हेची कमतरता वाटल्यास ती कळविण्यासाठीं एक चोपडें तेथें ठेवलेलें आहे. रस्त्याची किंवा इतर कोणतीही सुधारणा सुचविण्याची ही व्यवस्था ग्वाल्हेरचे इंजिनीअर रा. आपटे यांनीं करून ठेविली आहे. हल्लींच्या छोटे शिंदे सरकारचा एक फोटो बंगल्यांत लावण्यांत आला आहे. बंगल्यांत वारा घेण्यासाठीं टांगलेला मोठा पंखा असून, थंडीसाठीं शेकोटीकरितां भितींत शेगडी करून ठेविली आहे. इकडील डाक बंगल्यांत शौचकुपाची व्यवस्था कांहीं औरच, साहेबी पद्धतीचा शौचकूप व हिंदुस्थानी पद्धतीचा शौचकूप असे दोन विभाग आहेत. साहेबी शौचकुपांत जाण्यास कसेसेंच वाटे. आमच्यापैकीं एकटे रा. देसाई मात्र त्याचा उपयोग करीत. हिंदुस्थानी शौचकुपास दरवाजे मुळींच नाहींत !

असो. सकाळीं सर्वांच्या अगोदर भाऊसाहेब उठत व नंतर आम्हांस उठवीत. आम्ही सकाळींच चहा घेऊन व न्याहारी करून बादुरा डाक बंगला ७–३० ला सोडला व पुढील मुक्काम झांशी येथें करण्याचें ठरविलें.

बादुरा ते झांशी

बादुरा ते झांशी ९० मैल आहे. आम्ही ता. ३०–१२–१९३३ रोजीं शनिवारीं निघालों; त्या वेळीं अरुणोदय होऊन सुवर्णमय कोमल किरण, वसुंधरेच्या विविध रंगांच्या हिरव्यागार गालिच्यावर पसरलेले होते, तरुलतांवर दंवाचे पांढरे शुभ्र थेंब मोत्यासारखे झळकत होते, गुं गुं असा गोड गुंजारव करीत भृंगावली आनंदानें इकडे तिकडे बागडत होत्या, व आम्ही थंडीनें कुडकुडत होतों, आमच्या तोंडून एकदम

“ **नमस्ते जगत्कारणा ! आदिशक्ते ।**
नमस्ते प्रभो ! क्षेमदात्रे नमस्ते ॥ ” हे उद्‌गार निघाले.

ती निसर्गसुंदर शोभा पाहात मोठ्या आनंदानें व उत्साहानें आम्ही प्रवास करीत होतों. रस्ते फारच सुंदर होते. आम्हांस येथें तांबड्या मातीचे रस्ते लागले. रस्त्यांत फारशीं खेडीं लागलीं नाहींत. प्रदेश अरण्यमय आहे. बादुराहून ३२ मैलांवर सिप्री ऊर्फ शिवपुरी गांव लागलें. येथें आम्हांस मुंबई-आग्रा रोड नाखुषीनें सोडावा लागला. शिवपुरी उत्तम गांव असून तेथून ग्वाल्हेरला एक रस्ता, व दुसरा झांशीस जातो. ग्वाल्हेर येथून ७८ मैल आहे व झांझी ६० मैल आहे.

बादुरापासून झांशीच्या वाटेंत मिना, व नंतर दहारडा लागलें. दहारडा येथें डाक बंगला आहे. दहारड्याहून परोरा एथें आम्ही पोहोंचलों. परोरा येथें डाक बंगला आहे. तेथें न थांबतां आम्ही सिप्री येथें आलों.

सिप्री

सिप्रीहून झांशी ६० मैल आहे. सिप्री हें उंच टेंकाडावर वसलें असून, ग्वाल्हेर संस्थानचें तें महाबळेश्वर आहे. येथील हवा थंड असून ठिकठिकाणीं मोठमोठे बंगले बांधिले आहेत. उन्हाळचांत ग्वाल्हेर संस्थानांतील श्रीमंत लोक व ग्वाल्हेर सरकार येथें येऊन राहतात. त्या ठिकाणीं जॉन्सन् स्टोन नांवाची सुंदर इमारत महाराजांच्या जॉनसन् नांवाच्या शिक्षकाच्या स्मरणार्थ बांधिली आहे. रॉबर्टसन् नांवाचा सुंदर रस्ता आहे. लहान लहान रस्त्यांचें जाळें पसरलेलें आहे. या ठिकाणीं ग्वाल्हेर सरकारनें मोठें थोरलें धरण बांधून, बोटिंगची उत्तम सोय केली आहे. त्यामध्यें लहान लहान होडचा व स्टीम लँचेस् ठेविल्या आहेत. सर्व धरण डोंगराच्या मध्यें असून एका बाजूनें दगडी बांध घातला आहे. त्या धरणानजीक कै. श्रीमंत जयाजीराव महाराज शिंदे व महादजी शिंद्यांच्या मातोश्री यांच्या प्रेक्षणीय छत्र्या आहेत.

सिप्री हें फारच मनोवेधक व आल्हादकारक छोटेखानी गांव असून प्रवाश्यांस तें पाहून फारच आनंद होतो. इ. स. १८५७ च्या बंडांतील प्रसिद्ध सेनापति तात्या टोपी यांस येथें फांशीं दिलें. सिप्री सोडल्यावर आम्ही सिप्रीच्या अरण्यमय प्रदेशांत प्रवास करण्यास सुरुवात केली. जिकडे तिकडे गर्द झाडी व उंच उंच टेंकडचा. शहाबादी फरशीसारखे विपुल दगड या प्रदेशांत सांपडतात. येथें या दगडांच्या बऱ्याच खाणी आहेत. एक एक मैलाच्या अंतरावर उंच टेंकडीवर " राईडिंग स्कूल " आहे. पांच मैलांनंतर भगोरा टँककडे जाणारा रस्ता दाखविणारी पाटी लागते. हचा टँकमधून शेतकऱ्यांस शेतीसाठीं पाणी पुरविलें जातें. ठिकठिकाणीं कालवे दृष्टीस पडतात.

सिप्रीच्या अरण्यमय प्रदेशांत पुष्कळसे हौशी शिकारी लोक शिकारीस जातात. पुढें वाणगंगा नांवाचें लहान खेडें लागलें. सिप्री ते झांशी रस्त्याच्या ४० व्या मैलावर सिप्री घाट लागला. हा घाट २ मैल लांब असून, चढण्यास सोपा आहे. घाटावरील रस्ता फार चांगला आहे. घाटांत गर्द झाडी, दऱ्या व लहान लहान ओढे दृष्टीस पडतात. येथून ग्वाल्हेरचा

किल्ला दिसतो. घाटांत ४२ व्या मैलावर आम्हास एक उंटांचा तांडा भेटला. मोटारच्या हॉर्नचा आवाज ऐकतांच, उंट सैरावैरा पळूं लागले, व थोड्या वेळानें आम्हास गाडी थांबविणें भाग पडलें. कारण उंट पळूं लागल्यामुळें, माती उधळून तांबडा गुलाल अंगावर घ्यावा लागला. उंटांच्या एका मालकास आम्ही किंमत विचारली, तेव्हां प्रत्येक उंटास कमींत कमी २५ ते ३० रुपये पडतात, असें त्यानें सांगितलें. नंतर उंटांचा तांडा एका बाजूस उभा केल्यावर, आम्हास जाण्यास रस्ता मिळाला. उंट भुकेलेले दिसत होते. ते ज्या ठिकाणीं उभे होते, त्या ठिकाणच्या उंच झाडांचीं पानें खाण्यांत ते गर्क झाले होते. घाट उतरल्यावर पुष्कळसें सृष्टिसौंदर्य पाहण्यास मिळतें, विशेषतः करड्या रंगाच्या दगडांचे सुळके पावलोंपावलीं दृष्टीस पडतात. ग्वाल्हेर सरकारास दगडांचें पुष्कळ उत्पन्न होत असावें असें वाटतें. भूक लागल्यामुळें, आम्ही बरोबर आणिलेल्या डब्यांपैकीं एक डबा उघडून बदाम पाकाच्या वड्या व डाळीच्या पिठाचीं केलेलीं बोरें खाण्यास सुरुवात केली. ड्रायव्हरनें गाडीचा वेग वाढविल्यामुळें, गाडींत असलेले कागद उडून जाऊं लागले. रस्ते तांबड्या मातीचे उत्तम होते. इतक्यांत करेरा लाइन्स शिंद्याच्या लष्करी छावणीचें ठिकाण लागलें. शिपायांच्या बराकी दृष्टीस पडूं लागल्या. येथें छोटीशी नदी आहे, तीवर करेरा लाइन्स नांवाचा पूल आहे. करेरा येथें छोटासा डोंगरी किल्ला आहे. इ. स. १८५७ च्या बंडांत स्वपराक्रमानें प्रसिद्धीस आलेली लक्ष्मीबाई झांशीवाली, हिच्या हातीं इंग्रजांनीं झांशीच्या राज्याचीं सूत्रें ता. ९ जून १८५३ सालीं दिलीं; हें पाहून तिच्या पतीचा एक दूरचा भाऊबंद सदाशिव नारायण, यानें स्वतः झांशीचा महाराज अशी पदवी धारण करून, ह्या करेरा गांवावर स्वारी केली व तेथील किल्ला काबीज केला. पुढें या तोतयाचा पराभव होऊन, तो ग्वाल्हेर येथें पळून गेला. येथून झांशी २८ मैल आहे. वाटेंत शेतें क्वचितच लागतात, कारण प्रदेश डोंगराळ आहे. करेरा लाइन्स ओलांडल्यानंतर दोन मैलांवर सपाट प्रदेश लागतो, व वाटेंत दुतर्फा गव्हाचीं शेतें लागतात. झांशीच्या अलीकडे पांच मैलांवर ब्रिटिश लष्कर कॅम्पिंगकरितां आलेलें होतें. शिपाई लोक जागा साफसूफ करण्याच्या व तंबू ठोकण्याच्या गडबडींत व धांदलींत होते.

ती मजा पाहून आम्ही रविवारीं सकाळीं १०–३० ला झांशी नगरांत प्रवेश केला.

झांशी

अखिल भारतीयांना झांशी शहराचें महत्त्व ठाऊक आहे. आम्ही येथें स्टेशनवर मुक्काम केला. स्टेशनवर पत्रें वगैरे आलीं आहेत कीं काय यांची चौकशी करून स्टेशनवरील मेसर्स कूपर यांच्या बाररूममध्यें जेवण केलें. कूपर यांच्या बारमध्यें उत्तम व्यवस्था आहे. नंतर आम्ही सर्वांनीं आपआपल्या घरीं खुशालीचीं पत्रें पाठविलीं. ग्वाल्हेरहून आमचे एक मित्र येऊन झांशी येथें आम्हांस मिळणार होते, म्हणून दुपारीं ४ वाजेपर्यंत त्यांची वाट पाहण्यासाठीं आम्ही थांबलों; व तेवढ्या वेळांत झांशी शहर पाहण्याकरितां एक गाईड घेऊन आम्ही निघालों.

झांशीचा इतिहास

हें शहर ओरछा संस्थानच्या राजघराण्यांतील बीरसिंग देव यांनीं जहांगीरच्या कारकीर्दींत वसविलें. नंतर तें बुंदेलखंडचा राजा छत्रसाल याच्या ताब्यांत आलें. छत्रसालवर माळवा प्रांताचा सुभेदार महमद बंगष यानें इ. स. १७३३ त स्वारी केली. तेव्हां त्याच्यापासून आपला बचाव करावा म्हणून राजा छत्रसाल यांनीं पहिल्या बाजीरावास विनंतिपत्र पाठविलें तें असें:—

" जो गति ग्राह गजेंद्र की, सो गत भई है आज।
बाजी जात बुंदेल की राखो बाजी लाज ॥

हें पत्र बाजीरावास मिळतांच, त्यानें महमद बंगष याच्याशीं जैतपूर येथें युद्ध करून व यवन सेनेची दाणादाण उडवून बंगषास पळवून

लाविलें व छत्रसालाचें संकट निवारण केलें. राजा छत्रसाल यानें बाजीरावास झांशी वगैरे प्रांत दिले. बाजीरावानें झांशीची सुभेदारी नारो शंकर मोतीवाले यांजकडे सोंपविली. इ. स. १७४४ त नारो शंकर यांनीं शहराची सुधारणा करून, शहर बरेंच वाढविलें. इ. स. १७५६ त एका गोसाव्यानें बंड करून झांशी शहर काबीज केलें. हें पेशव्यांस कळतांच त्यांनीं रघुनाथ नेवाळकर या सरदारास पाठवून झांशी पुन्हां आपल्या ताब्यांत घेतली. त्यामुळें झांशीची सुभेदारी वंशपरंपरेनें नेवाळकरांकडे सोंपविण्यांत आली. नंतर वृद्धापकाळामुळें त्यांनीं आपल्या धाकट्या भावास सुभेदार नेमिलें. त्याचें नांव शिवरामभाऊ. त्यानें गांवाभोंवतीं तट बांधून बऱ्याच सुधारणा केल्या. इ. स. १८५६ पर्यंत त्याच्या वंशजांकडे सुभेदारी होती, व शेवटचा सुभेदार गंगाधरराव हा राणी लक्ष्मीबाई हिचा पति होय.

दुसरे बाजीराव पेशवे पेन्शन घेऊन ब्रह्मावर्तास राहात होते. त्यांच्या पदरीं मोरोपंत तांबे नामक एक ब्राह्मण आश्रित होते. त्यांची मुलगी गंगाधरपंतास देण्याचें ठरलें. या मुलीचें नांव मनुबाई. ही दिसण्यांत सुंदर असून तेजस्वी, हुषार, मानी व पराक्रमी होती. घोड्यावर बसणें, दांडपट्टा व तलवारीचे हात फिरविणें वगैरे मर्दानी खेळांत ती प्रवीण होती. तिचें लग्न झांशीच्या गंगाधररावांबरोबर झाल्यावर, मनुबाईचें सासरचें नांव लक्ष्मीबाई ठेविलें, हीच ती झांशीची संग्राम देवता इतिहासप्रसिद्ध लक्ष्मीबाई.

असो; आमची गाडी, झांशी शहराभोंवतीं असलेल्या तटाच्या दरवाज्यांतून जाऊं लागली. झांशी शहराभोंवतीं तट बांधलेला असून त्यास एकंदर नऊ दरवाजे आहेत. ओढछ गांवचा दिवाण नत्थेखान यानें झांशीचें राज्य एक स्त्री चालविते हें पाहून झांशीवर स्वारी करून शहरास वेढा दिला. या वेळीं लक्ष्मीबाईचे पति निवर्तल्यामुळें, त्या स्वतः राज्यकारभार पाहात होत्या. या वेढाच्या वेळीं लक्ष्मीबाई पुरुषाचा पोषाक करून, तटावरून आपल्या सैन्यास उत्तेजन देऊन जातीनें लढत होत्या. लक्ष्मीबाईच्या असामान्य शौर्यापुढें नत्थेखानाचा निभाव न लागल्यामुळें तो मुकाट्यानें अपयशाचें खापर माथीं घेऊन, हात हालवीत परत गेला! हाच तो तट. म्हणून आम्ही गाडी उभी करून तटस्थ रीतीनें तो तट

पाहात राहिलों. तट कांहीं कांहीं ठिकाणीं पडलेला आहे. तटाचें अवलोकन केल्यावर शहराच्या मध्यभागीं लहानशा टेंकडीवर असलेला, झांशीच्या सौभाग्य लक्ष्मीचा–त्या रणदेवतेचा–मजबूत व बळकट किल्ला दिसूं लागतो. किल्ला दिसतांच १८५७ सालच्या बंडाच्या वेळची आठवण होऊं लागते. किल्यावरील युनियन जॅकचें फडफडत असलेलें निशाण पाहून, पाहणाराचा आत्मा तडफडूं लागतो, किल्ल्याच्या चोहों बाजूंस बुरूज व तट,त्यांस इंग्रजांच्या तोफखान्याच्या भडिमारामुळें पडलेलीं खिडारें व मोठीं छिद्रें पाहून, पाहणाऱ्याच्या अंतःकरणास छिद्रें पडूं लागतात. इ. स. १८५७ सालांत सर ह्यू रोज यानें या किल्ल्यास वेढा दिला होता. गुलामगिरीच्या शृंखलांनीं जखडलेल्या हिंदु बांधवांची मुक्तता करण्यासाठीं स्वतःच्या रुधिराचा अभिषेक करून सतत १७ दिवस अहोरात्र, मर्दानी पोषाखांत, जिवापाड कष्ट सोसणारी अबला, ज्या किल्ल्यांतून लढत होती, **तोच हा त्या महिषासुर–मर्दिनी लक्ष्मीबाईंचा किल्ला !**

किल्ल्याच्या आंत लक्ष्मी देवीचें देऊळ आहे. तेथें दर मंगळवारीं व शुक्रवारीं राणी लक्ष्मीबाई दर्शनास जात असत. हल्लीं फक्त महाशिवरात्रीस लोकांस दर्शनास जाऊं देतात. देवीची पूजा करण्यास ब्राह्मण दररोज जात असतो. किल्ला पाहण्यास कमिशनरची परवानगी लागते.

बंडवाल्यांनीं झांशी येथें केलेल्या इंग्रज लोकांच्या कत्तलीचें स्मारक किल्ल्याच्या पायथ्याशीं केलें असून त्या ठिकाणीं एक लहानशी बाग आहे. (कत्तलींत ७५ इंग्रज पुरुष, १९ स्त्रिया व २३ मुलें मारलीं गेलीं.)

ह्याच किल्ल्याच्या पायथ्याजवळ, बंडाच्या ज्वाला शांत झाल्यावर इंग्रज लोकांनीं हजारों बंडखोर लोकांस फांशीं दिलें. राणी लक्ष्मीबाईंच्या वडिलांस (मोरोपंत तांबे यांस) देखील येथेंच फांशीं देण्यांत आलें. या भागाचें निरीक्षण करून, शेवटपर्यंत "मेरी झांशी नहीं दूंगी" असा हंबरडा फोडणाऱ्या झांशीच्या लक्ष्मीबाईंच्या शहराचे इतर भाग पाहण्यास गेलों. रस्ते अरुंद असून, घरें मोडकीं तोडकीं दिसत होतीं. नंतर मुख्य बाजारपेठेंत गेलों. बाजारपेठ मालानें भरलेली दिसली. सर्व तऱ्हेची फळफळावळ व भाजी येथें मिळते. एक पैशास खूप मोठा कॉली फ्लावर व कोबीचा गड्डा मिळतो. शहरांत ठिकठिकाणीं पोलिसांचा बंदोबस्त आहे. गांवालगत लक्ष्मी

तलाव आहे; येथें ब्रिटिशांची लष्करी छावणी आहे. लष्कर हद्द फारच सुंदर आहे. या हद्दींतील रस्ते डांबरी असून रुंद आहेत. तेथें पेट्रोल घेऊन हिंदुस्थानांतील रस्ते दर्शविणारा एक नकाशा एक रुपयास विकत घेतला. इकडे वस्ती बहुतेक भय्ये लोकांची असून, भाषा हिंदी आहे. झांशी हें जी. आय्. पी. रेल्वेचें मोठें जंक्शन असून तेथें एक रेल्वेचा मोठा कारखाना आहे, त्यामध्यें तीन ते चार हजार लोक काम करतात. रेल्वे लाइनच्या दुतर्फा रेल्वेमधील कामगार लोकांच्या खोल्या व बंगले आहेत. इकडील लोकांस हॉकी व फुटबॉल खेळण्याची फार आवड आहे. ठिकठिकाणीं खेळांसाठीं मैदानें दृष्टीस पडतात. शिक्षणासाठीं शाळा आहेत. पुढें १॥ मैलावर असणारी एक टेकडी पाहण्यास गेलों. ह्या टेंकडीवरून इंग्रज सैन्यानें तोफेचा मारा करून झांशीचा किल्ला घेतला असें आम्हांस कळलें. ही टेकडी, झांशीच्या किल्ल्याच्या पूर्व दिशेस असून, किल्ल्याच्या अगदीं समोर आहे. तेथें गोलंदाजाचें स्मारक केलें आहे. दुपारचे ३–३० वाजल्यामुळें आम्ही पुन्हां स्टेशनवर आलों. तेथें चहा वगैरे घेऊन, आपल्या मित्राच्या आगमनाची वाट पाहात बसलों. तेथें रा. देसाई यांच्या ओळखीचे एक गृहस्थ भेटले. ग्वाल्हेरहून येणारे गृहस्थ येत नाहींत असें समजून, रा. देसाई व श्री. भाऊसाहेब ह्यांनीं रेल्वेनें ग्वाल्हेरला जाण्याचें ठरविलें, व रा. देसाई यांनीं मला व नारायणराव नाखवा यांस आपले मित्र वामनराव यांच्या घरीं राहावयास सांगितलें.अशा रीतीनें आम्हास झांशी येथें मुक्काम करावा लागला.

रा. वामनरावांबरोबर आम्ही त्यांच्या बंगल्यांत गेलों. रात्रीं बारा-एक वाजतां श्री. भाऊसाहेब व देसाई ग्वाल्हेरहून परत आले. आम्ही झोंपेंत गुंग झालों होतों. परंतु घरची मंडळी खुशाल आहेत, अशी तार आल्या-मुळें ती गोष्ट कळविण्यासाठीं आम्हांस त्यांनीं उठविलें व नंतर आम्ही सर्वजण झोंपलों. रा. वामनराव यांनीं आमची व्यवस्था इतकी चांगली ठेवली होती कीं, पुढील सर्व प्रवासामध्यें नारायणराव हे वामनरावांचें नांव काढून "फारच चांगला व उत्तम माणूस हो" असें म्हणत असत.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठून व चहा वगैरे घेऊन, आम्हीं झांशी शहर सकाळीं ८–३० ला सोडलें (रविवार ता. ३१–१२–३३). हा १९३३ सालचा शेवटचा दिवस. नारायणराव यांस आम्हीं विनोदानें

'नारायणमहाराज', किंवा 'बुधा' म्हणत व त्यांच्या हिंदी भाषेमध्यें त्यांना प्रश्न विचारीत मोटारीनें प्रवासाचा मार्ग आक्रमूं लागलों. त्यांची हिंदी भाषा फार और. "ओ कॅच बोला" "तुम उसकू ले कर आया;" "ओरे मी पण खाया," "ओ तो गया" ही त्यांची हिंदी भाषा! एकाला त्यांना तिकडे जा म्हणून सांगावयाचें होते, तेव्हां त्यांनीं हिंदी भाषेंत "उदर आव," असें सांगितलें, झांशी येथें त्यांनीं मला "हाम वी तार घरकू माडूंग्या" (मीही घरीं तार पाठविणार) असें सांगितलें. त्यांची हिंदी भाषा ऐकून आमची बरीच करमणूक होत असे, व प्रवास रुक्ष वाटत नसे. भाऊसाहेब त्यांना नेहमीं म्हणत "कुंव बुधा, क्या बोल्या?" मग नारायण-रावांनीं मोडक्या तोडक्या हिंदीमध्यें कांहीं तरी उत्तर द्यावें. असो; आम्ही कानपूर येथें पुढील मुक्काम करण्याचें ठरविलें.झांशीहून कानपूर१४०मैल आहे.

झांशी ते कानपूर रस्त्यामध्यें हिरवींगार शेतें दृष्टीस पडतात. ठिक-ठिकाणीं कालवे काढले असून त्यांचा उपयोग शेतीसाठीं करितात. तुरीचीं शेतें तिकडे फार दिसतात. लहान लहान खेडीं चार पांच मैलांच्या अंतरावर लागतात. झांशीपासून १८ मैलांवर शिरगांव लागतें. तेथें डाक बंगला आहे. हें गांव समथर स्टेटच्या ताब्यांत आहे. नंतर २८ मैलांवर अभ्रा गांव लागलें. हें गांव मोठें असून बाजारची पेठ आहे. येथें शाळा, दवाखाना, फौजदार कचेरी व डाक बंगला आहे. रस्त्यावर पोस्ट ऑफिस आहे. हेंही गांव समथर स्टेटच्या ताब्यांत आहे.

आम्रा गांवानजीक एका लहानशा टेकडीवर किल्ला आहे. येथें दुधाची चौकशी आम्ही केली. भय्ये लोकांची वस्ती असून हिंदी ही मुख्य भाषा आहे. तेथून ३२ मैलांवर मोथ (Moth) गांव लागलें. हेंही गांव मोठें असून येथें डाक बंगला, दवाखाना व बाजारपेठ आहे. येथें मध्य-वस्तींत एक किल्ला आहे. रस्ते चांगले असून दुतर्फा तुरीचीं व गव्हाचीं शेतें पिकांनीं भरलेलीं दिसत होतीं. थंडी साधारण पडली होती.


नंतर ४५ मैलांवर सिसा (Sisa) गांव लागलें. नंतर सोमई व ओराई या गांवीं आम्हीं सकाळीं ११ ला पोहोंचलों. झांशी ते शिरगांव १८ मैल; शिरपूर ते आम्रा १० मैल; आम्रा ते मोथ ४ मैल; मोथ ते ओराई ३८ मैल. झांशीहून ओराई ७० मैल आहे.

ओराई


ओराई हें जी. आय्. पी. रेल्वेचें स्टेशन आहे. हें शहर संयुक्त प्रांतांत आहे. हें **जालन** जिल्ह्याचें मुख्य गांव असून येथें धान्याच्या व्यापाराची तायर्नन गंज नांवाची मोठी पेठ आहे. धान्यांनीं भरलेल्या बैलगाड्यांचे अड्डे पुष्कळ दृष्टीस पडतात. येथील आजूबाजूची जमीन फारच सुपीक असून, गव्हाचें व तुरीचें उत्पन्न फार होतें. रस्त्याच्या दुतर्फा २०–२५ मैल हिरवीगार गव्हाचीं शेतें दृष्टीस पडतात. या गांवांत शाळा, बागा व दवाखाने असून, लहान लहान घरें आहेत. त्याचप्रमाणें कलेक्टर कचेरी असून डाक बंगला आहे. येथें आम्ही गाडीस थोडा विसांवा देऊन, पुन्हां ११–३० ला पुढील मार्गास लागलों.

ओराई सोडल्यानंतर, ओराईपासून २२ मैलांवर एका कालव्याच्या ठिकाणीं गाडी उभी करून, खाण्यापिण्याच्या व्यवस्थेस लागलों. बाभळीच्या झाडाखालीं स्टोव्ह पेटवून चहा केला व लोणी आणि जाम यांजबरोबर पावांचा फन्ना उडविला. ही विश्रांतीची जागा रम्य नव्हती. ऊन्ह कडाक्याचें पडलें होतें. त्यामुळें पशुपक्षी झाडांच्या ढोलींत जाऊन बसले होते. हिरव्यागार गव्हांच्या ताटांचा टवटवीतपणा नाहींसा झाला होता. झाडांचीं पानें हलत नव्हतीं. कारण, वायु सूर्याच्या प्रखर किरणांमुळें गिरिकंदरीं जाऊन लपला होता. व आम्ही हातपाय पसरून झाडाच्या छायेंत गप्पा मारीत पडलों होतों, इतक्यांत एका साळुंकीनें माझ्या अंगावर विधि केला. मी ताडकन् उठलों व कालव्यांत जाऊन घाण पडलेली तेवढीच जागा धुऊन स्वच्छ केली. दोन तास विश्रांति घेऊन आम्ही पुढच्या मुक्कामाचा म्हणजे कानपूरचा रस्ता धरिला. रस्ता चांगला आहे. हा रस्ता शेरशहा खानानें तयार केलेल्या रस्त्यांपैकीं असून रस्त्याच्या दुतर्फा झाडें व प्रवाश्यांस पाणी पिण्याकरितां विहिरी बांधून ठेविल्या आहेत. शेरशहाच्या वेळच्या या विहिरी असून त्यांचें पाणी चांगलें आहे.

आम्ही दुपारीं २–३० ला तेथून निघून, पुढें चार मैलांवर, काल्पी शहरानजीक वाटेंत असलेल्या पडक्या इमारतीजवळ गाडी उभी करून, ती पडलेली जुनीपुराणी इमारत पाहण्यास गेलों. आम्ही ती इमारत पाहून



'लंकापुरी', काल्पी (पान २७)



आलों. पण ती कोणी बांधिली व आंतील कबरस्थानें कोणाचीं हें आम्हांस माहीत नव्हतें. तोंच एक सुशिक्षित पंजाबी गृहस्थ आपल्या शेतावर जात असतांना भेटला. त्यास आम्ही बोलावून ती माहिती मिळविली.

ती इमारत हिंदू राजा लहरी यानें बांधली. तिला ८४ घुमट होते व तेथें त्या राजाचा दरबार भरत असे. त्याचा प्रधान श्रीनाथ याचा इब्राहीमखान लोदीनें पराभव करून त्या इमारतीची मशीद बनविली. हल्लीं त्या इमारतींत पांच कबरस्थानें आहेत. मध्यभागीं मोठी कबर असून ती इब्राहीमखान लोदीची आहे. त्याला तेथें १५२६ त पुरण्यांत आलें. हल्लीं येथें ८४ घुमटांपैकीं दोनच घुमट दृष्टीस पडतात.

इमारत पडलेली असून तिच्याभोंवतीं तट आहे. तेथून काल्पी शहर अर्ध्या मैलावर असून तें तेथून दिसतें. नंतर त्या गृहस्थांनीं काल्पी शहराची माहिती सांगून तेथें पाहण्यालायक काय काय आहे हेंही सांगितलें. ह्या गृहस्थांचें नांव मनमोहनलाल. त्यांनीं "आम्हांस शेतावर चला व तेथें चहा वगैरे घेऊन जा" असा आग्रह केला. पण बराच प्रवास करावयाचा असल्यामुळें आम्ही त्यांस Thank you म्हणून दिलेल्या माहितीबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानून त्यांचा निरोप घेतला. रस्त्याच्या दुतर्फा गव्हाचीं शेतें दिसत होतीं. थोड्या वेळानें आम्ही काल्पी शहरांत आलों.

काल्पी

काल्पी हें शहर यमुना नदीवर वसलें आहे. नवी व जुनी काल्पी असे शहराचे दोन विभाग आहेत. जुनी काल्पी इ. स. ३०० किंवा ४०० सालीं काम्बल प्रांताचा राजा वासुदेव यानें स्थापन केली. पुढें लोदी वगैरे मुसलमानी घराण्यांच्या अंमलांत हें एक प्रमुख व भरभराटीचें शहर होतें. इ. स. १८०६ त तें इंग्रजांनीं मिळविलें. इ. स. १८५७ सालांत बंडाच्या

वेळीं नानासाहेव पेशवे येथें राहात असत. झांशीची राणी, झांशी शहर सोडून नानासाहेव पेशव्यांस काल्पी मुक्कामीं येऊन मिळाली. इ. स. १८५७ च्या मे महिन्याच्या २३ तारखेस इंग्रज सेनापति सर ह्यू रोज यानें लक्ष्मीबाई, रावसाहेब व बांद्याचा नवाब या त्रिवर्गांचा काल्पी मुक्कामीं पराभव केला. तेथून राणी वगैरे मंडळी ग्वाल्हेरास पळाली. तात्या टोपी यांचीसुद्धां चकमक काल्पी येथें झाली. अकबराच्या वेळेस येथें एक टांकसाळ होती.

काल्पी गांव मोठें असून, त्या ठिकाणीं म्युनिसिपालिटी व रेल्वे-स्टेशन आहे. रस्ते बरे आहेत. मुख्य रस्ता श्री गणेश गंज हा असून बाग, दवाखाना व डाक बंगला आहे. जवळच पडक्या स्थितींत किल्ला आहे. शहर पाहात पाहात श्री. मनमोहनलाल यांनीं पाहण्यासारखें स्थल म्हणून उल्लेखिलेल्या 'लंकापुरी' जवळ आलों. लंकापुरी हें हिंदूंचें देवालय आहे. देवळाचें आवार फार मोठें असून त्याच्याभोंवतीं चुन्याचे बनविलेले दोन सर्पांचें कुंपण केलेलें आहे, त्याची लांबी प्रत्येकीं १५० फूट असावी. नागमोडी-प्रमाणें काळचा निळसर रंगाचे हे सर्प केलेले असून, त्यांच्या फणा दरवाज्यापाशीं पसरलेल्या आहेत. त्यांमधून देवळांत शिरण्याचा दरवाजा आहे. ते सर्प पहारेकरीच आहेत असें वाटतें.

देवळांत शिरल्यानंतर डाव्या बाजूस एक सुंदर महादेवाचें देऊळ आहे. उजव्या बाजूस एक मोठा उंच मनोरा आहे. त्याची उंची अदमासें १५० फूट असेल. त्या मनोऱ्यामधून वर जाण्यास रस्ता असून त्याच्या २२२ पायऱ्या आहेत. मनोऱ्यावर गेल्यानंतर तेथून सर्व काल्पी शहर, यमुना नदी व आजूबाजूचा १०–१२ मैल टापूंचा प्रदेश दृष्टीस पडतो. हा मनोरा विटांचा बांधलेला असून, त्याच्या बाहेरील बाजूस ७५ फूट उंचीचा दशमुखी रावण काढिला आहे, व त्याच्या छातींत रामानें मारिलेला बाण दर्शवून रामाचा नुसता हात दाखविला आहे. बाणाची लांबी अदमासें ८ फूट असावी. सर्पाकृति कंपौंडाच्या आंत रामाच्या योद्धयाचें शिर व रावणाच्या योद्धयाचें शिर, विरुद्ध दिशेस जोडून, ते लढाई करीत आहेत असें दर्शविलें आहे. तसेंच, चुन्याचे निशाचर बनविले आहेत. रावण व

त्याचे निशाचर, तसेंच चुन्याच्या दरवाज्यापाशीं स्वागतासाठीं तत्पर असलेले काळे निळसर सर्प किंवा नाग, या सर्वांस लंकापुरी म्हणतात.

लंकापुरी ही कलाकौशल्याचा एक उत्कृष्ट नमुनाच आहे. सर्व काम बळकट असून चुन्यामध्यें केलेलें आहे. लंकापुरी पाहून आम्ही ३–३० ला काल्पी शहराच्या दरवाज्यावाहेर पडलों. येथें रस्त्यांत खूपच धुरळा लागला. अर्ध्या मैलावर आम्हास यमुना नदी लागली. यमुना नदीवरून व्यापारासाठीं व प्रवासाकरितां तात्पुरता पूल केलेला आहे. टरबुजासारख्या आकृतीच्या लोखंडी पोकळ मोठ्या नळ्या, जवळ जवळ टाकून, त्यांना मोठ्या साखळदंडानें बांधून, त्या सांखळ्या नांगरासहित नदींत सोडल्या आहेत, ह्या प्रत्येक दोन नळ्यांमध्यें लाकडाच्या लहान होड्या आहेत. होड्या व नळ्या मिळून पूल बनविलेला आहे. टरबुजासारख्या लोखंडी नळ्यांवर मोठ्या जाड फळ्या टाकल्या असून, त्यांवर वाळलेलें गवत पसरलेलें आहे; व बाजूस सांखळ्या बांधून कठडे केले आहेत. ह्याला फाउन्टन ब्रिज असें म्हणतात. येथें १ रुपया टोल देऊन व गाडीचा वेग ताशीं ५ मैलांप्रमाणें करून आम्ही पुलाचे हेलकावे खात यमुना नदी ओलांडून गेलों. जवळ दगडी–रेल्वे पूल आहे. पुलाची लांबी अदमासें २ फर्लांग आहे. पावसाळ्यांत फाउन्टन पुलाचा उपयोग होत नाहीं. पूल ओलांडून गेल्यावर कानपूरच्या रस्त्यास लागलों. येथून जवळ जवळ ३० मैल रस्ता फारच वाईट आहे. संबंध प्रवासांत न खावी लागलेली धूळ या रस्त्यांत खावी लागली. त्याचप्रमाणें बैलांच्या गाड्यांची वाहतूक अतिशय असल्यामुळें, प्रवाश्यांस फारच त्रास होतो. वाटेंत दुतर्फा हिरवींगार शेतें असून त्यांमध्यें तूर लाविलेली होती. हीं शेतें पाहून आपल्याकडे कानपुरी डाळ विकतात, तिची आठवण होते. ही डाळ फार प्रसिद्ध आहे. कानपूरच्या आसपासचा प्रदेश तुरीच्या पिकानें भरलेला असून कानपूर हें त्याचें केंद्रस्थान आहे.

काल्पी ते कानपूर ४४ मैल आहे. वाटेंत आम्हांस पुखराया, बारा, वगैरे खेडीं लागलीं. नंतर पनकी रेल्वे स्टेशन लागलें. येथून कानपूर फक्त ९ मैल आहे. कानपूरच्या अलीकडे १४ मैलांपासून डांबरी रस्ता लागतो. आम्ही संध्याकाळीं ४–३० ला कानपूरला पोहोंचलों. कानपूर शहरांत शिरतांच मोठमोठे विटांचे कारखाने, भट्टया व त्यांची वाहतूक

दृष्टीस पडते. नंतर कापडाच्या गिरण्या लागून, दुतर्फा छोटे बंगले लागतात. शहरांत गेल्यावर पोलीस चौकीवर स्टेशनची चौकशी करून स्टेशनवर गेलों. तेथें चहा घेऊन पेट्रोल घेण्याकरितां पुन्हां गांवांत आलों. पेट्रोल भरून गांव पाहण्यास बरोबर एक गाईड घेऊन निघालों.

कानपूर

कानपूर हें शहर गंगा नदीच्या दक्षिण तीरावर वसलें आहे. हें प्राचीन शहर नाहीं. इ. स. १८०१ मध्यें अयोध्येच्या नबाबाकडून हें इंग्रजांस मिळालें. पूर्वी येथें चोर, डाकू, आणि ठग लोक राहत असत. हल्लीं सर्व जातींचे विशेषतः भय्ये, उत्तर हिंदुस्थानी ब्राह्मण, इंग्रज व इतर लोक यांचा भरणा फार आहे. कानपूर येथें इंग्रजांची छावणी आहे. कानपूर कातड्यां-विषयीं प्रसिद्ध असून, तेथून बूट, जोडे व खोगीर वगैरे सामान तयार करून पाठवितात. सुती व गरम लोंकरी कापडाच्या गिरण्या असून, लालीमली व एलजीन या गिरण्या प्रसिद्ध आहेत. येथें साखरेचा कार-खाना असून सर्व तऱ्हेच्या मिळून एकंदर १६ गिरण्या आहेत. रस्ते डांबरी असून बैलगाड्यांची वाहतूक फार. कातडीं स्वच्छ करण्याकरितां लाग-णारी साल भरून नेणाऱ्या गाड्या फार दृष्टीस पडतात. येथील एबी रोड व मुलगंज रस्त्यांच्या दुतर्फा सारख्या इमारती आहेत. व्यापारी दृष्टीनें हे रस्ते फारच महत्त्वाचे आहेत. मुलगंज रस्त्यावरील श्री. शुक्ल यांच्या दुकानीं आम्हीं सुवासिक मसाल्याचे डबे घेतले. १८५७ च्या बंडांत बंडखोरांनीं इंग्रज लोकांची अमानुषपणानें कत्तल करून, ज्या विहिरींत त्यांना टाकून दिलें असें म्हणतात ती विहीर पाहण्यास गेलों. ही विहीर फुलबाग नांवाच्या बागेजवळ असून, ती पाहावयास कमिशनरची परवानगी लागते. तेथें सतत पोलिसांचा पहारा असतो. ही विहीर संगमरवरी दगडांनीं बांधलेली असून अदमासें ६० फूट उंचीचा मनोरा

तिजवर बांधिला आहे. आंतून ती बंद केलेली आहे. हिंदी गृहस्थाला आंत न जातां बाहेरून पाहावें लागतें. या विहिरीच्या समोर व्हिक्टोरिया राणीचा पुतळा आहे. टाऊन हॉल व म्युझियमची इमारत पाहण्यासारखी आहे. बंडाचा बंदोबस्त करणाऱ्या लॉर्ड रॉबर्टचा पुतळा शहराच्या मध्यभागीं आहे. शिवाजी हायस्कूल, जगत् सिनेमा, बाग वगैरे सर्व सोयी आहेत. शहरांत विजेचे दिवे असून, पोलिस नाक्यावर उंच चौथऱ्यावर उभे राहतात. त्यांचा पोषाख खाकी असून पागोटें तांबडें असतें. पोलिस शिपाई फारच नम्र व विनयशील आहेत. गाडी कोणत्याही बाजूनें न्यावी, मात्र तसें हातानें पोलिसास दर्शवावें लागतें. येथें **सूर्यास्त** ५–३० ला होतो. त्यासाठीं, दिवे लावावेत अशा सूचनेच्या पाट्या जागजागीं लाविल्या आहेत. इकडील टांगे फारच गमतीदार आहेत. त्यांस "एक्का" म्हणतात. या एक्क्यास लहान तट्टूसारखें एक घोडें जुंपलेलें असतें. त्यांत तीन स्वाऱ्या बसतात. सामान मुळींच ठेवतां येत नाहीं. दोघांनीं आपले पाय दोन चाकांच्यावर मोकळे सोडून, तिसऱ्यानें गुडघे आंखडून मध्यभागीं बसावें. एकादें माकड मेल्यावर त्यास नेण्याकरितां जशी ताटी बनवितात, त्याचप्रमाणें हा एक्का दिसतो. नंतर आम्ही गंगेच्या कांठीं गेलों. गंगा घाटावर उभें राहून पवित्र गंगेचें पात्र पाहूं लागलों. सूर्यास्त होऊन रजनीकांत आपले कोमल व आल्हादकारक किरण निळसर अशा आकाशांत पसरूं लागला. गंगेचें शुभ्र निर्मल पाणी, संथपणानें वाहत असून, त्यामध्यें चंद्राचें स्फटिकासारखें प्रतिबिंब गंगेच्या ललकारी लाटांबरोबर हेलकावे खात होतें. लहान होड्या इकडून तिकडे फिरत होत्या. किती आनंदमय शोभा ती !

कानपूर ते बनारस

अशा रीतीनें आम्ही कानपूर पाहिल्यावर एकदम लखनौला जाण्याचें ठरविलें. परंतु कानपूर ते लखनौ रस्ता चांगला नाहीं असें समजल्यावरून आम्ही कानपूरपासून ५० मैलांवर असलेल्या फत्तेपूरमध्यें रात्रींचा मुक्काम करण्याचें ठरविलें. इकडे सूर्यास्त ५-३० ला होतो, त्यामुळें आम्हास गाडीस दिवे लावून प्रवास करणें भाग पडलें. आम्ही ६-४५ वाजतां कानपूर सोडलें. रस्ते सुंदर असून हवा फारच आल्हादकारक होती. आम्ही सर्वांनीं गरम कपडे घालून मालेगांवच्या माकडटोप्या चढविल्या होत्या. इकडच्या तिकडच्या गप्पा मारीत कानपूरची हद्द सोडून पाव मैल गेलों नाहीं तोंच खाण्यासाठीं गाडी थांबवावी लागली. खाण्याचे डबे भराभर काढून कडबोळीं, चकल्या, चिवडा व लाडू यांवर यथेच्छ ताव दिला. नंतर कानपूरमध्यें घेतलेला मसाला घालून विडे खाल्ले. त्यामुळें सर्वांच्या तोंडांस सुगंधी वास येऊं लागला. रा. नारायणराव यांची मात्र फजिती! त्यांचे बरेचसे दांत पडले असल्यामुळें त्यांनीं दोन सुगंधी वड्या चघळण्यास सुरुवात केली व "ये तो बहोत अच्छा है" असें मान डोलावून म्हणूं लागले. परंतु पान खाल्ल्यामुळें आम्हां तरुणांचे ओंठांवर व तोंडांवर आलेली रंगीत लाली त्यांच्या तोंडावर दिसेना, म्हणून आमच्यापैकीं एकजण त्यांस म्हणाले "क्यौं बुढ्ढा, हमारे सरिखा तुमारा मू नही हो गया." बुढ्ढोपंत मान हालवीत नकार दर्शवून म्हणाले, "अरे मेरा मू तो बहोत सुगंधी बन गया है; क्या वास येना तुमकु मालूम नै होया." असो. ७ वाजून ३५ मिनिटें झालीं. नीलवर्ण आकाशांत चंद्राचे कोमल किरण पसरले होते. अगणित तारा मोठ्या तोऱ्यानें चमकत होत्या. हवा थंडगार पडून जिकडे तिकडे नितान्त शांतता पसरलेली होती, व आम्ही गरम कपडे चढवीत व सुवासिक पानाच्या पिचकाऱ्या मारीत फत्तेपूरच्या रस्त्यानें प्रवास करीत होतों. चांदणी रात्र असल्यामुळें आजूबाजूचें सृष्टिसौंदर्य अंधुक अंधुक दिसत होतें. वाटेंत डोंगर, नद्या किंवा ओढे वगैरे कांहींच आढळले नाहींत; परंतु कालवे मात्र पुष्कळसे लागले. स्वतः भाऊसाहेब गाडी हांकीत असल्यामुळें गाडीचा वेग दर ताशीं ४० ते ५० मैलांपर्यंत होता. आमच्या तोंडांतील पान संपेपर्यंत ५० मैलांची

मजल एका तासांत गांठली. फत्तेपूर गांवापासून एक मैल अंतरावर असलेल्या बंगल्यांत आम्ही गेलों. तो डाक बंगला नसून पी. डब्ल्यू. डी. चा बंगला होता. ह्या बंगल्यांत उतरावयाचें असेल तर तेथील अधिकाऱ्याची परवानगी लागते. आम्ही आमची गाडी बंगल्याच्या आवारांत नेऊन उभी केली. तेथील रखवालदार येऊन त्यांनीं बंगला उघडून दिला. हा डाक बंगला नसल्यामुळें ह्या बंगल्यांत उतरणें धोक्याचें आहे असें भाऊसाहेब व देसाई कुजबुजूं लागले. मी व नारायणराव सामान काढूं लागलों. तोंच भाऊसाहेब व देसाई यांनीं आम्हास बोलाविलें व रखवालदारानें विचारलें तर आपण मोठे अधिकारी आहोंत असें सांगावयाचें, असें सांगून ते बंगल्यांत गेले. इकडे रखवालदार आमच्या ड्रायव्हरपाशीं आमची विचारपूस करीत होता. आमचा जोसेफ ड्रायव्हर फार हुषार! त्यानें, " ही मंडळी मोठी ऑफिसर आहेत, व तो कोटावर बिल्ला व हातांत साहेबी टोपी आहे तो कलेक्टर आहे, असें सांगितल्याबरोबर रखवालदाराची तिरपीट उडाली व तो घाबरून " क्या क....ले....क्ट....र! क....ले....क्ट....र है, " असें म्हणून निघाला तो बंगल्यांत शिरून अगदीं आलर्टमध्यें उभें राहून सॅल्यूट करून " जी हुजूर! आपकूं क्या होना जी?" असें मोठ्या अदबीनें विचारूं लागला. हा सर्व प्रकार पाहून आमच्यांतले कलेक्टर रा. देसाई व बडे अधिकारी श्री. भाऊसाहेब आपापल्या हुद्द्याचा उसना आव आणून मोठ्या अधिकारी आवाजानें म्हणाले " कुछ नहीं होना" बिचारा रखवालदार परत फिरला व पाणी, कंदील वगैरे आणून देऊन मोटारींतलें सामान उतरूं लागला. मी व नारायणराव हा सर्व प्रकार बाहेरून पाहात होतों. त्यांतून नारायणरावांस विडी ओढण्याची तल्लफ आल्यामुळें त्यांच्याशीं मी गप्पा मारीत चांदण्यांत उभा होतों. आम्ही दोघे बंगल्यांत गेल्याबरोबर, " काय मास्तर? कोणीं सांगितलें आम्ही कलेक्टर व कमिशनर आहोंत म्हणून?" असें भाऊसाहेबांनीं विचारलें. तेव्हां मी म्हणालों, त्या रखवालदारास मीं कांहीं बोललों नाहीं. हें सर्व जोसेफनें सांगितलें. नंतर रखवालदारास कॉफी करण्यास सांगून आम्ही सर्व बागेंत फिरूं लागलों. परवानगीशिवाय बंगल्यांत उतरल्यामुळें आमची छाती धडधडत होती. कॉफी घेतल्यावर कोणी ऑफिसर न येईल तर बरें असें

म्हणत आम्ही झोंपण्यास गेलों. थंडी फार असल्यामुळें, सर्वांनीं पांघरुणें गुरफटून झोंप घेतली. रा. नारायणरावांस खोकला येई व त्यामुळें आमचे कलेक्टर व कमिशनर झोंपेंत "ये बुढा क्या करता है ?" असें म्हणत. ती इ. स. १९३३ ची शेवटची रात्र होती. "Wish you good and happy year!" असें परस्परांस म्हणत दुसऱ्या दिवशीं पहाटे ५ ला उठलों. यस् यस् म्हणत नारायणमहाराजही उठले (कधीं कधीं आम्ही नारायणरावांस नारायणमहाराज या नांवानें हांक मारीत असतों.) सर्वांनीं प्रातर्विधि आटोपून अंगांत गरम कपडे चढवून व रखवालदारास पैसे देऊन ५–५५ ला बंगला सोडला. पुढचा मुक्काम फत्तेपुराहून ७५ मैलांवर असलेल्या अलाहाबाद शहरीं करण्याचें ठरविलें.

तारीख १ जानेवारी १९३४

ही १९३४ सालांतील आनंददायक व शुभदायक अशी पहिली सकाळ असून वारही सोमवार होता. आम्ही आज वर्षाच्या पहिल्या दिवशीं हिंदूंच्या परम पवित्र क्षेत्रीं जाणार म्हणून सर्वजण आनंदांत होतों. गाडीचा वेग मंद करून, आजूबाजूची नयनमोहक सृष्टिशोभा पाहात व थंडीनें कुडकुडत आम्ही हा प्रवास करीत होतों. रस्ते सुंदर असून, दुतर्फा हिरवीं गार शेतें व प्रत्येक सात आठ मैलांवर एकादें खेडेगांव. एका खेडेगांवा-जवळ आम्ही थांबून दूध खरेदी केलें; दुसऱ्या खेडेगांवीं घासलेट व फळें खरेदी केलीं. सर्व लोकांची भाषा हिंदी; लोक भय्ये व क्वचित् मुसलमान. या ठिकाणीं एक म्हातारे पेन्शनर मुसलमान फौजदार भेटले. त्यांनीं चहाचा आग्रह केला, पण आम्ही तो नाकारला. इकडच्या तिकडच्या गप्पा मारीत असतां त्यांना आमच्या प्रवासाचें आश्चर्य वाटून आमच्या धाडसाची त्यांनीं तारीफ केली. येथें थोडी विश्रांति घेऊन आम्ही निघालों तोंच एक गाढव गाडीपुढें आलें, पण सुदैवानें बचावलें. नंतर बरोबर आण-

लेल्या फळांवर आम्हीं ताव मारण्याचें ठरविलें. पण आमचे नारायणराव त्याविरुद्ध होते. ते जुन्या पंथाचे, पण नव्या पंथाप्रमाणें वागणारे; परंतु अलाहाबादेस जाऊन तेथें स्नान करून मग काय करावयाचें तें करूं अशीं सूचना त्यांनीं केली, व आम्हींही ती मान्य केली. बुद्धाची चेष्टा भाऊ-साहेब करीत होते. मी व देसाई त्यांस साथ देत होतों. अशा उत्साहांत आम्ही सकाळीं (१-१-१९३४ सोमवार) ८-२५ वाजतां पवित्र अशा प्रयाग क्षेत्रांत प्रवेश करून अलाहाबादेच्या स्टेशनवर गाडी उभी केली व पत्रें वगैरे आलीं आहेत कीं काय हें पाहण्यास गेलों, स्टेशनवर चहा घेतला. स्टेशन बरेंच मोठें असून तें सर्व विटांनीं बांधलेलें आहे. नकशीकाम व बांधणी फार मोहक असून उतारूंकरितां बऱ्याच सोयी केलेल्या आहेत. अलाहाबाद हें East India Railway चें एक प्रमुख स्टेशन आहे. त्या ठिकाणीं आम्हांस हॉटेलचे बरेच एजंट्स भेटले. आम्ही सिंध हॉटेलच्या एजंटाबरोबर उतरण्याकरितां गेलों. घरीं पत्रें पाठविलीं. सिंध हॉटेलमध्यें गेल्यावर आम्हीं एक प्रशस्त खोली घेतली. सिंधी माणसाप्रमाणेंच हॉटेल उंच व रोडकें होतें, व्यवस्था बेताबाताचीच होती. चहा घेऊन सर्वांनीं विश्रांति घेतली. नंतर जेवण करून अलाहाबाद शहर पाहण्यास व त्रिवेणी संगमा-वर स्नान करण्यास आम्ही निघालों.

अलाहाबाद

हें संयुक्त प्रांताच्या राजधानीचें शहर आहे. गंगा व यमुना ह्या नद्यांच्या संगमाजवळ हें वसलें आहे व गंगेच्या पूर्व–उत्तर कांठांपासून ते यमुना नदीच्या दक्षिण तीरापर्यंत ह्या शहराची हद्द पसरलेली आहे. हें शहर हिंदू लोकांचें पवित्र क्षेत्र आहे. येथें दरवर्षीं माघी पौर्णिमेस मोठी जत्रा भरते. तिला माघमेळा असें म्हणतात. हिंदु लोक या क्षेत्रास प्रयाग असें म्हणतात, व हेंच त्या शहराचें पूर्वीचें नांव. त्यास अलाहाबाद

(अल्लाह्–देव, व आबाद–शहर) म्हणजे देवाचें शहर असें नांव अकबर बादशहानें दिलें आहे. शहराच्या मुख्य रस्त्यानें आम्ही फिरावयास निघालों. बाजारपेठ माणसांनीं नुसती गजबजून गेली होती. येथें आम्हीं दोन भांडीं खरेदी केलीं. पवित्र गंगोदक भरून नेण्याकरितां दोन तीन लहान चंबू विकत घेण्याची इच्छा नारायणरावांनीं दर्शविली, परंतु ती सफल झाली नाहीं. नारायणराव ह्या पवित्र क्षेत्रीं पूर्वीं येऊन गेले होते. बाजारपेठेंतून आम्ही खुशरू बाग पाहण्यास गेलों. खुशरू बागेच्या भोंवतीं जहांगीर बादशहानें तटबंदी केली असून तिला मोठे मुख्य चार दरवाजे आहेत. आंतील भागांत विस्तीर्ण पटांगण असून, फुलझाडें व इतर हिरव्यागार लतिका यांनीं हा बाग सुशोभित केलेला आहे. बागेच्या मध्यभागीं टोलेजंग तीन कबरस्थानें आहेत, एक खुशरू बादशहाचें, त्याच्या लगत त्याच्या बायकोचें व तिसरें त्याच्या आईचें. त्याच्या बायकोचें नांव ताराबाई होतें. कबरस्थानच्या या इमारती फारच सुंदर असून एकाच पद्धतीनें बांधलेल्या आहेत. इमारती तीन मजली असून प्रत्येकीवर घुमट आहे. घुमटामधून सर्व अलाहाबाद शहर दिसतें. आंतील भागांत असलेलें नकशीचें कोरींव काम व निरनिराळ्या रंगांच्या वेलबुट्टया व संगमरवरी दगडांवर कोरलेलें नक्षीकाम पाहून हिंदुस्थानांत गत कालीं होऊन गेलेल्या कलावंतांच्या व चितार्‍यांच्या हस्तकौशल्याबद्दल पाहणारांच्या मनांत कुतूहल उत्पन्न होतें. कबरी पाहून आम्ही बाहेर आलों. नंतर, खुशरू बादशहानें आपल्या घोडयाची कबर बांधलेली आहे ती आम्हीं पाहिली. या कबरीलगत गुप्त भुयाराचा दरवाजा असून त्या भुयारामधून बागेपासून अलाहाबाद किल्ल्यापर्यंत जातां येतें. बागेंत पाणी शुद्ध करण्याकरितां ‘ स्टोअर ’ केला आहे. बाग पाहून आम्ही ‘ लीडर रोड ’वरून पदार्थसंग्रहालय पाहण्यास गेलों. ह्या संग्रहालयामध्यें उत्तम पौराणिक व ऐतिहासिक वस्तूंचा संग्रह असून मुसलमान राजांचे भरजरी पोषाखांचे संग्रह मुगुटासहित आहेत. ऐतिहासिक लेखन, त्याचप्रमाणें निरनिराळीं हत्यारें, नाणीं, शिलालेख व चित्रें विपुल आहेत. देशभक्त पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांस निरनिराळ्या देशांत सोन्या-चांदीच्या करंडयांतून मिळालेलीं मानपत्रें, तसेंच भेट म्हणून मिळालेल्या मौल्यवान् वस्तू ह्या पदार्थसंग्रहालयांत आल्या असून त्या

पंडितजींनीं बक्षिस दिल्या आहेत. तेथून आम्ही त्रिवेणी संगमावर जाण्यास निघालों. वाटेंत अजमीर व दिल्ली यांची फायनल मॅच पाहण्यास मिळाली. मॅच मॅटवर खेळत होते. बोलिंग अंडर हँड पाहून आम्हांस हंसूं आलें. गाडीमध्यें पेट्रोल भरून नदीपर्यंत आलों तों तेथें गाडी नदीकांठीं नेतां येणार नाहीं असें पोलिस म्हणूं लागला; कारण माघमेळ्यानिमित्त मोठी यात्रा भरणार होती. त्या वेळेस नदीवर जाण्यास प्रत्येक वाहनावर कर असतो. आम्ही दोन रुपये कर भरून गाडी नदीतीरावर नेली. गाडी उभी राहतांच भटाभिक्षुकांनीं व पंड्यांनीं चौफेर गराडा घातला, व जो तो आपल्या विद्वत्तेची व पठण केलेल्या मंत्रतंत्रांची आमच्यावर छाप पाडण्याचा प्रयत्न करूं लागला. त्रिखंडांत त्रिवेणी संगमाच्या चिरकालीन पवित्रतेबद्दल व दैवी शक्तीबद्दल मोठमोठ्या संस्कृत शब्दांचे व श्लोकांचे तुकडे आम्हांवर फेकून, पंडितपणाचा आव आणून, तत्त्वज्ञानाचे धडे ते आम्हांस सांगत होते. आम्ही सर्व शांतपणें ऐकत होतों. नारायणरावांची धांदल मात्र कांहीं निराळीच चालली होती. त्यांना हजामत (क्षौर) करावयाची होती. परंतु त्यांस परवानगी पाहिजे होती म्हणून तो बेत त्यांनीं रहित केला. त्रिवेणींत स्नान केल्यावर सर्व पापें नाहींशी होऊन आपल्या स्वर्गांतील पितरांस मोक्ष मिळतो अशी समजूत आहे.

येथें सर्व हिंदू लोक क्षौर करतात. या क्षेत्रीं पितृकांनीं देखील मुंडण करावें, अशी रूढि आहे. येथें सुवासिनी वेणीदान करतात. म्हणजे नवरा बायकोची वेणी घालतो, व दोघे सौभाग्यवायनें घेऊन येतात. नंतर नवरा बायकोला आपल्या मांडीवर बसवितो व आपल्या हातानें तिच्या वेणीच्या शेवटले केस चार बोटें कापून ते गंगेंत सोडतो. हा सर्व विधि संगमावर नावेंत बसून करतात व यास 'वेणीदान' म्हणतात. या योगानें सुवासिनी बायका आपल्या जन्माचें सार्थक झालें असें समजतात. दक्षिण हिंदुस्थानांतील द्राविडी स्त्रिया, सर्वच केशभार काढून टाकतात!

आम्ही एक लहानशी होडी ठरवून त्रिवेणी संगमावर स्नान करण्यास गेलों. संगमावर दगडी घाट वगैरे बांधलेले नाहींत.

त्रिवेणी संगम

गंगेचें शुभ्र पाणी, तिचा संथ व भव्य प्रवाह, त्याचप्रमाणें यमुनेचें काळसर व निळसर पाणी, तिचा संथ प्रवाह, अशा भिन्न वर्णांच्या दोन पवित्र नद्यांच्या प्रवाहाच्या या संगमास त्रिवेणीसंगम असें म्हणतात. प्रवाहाच्या भिन्न रंगांचें भिन्नत्व बऱ्याच अंतरापर्यंत स्पष्ट दिसतें. अफाट असें तें पात्र, जवळच असलेल्या प्रदेशाची रमणीयता, हिरव्यागार पिकांनीं ओथंबलेले ते सुपीक कांठ, त्यांमधून शुभ्र व नीलवर्णमिश्रित पाणी संथ वाहत असून त्यामध्यें असंख्य होड्या तरत आहेत, अगणित लहान मोठ्या लाटा एक-मेकांवर आपटून संगीताचे मुग्ध सूर काढीत आहेत, हें पाहून आपलें देह-भान आपण विसरून जातों. मला या वेळीं कृष्णाच्या मुरलीची आठवण झाली. ज्या मुरलीच्या सुरानें राधा वेडी होऊन पाषाण मूर्तीप्रमाणें नदी-कांठीं स्तब्ध उभी राहिली, ज्या सुरानें यमुनेच्या पाण्यावर आनंदाचे तरंग उठून ती उचंबळू लागली, ज्या सुरानें कदंब वृक्षावर रोमांच उठून वर त्याला फुलांचा बहर आला, एवढेंच काय पण ज्या सुरानें यमुनेच्या डोहांतील काळ-सर्प आपली क्रूरता विसरून यमुनेच्या वाळवंटांत आनंदानें डोलत बसले. तो सूर या कालिंदी तीरावरच उमटला होता. अशा पवित्र प्रवाहांत आम्ही स्नान करण्यास गेलों. तेथें भट व पांडे यांनीं एकच गडबड सुरू केली. गंगादान करते वेळीं अमुक करावें लागतें तमुक करावें लागतें असें म्हणून त्यांनीं आम्हांस सतावून सोडलें. आम्ही गुपचूप पैसे टाकून स्नान केलें. पाण्यांत पैसा टाकल्यावर ते ताबडतोब काढून घेतात! आमच्याभोंवतीं आणखी पांच सहा होड्या येऊन त्यांतील माणसांपैकीं कोणी गीतेंतील व तुलसीदासांचे श्लोक म्हणूं लागले; तर कोणी फकिरांचे दोहरे म्हणून, " ब्राह्मणास दक्षिणा व सुग्रास अन्न द्या " अशी याचना करूं लागले. होडींत निरनिराळ्या देवांच्या मूर्ती होत्या. शक्य तितकी गडबड व गोंधळ करून कांहीं तरी मिळाल्यास पाहावें हा त्यांचा उद्देश; परंतु तो सफल झाला नाहीं. आम्ही स्नान करून आलों व गरिबांस आणि म्हाताऱ्या-कोताऱ्यांस दानधर्म करून व पवित्र त्रिवेणीचा देखावा मनसोक्त पाहून परत फिरलों. नदीच्या तीरावर असंख्य साधूंचे आश्रम, हरतऱ्हेचीं दुकानें

माघमेळा भरणार म्हणून बांधलीं होतीं. संगमाचे पलीकडचें सोमेश्वराचें देऊळ पाहण्यासारखें आहे. नंतर आम्हीं आमचा मोर्चा अलाहाबादच्या किल्ल्याकडे वळविला. किल्ल्याच्या मुख्य दरवाजापाशीं आमची गाडी जाऊन थडकली. दोन इंग्रज शिपाई तेथें रखवालदाराचें काम करीत होते ख्रिसमस्‌ची सुटी व वर्षाचा पहिला दिवस त्यामुळें किल्ला पाहण्यास सोल्जरांची परवानगी आम्हांस घ्यावी लागली. आमचा पोषाख पाहून आम्ही स्काउट आहोंत अशी त्यांची कल्पना झाली. मी व देसाई परवानगी मागण्यास पुढें गेलों. Good Noon केल्यावर, " Are you Scouts ?" असें त्यांनीं विचारलें. " Yes " मी म्हणालों. नंतर त्यांनीं विचारलें. " Where did you come from ? " " We have come from Bombay." असें रा. देसाई यांनीं उत्तर दिलें. पुनः त्यांनीं विचारलें. " By Motor " " Yes " मीं उत्तर दिलें. " Oh, what dare devil ! " असें म्हणून त्यांतला एक सोल्जर आमच्या बरोबर किल्ला दाखविण्यास व सर्व माहिती सांगण्यास आला. आमचे नारायणराव आपले हिंदु पोषाखांत व कपाळावर गंधाचा टिळा, डोक्यावर कांहीं नसून शेंडी मागें लोंबत असलेली, अशा थाटांत आम्हांस " त्या वडाच्या झाडाखालीं सोन्याचे तेहतीस कोटी देव आहेत, त्यांचें दर्शन अवश्य घेतलें पाहिजे. तर येथें आल्याचा उपयोग, " असें सांगूं लागले. त्या ठिकाणीं एक सोल्जर बंदूक घेऊन पहारा करीत होता. त्यासच ' अक्षय्यवट ' म्हणतात. पूर्वीं एका देवळासमोर असलेल्या एका जुनाट वटवृक्षावरून धर्मभोळे हिंदु लोक मोक्षप्राप्तीसाठीं उडी घेत असत. हा वृक्ष जहांगीर बादशहानें तोडून टाकला. श्री. नारायणराव सांगत होते तीच ही पवित्र जागा. हल्लीं किल्ल्यांतल्या भुयारांतील दाखवितात तो हा मूळचा व खरा अक्षय्यवट नाहीं असें म्हणतात.

किल्ला भुईकोट असून भक्कम अशा चुन्या मातींत दगडांनीं बांधला आहे. इ. स. १५७२ त अकबरानें हा किल्ला बांधला. गंगा–यमुना संगमानजीक हा किल्ला आहे. किल्ल्याच्या आंत शिपायांच्या बराकी चोहों बाजूंस बांधलेल्या आहेत. किल्ल्याच्या मध्यभागीं अशोक राजाचा सुमारें ३० फूट उंचीचा दगडी स्तंभ असून तो इ. सनाच्या २४० वर्षां-पूर्वीं अशोक राजानें उभारिलेला आहे. त्यावर त्यानें आपलीं आज्ञापत्रें

कोरलीं आहेत. अशोकच्या पुष्कळ शिलालेखांपैकींच हा एक असून त्यावर समुद्रगुप्ताचीही थोडी माहिती आहे. इ. स. १८०० मध्यें हा स्तंभ पडला होता, तो पुन्हां १८१८ त इंग्रजांनीं त्या ठिकाणीं उभा केला. असो. नंतर आम्ही किल्ल्याच्या तटावरून फिरूं लागलों. प्रत्येक ठिकाणीं इंग्रज शिपाई डोळ्यांत तेल घालून पहारा करीत होते. कारण माघमेळ्याची गर्दी जवळच होती. आमच्या बरोबर असलेला इंग्रज शिपाई सर्व माहिती मोठ्या आनंदानें व प्रेमळपणानें सांगत होता. तटाची, त्याचप्रमाणें शत्रूपासून कसा बचाव करावयाचा वगैरे माहिती सांगून तो म्हणाला, "आज सुट्टी आहे, नाहीं तर ॲम्यूनिशन फॅक्टरीही तुम्हांस दाखविली असती." किल्ल्यांत २ वर्षें पुरेल इतका दारूगोळा आहे असें त्यानें सांगितलें. किल्ल्याभोंवतीं पहिला तट असून जवळ जवळ २० फूट रुंद व ८ फूट खोल खंदक आहे. शत्रु आला तर या खंदकांत पाणी सोडावयाचें. पुढें मुख्य तट आहे. आम्हांस किल्ल्याच्या तिसऱ्या मजल्यावर नेऊन तेथें लपून कसें बसावयाचें वगैरे माहिती त्यानें सांगितली. बिचारे नारायणराव, आपणांस सर्व कांहीं समजलें असें दर्शवून, "अरे, देवाच्या दर्शनास चला," असें मला म्हणत. किल्ल्यावरून सर्व अलाहाबाद शहर दिसतें. किल्ल्याच्या डाव्या बाजूस यमुना नदीवरील व उजव्या बाजूस गंगा नदीवरील पूल फारच प्रेक्षणीय दिसतात. नद्यांचीं पात्रें अफाट, त्यामुळें पूलही फार लांब. कमींत कमी ३२३५ फूट लांबी असावी. किल्ला पाहून सोल्जरास Wish you happy and good new year म्हणून त्याच्या हातांत रा. देसाई यांनीं २ रुपये दक्षिणा टिकविल्यावर आम्ही पुन्हां गांवांत आलों. पेट्रोल भरून फिरत असतां एक प्रेत आडवें गेलें. प्रेत येथील लोक खाटेवरून नेतात. प्रेतावर फुलें वगैरे कांहीं घालीत नाहींत. मुख्य मुख्य इमारती, हायकोर्ट, गव्हर्नरचा बंगला, पंडित जवाहरलाल यांचें आनंदभुवन वगैरे पाहून चहा पिण्यास स्टेशनवर गेलों. येथील मुख्य तीर्थें–त्रिवेणीसंगम, सोमेश्वर, भारद्वाजेश्वर, अक्षय्यवट–इत्यादि होत. येथील रस्ते डांबरी असून गांवांत स्वच्छता फार आढळून येते. बैलगाडीस तीन बैल जुंपतात. येथें "बाबू" म्हणण्याचा फार प्रचार असून भाषा हिंदी आहे. लोकांना पान खाण्याची संवय आहे. देशभक्तीचें वारें लोकांत फार संचारलेलें दिसतें. शाळा–कॉलेजांच्या व

अलाहाबाद युनिव्हर्सिटीच्या इमारती पाहण्यासारख्या आहेत. पोलिसांचा पोषाख खाकी असून डोक्यावर तांबडें पागोटें असतें. येथें प्रवाश्यांकरितां श्रीकृष्ण लॉज, सिंध हॉटेल, कपूरचें हॉटेल अशीं पुष्कळ हॉटेलें आहेत. चहा घेऊन अलाहाबादेचे कानेकोपरे पाहून आम्ही ग्रँड ट्रंक रोडनें बनारसच्या मार्गास लागलों. गंगा नदीवरील फाउन्टन पुलावरुन हेलकावे खात पलीकडच्या तीरावर ४ वाजून ४५ मिनिटांनीं पोहोंचलों. अलाहाबाद ४–४० ला सोडलें. अलाहाबादेहून बनारस ८० मैल आहे. अलाहाबादपासून ५ मैलांवर आम्हांस फाफम स्टेशन लागलें. नंतर हिरापूर, सैदाबाद, गोपीगंज, मिर्झापूर, हीं शहरें व लहान खेडीं बरींच लागलीं. रस्ता फारच सुंदर असून दुतर्फा आंब्याचीं झाडें थेट बनारसपर्यंत दिसत होतीं. तीं पाहून नारायणराव म्हणत, "इकडे आंबे फार स्वस्त आहेत." "क्यूं बुधा, तेरा पितर सरग सरगया क्या नाहीं? मागें आला होतां तेव्हां काय पाहिलें?" असें भाऊसाहेबांनीं त्यांस विचारिलें. मीं नदीवर स्नान केलें, व नंतर पंड्याच्या घरीं जेवण करून त्यास दक्षिणा दिली. परंतु आज मीं पुष्कळ पाहिलें. या प्रांताचा (संयुक्त प्रांत) भूभाग सखल असून सुपीक आहे. त्यांतून गंगा व यमुना या नद्यांचे कालवे काढून पाणी सर्वत्र खेळविलें आहे.


लोक सुखी व सुदृढ आहेत. जागजागीं गव्हाचीं व उंसाचीं हिरवींगार शेतें दृष्टीस पडतात. ६–२५ ला आम्ही बनारसला पोहोंचलों. स्टेशनवर पत्रांची चौकशी केली. पहिल्यानें आम्हीं आमचा मोर्चा बनारस हिंदु युनिव्हर्सिटीकडे वळविला. रा. देसाई यांच्या ओळखीचे केमिस्ट्रीचे मुख्याध्यापक प्रो. राणे यांच्याकडे आम्ही ८ चे सुमारास जाऊन उतरलों. त्या वेळीं प्रो. राणे जेवावयास बसले होते. आमचें स्वागत त्यांच्या मंडळींनीं केलें व गड्यानें सामान वगैरे ठेवून दिलें. प्रो. राणे येऊन त्यांनीं आपला आनंद प्रदर्शित केला, व मोटारमधून कलकत्त्याचा प्रवास करण्याच्या आमच्या धाडसाचें त्यांनीं कौतुक केलें. पुढें आमचीं जेवणें झालीं. प्रो. राणे यांचे भाचे प्रो. देसाई यांनीं प्रश्नांचा भडिमार करून व आं अं अं चा हुंकार देऊन बरीच करमणूक केली. हे बनारस युनिव्हर्सिटींत इंग्लिशचे प्रोफेसर आहेत. नंतर आम्ही त्यांच्या बंगल्याच्या दुसऱ्या मजल्यावर झोंपण्यास गेलों.

अरुणोदय होऊन त्याच्या सुवर्णमय किरणांची छटा बनारसच्या दशदिशांत पसरलेली होती. लगबगीनें घरट्यांमधून बाहेर पडणाऱ्या पाखरांचे थवे किलबिल करीत नीलवर्ण आकाशाच्या पोकळींत बागडत होते. प्रोफेसरसाहेबांच्या प्रशांत आश्रमानजीकच्या प्रदेशांत हिरवेगार तरु, लता व पुष्पें हांसत होतीं, व आम्ही डोळे चोळीत उठत होतों. नूतन वर्षाची दुसरी सकाळ आम्ही पवित्र काशी क्षेत्रांत घालवीत आहोंत याबद्दल आम्हांस फारच आनंद होत होता (ता. २–१–३४ मंगळवार).


मुखमार्जन वगैरे विधि करून आम्ही प्रो. राणे यांजबरोबर बनारस युनिव्हर्सिटी पाहण्यास गेलों.

बनारस युनिव्हर्सिटी

ही युनिव्हर्सिटी बनारस गांवापासून २ मैलांवर आहे. एकंदर आवार २१ एकरचें आहे. आम्ही पहिल्या प्रथम प्रो. राणे यांच्या केमिस्ट्रीचे इमारतींत गेलों. त्यालगत फिजिक्सची इमारत आहे. नंतर आयुर्वेदिक कॉलेज पाहून औद्योगिक कॉलेज पाहण्यास गेलों. ह्या कॉलेजांत साबण, अत्तर, मातीचीं चित्रें, सुवासिक तेलें वगैरे तयार करण्याचें शिक्षण दिलें जातें. नंतर इंजिनीअरिंग कॉलेज. ॲम्फि थिएटर, वुइमेन्स कॉलेज व वसतिगृहें पाहून ११ चे सुमारास परत आलों. पंडित मदन मोहन मालवीय हे या विश्वविद्यालयाचे उत्पादक बंगल्याच्या पोर्चमध्यें उभे होते. येथील विद्यार्थी सर्वांस "नमस्ते" म्हणतात, व त्यांच्या एकंदर वागणुकीवरून ते नम्र व शिस्तशीर दिसतात. जेवण झाल्यावर बनारस शहर दाखविण्याकरितां गांवांतील एक शिक्षक प्रो. राणे यांनीं आमच्याबरोबर दिले होते; त्यांस घेऊन आम्ही बनारस शहरांत पवित्र गंगेच्या कांठीं आलों. तेथें एक होडी ठरवून गंगेवरील घाट पाहण्यास निघालों. मास्तर आम्हांस सर्व माहिती सांगत होते.



चेतसिंगचा राजवाडा, बनारस (पान ४४)



काशी विश्वेश्वराचें देऊळ, बनारस (पान ४४)

काशीक्षेत्र

" What Rome is to the Roman Catholic, or what Mecca is to the Mahommedens, that, or more, is Benares to the Hindus. It is the most Sacred City of Hinduism, the stronghold of Brahmans; the seat of Sanskrit learning and the home of Indian Philosophy. "

बनारस ऊर्फ काशी हें हिंदूंच्या सर्व क्षेत्रांमध्यें अतिशय पवित्र, पुरातन व प्रसिद्ध क्षेत्र आहे. हें गंगा नदीच्या उत्तर किनाऱ्यावर वसलें असून, गंगेचें पात्र अफाट व चंद्राकृति आहे. नदींतून मोठमोठे मचवे व बोटी यांमधून व्यापार चालतो. पाणी तुडुंब पण संथ वाहतें. गंगा नदीच्या कांठावर अदमासें ९० घाट आहेत; त्यांपैकी कांहीं खालीलप्रमाणें:—

खोळा घाट, राजा सोमेद घाट, देवी अहिल्याबाई घाट, दरभंगा घाट (अर्धा मुसलमानांकरितां), राणा घाट (उदेपूरचा), चौसष्टी घाट, विगापटीचा घाट (बंगाली लोकांनीं बांधिला आहे), पोड घाट, तुलसीदास घाट (या घाटावर बसून तुलसीदासानीं आपलें हिंदी रामायण लिहिलें), ब्रह्मा व दुर्गा घाट (दक्षिणेंतील लोकांकरितां), हनुमान धोबी घाट, वाराणसी घाट (असी आणि अरुणा या नद्या गंगेस येथें मिळतात), केदारेश्वर घाट (येथें यात्रेकरूंस अन्न मिळतें), हरिश्चंद्र घाट (जेथें हरिश्चंद्र राजाचा लिलांव झाला व डोंबानें त्यास विकत घेतलें ती ही जागा. जवळ डोंबाचें घर असून तें त्यांचे वंशजांचे ताब्यांत आहे), निरंजनी आखाडा (येथें नग्न साधु राहतात.), हनुमान घाट, बिंधुमाधव घाट (जवळ औंधचे प्रतिनिधींचें देऊळ आहे), बिंधुमाधवाचें देऊळ औरंगजेबानें मोडून मशीद बांधली आहे. तिला उंच मनोरे असून त्यांच्या १४० पायऱ्या आहेत. त्या मनोऱ्यांवरून सर्व बनारस व दहा मैलांच्या टापूमधील आसपासचा प्रदेश दिसतो. या मनोऱ्यांस औरंगजेब मनोरा म्हणतात. इ. सन १६४२ त जयपूरच्या महाराजांनीं बांधलेली ऑब्झर्व्हेटरी आहे. नंतर मीर घाट, भजनाश्रम (ह्या आश्रमांत २४ तास भजन चालतें. हा आश्रम स्त्रियांचा असून सतत स्त्रियाच भजन करीत असतात). नंतर नेपाळी खपला

(नेपाळी लोकांकरितां), ललिता घाट, मणिकर्णिका घाट (या घाटाजवळ लहानसें कुंड आहे. कुंडांत पार्वती आंघोळ करीत असतां तिची नथ त्यांत पडली व ती शंकरांनीं काढली म्हणून या कुंडांत, वेणीदान व इतर धार्मिक विधि झाल्यावर, यात्रेकरू स्नान करतात.) पुढें शिंदे घाट, याचा अर्धा घाट पडलेला आहे. नागपूरच्या भोसल्यांचा घाट, पंचगंगा घाट, व जवळच पेशव्यांच्या बाळाजीचें देऊळ आहे. भोसले घाटावर एक दगडाचा सिंह कोरला आहे. त्याच्यावरून गंगेचें पाणी गेलें म्हणजे महापूर आला असें समजतात व त्यास इंद्रदमन म्हणतात. त्यांत जो आंघोळ करील तो मनुष्य महात्मा गणिला जातो. असो; अशा रीतीनें जवळ जवळ २ मैल गंगा नदींत होडींतून फिरून आलों व काशी-विश्वेश्वराच्या दर्शनास निघालों. बोळकंडी रस्त्यांतून जातांना आम्हांस पंढरपूरची आठवण झाली. रुंद व दगडाच्या फरशा घातलेला रस्ता, दोहों बाजूंस चार पांच मजली इमारती, त्यांतली मेवामिठाईचीं, दुधाचीं व कापडाचीं दुकानें पाहात पाहात " काशी, करवट " देवळांत गेलों. हें देऊळ तळघरांत आहे. तळघरांत जाण्यास पायऱ्या असून आंत गर्द अंधकार आहे. देवळांत महादेवाची पिंडी आहे. हल्लीं तळघरांत पुजाऱ्याशिवाय कोणास जाऊं देत नाहींत. कारण पूर्वीं तेथील पुजारी लोक भाबड्या यात्रेकरू लोकांस तळघरांत दर्शनास नेऊन लुबाडीत व ठार मारीत. अलीकडे लोखंडी सळया घालून वरच्या मजल्यावर जाळी केलेली आहे. तेथून लोक दर्शन घेतात. आम्हींही तेथूनच दर्शन घेऊन तळघराचा दरवाजा पाहून परतलों. पुजाऱ्यानें 'पैसा देव, धर्म करो,' म्हणून सतावून सोडिलें. एका धनाढ्य पंड्याच्या ताब्यांत हें देऊळ आहे. तेथून आम्ही काशी-विश्वेश्वराच्या देवळांत गेलों. बोळकंडी रस्ते. देवळाचे समोर फुलांचें दुकान आहे, तेथें फुलें घेतलीं. फुलें घेतांना पायांतला जोडा काढावा लागतो, व नंतर ते आपल्या हातावर पाणी टाकून फुलें देतात. काशी-विश्वेश्वराचें देऊळ लहान असून आंतील भागांत यात्रेकरूंची बरीच गर्दी दृष्टीस पडते. मूर्तीच्या उजव्या बाजूस घंटा आहे. महादेव-पार्वतीच्या मूर्ती असून, काशी-विश्वेश्वराची फुलांनीं मंडित केलेली पिंडी आहे. आंतील शांततामय गाभारा पवित्र वाटतो. देवळापुढील मंडपाच्या जमिनीवर पुष्कळ रुपये ठोकले आहेत. जवळच मारुती व पांच पांडव यांच्या मूर्ती असून,

धर्मराजा, यात्रेकरूंचे " पुण्यपाप को साक्ष रहाता है " असें दर्शविलें आहे. देवळाचा घुमट व कळस सोन्याचा आहे. मनोभावानें दर्शन घेऊन आम्ही बाहेर पडलों, तोंच गरीब म्हाताऱ्या भिक्षुकांनीं आम्हांस गराडा घातला. त्यांस पैसे देऊन जुन्या देवळांकडे गेलों.

पूर्वींचें काशी-विश्वेश्वराचें देऊळ औरंगजेब बादशहानें फोडून त्याची मशीद बनविली आहे. त्या देवळाच्या किंवा हल्लींच्या मशिदीपुढें काशी-विश्वेश्वराचा मोठा नंदी आहे. त्याचें तोंड मशिदीकडे आहे. औरंगजेब कदाचित् तो नंदी फोडण्यास घाबरला असेल ! म्लेंच्छांच्या हातून पवित्र-पणा भ्रष्ट होऊं नये म्हणून देवानें (' काशी-विश्वेश्वरानें ') जवळ असलेल्या विहिरींत उडी टाकली असें सांगतात. त्या विहिरीस ज्ञानवापी ऊर्फ 'ग्यान-कूप' असें म्हणतात. ग्यान-कूपाची पूजा भाविक व यात्रेकरू लोक करतात. आम्हीं ग्यान-कूपाचें दर्शन घेतलें. तेथें बरेच विद्यार्थी संस्कृताचें पठण करीत बसले होते. आमचे नारायणराव आनंदांत होते. पुढें आम्ही जवळच असलेल्या बाजारपेठेंत गेलों. तेथें कुंकू व गंडे खरेदी केले. प्रवास करीत असतांना, नारायणराव, " तुम्ही काशीस चला, पांच रुपयांस एक पानाची पट्टी देतों " असें म्हणत. त्याची आठवण भाऊसाहेबांस होऊन " क्यूं बुवा, किदर है तुमारा पांच रुपयेका पानपट्टी ? " असें त्यांनीं विचारलें. " अरे, चलो आगे पिछे होया तो देखा, " असें नारायणराव म्हणाले. शेवटीं आमच्याबरोबर असलेल्या मास्तरांनीं प्रसिद्ध पानपट्टीचें दुकान दाखविलें व तेथें १ आण्यास १ याप्रमाणें आम्हीं पट्ट्या विकत घेतल्या. बनारसी पानें हिंदुस्थानांत फार प्रसिद्ध आहेत. तसेच आंबे व पेरूही प्रसिद्ध आहेत. नंतर आम्ही मास्तरांच्या घरीं गेलों, ते 'साक्षी विनायक लेन' मध्यें राहतात. त्यांनीं बिस्किटें व इतर खाद्य पदार्थ देऊन आमचें चांगलेंच स्वागत केलें; तोंपर्यंत पुऱ्या व भाजी पुढील प्रवासाकरितां नारायणराव घेऊन आले. येथील पितळेचीं भांडीं नामांकित असून रेशमी कापडाविषयीं हें शहर प्रसिद्ध आहे. येथील वेलबुट्टयांच्या शाली, जरतारी, नकशीदार लुगडीं व कापड हीं प्रसिद्ध आहेत. शहर गजबजलेलें असून टुमदार आहे. रस्ते डांबरी असून विजेच्या दिव्यांनीं सुशोभित केलें आहेत. येथें राजा चेतसिंग याचा राजवाडा असून, विजयानगरच्या राजपुत्राचाही वाडा

आहे. बनारसमधून फिरत असतां एके ठिकाणीं गाडी उभी करून मास्तरांनीं खालील माहिती सांगितली :—

काशीच्या चेतसिंग राजाकडे वॉरन हेस्टिंग्ज जेव्हां पैसे मागण्यास त्याच्या राजवाड्यांत आला, तेव्हां त्याला चेतसिंगाकडून पैसे मिळाले. पण तेवढ्यानें त्याचें समाधान होईना म्हणून त्यानें आणखी पैशाची मागणी केली, ती चेतसिंगानें नाकारली; व पुढें चेतसिंगाच्या लोकांनीं वॉरन हेस्टींग्जला पकडण्याचा घाट घातला. आमची गाडी ज्या जागीं उभी होती त्या ठिकाणीं तो लपून बसला होता. सुदैवानें त्या रस्त्यानें एक हिंदी व्यापारी चालला होता, त्यास त्यानें हांक मारून आपल्या सुटकेबद्दल त्याजपाशीं याचना केली. त्या व्यापाऱ्यानें, त्यास स्त्रीचा पोषाख चढवून, एका डोलीमध्यें बसवून चुनार मुक्कामीं सुखरूप पोहोंचविलें. ह्याच जागेवर हल्लीं "किंग एडवर्ड हॉस्पिटल्" आहे. बनारसपासून ४ मैलांवर 'सारनाथ' म्हणून गौतमबुद्धाचें तपश्चर्या करण्याचें व राहण्याचें सुंदर अरण्य आहे. तेथें जुन्या शिलालेखांकांचा संग्रह करून ठेविला आहे. त्या ठिकाणीं एक स्तंभ असून, गौतमबुद्धानें आपलें "निर्वाण" तत्त्व येथें शिकविलें, त्याचें तो स्तंभ द्योतक आहे. नंतर आम्हीं स्टेशनवर जाऊन चहा घेतला. येथें तीन स्टेशनें आहेत (बनारस कॅन्टोन्मेंट, काशी व बनारस). इंग्रजांची छावणी येथें असून पायदळ व घोडदळ बरेंच आहे. ५–४० वाजतां आम्ही गंगा किनाऱ्यावर आलों. तेथें, आमच्याबरोबर येऊन ज्यांनीं आम्हांस सर्व शहर दाखवून माहिती सांगितली त्या श्री. मोहनलाल यांचे मनःपूर्वक आभार मानून आम्ही ५–४५ ला पुढील मार्गास लागलों.

बनारस ते पारसनाथ

बनारसपासून आम्हांस अजून अजमासें ४३० मैलांची मजल मारावयाची होती. म्हणून गाडीचा वेग वाढवून प्रवास झपाट्यानें करण्याचें

ठरविलें. बनारसपासून ११ मैलांवर, आम्हांस मोगलसराई हें छोटेंसें गांव लागलें. हें East India Railway चें स्टेशन असून, दळणवळणासाठीं येथें उत्कृष्ट पूल बांधिला आहे. ज्याप्रमाणें हिंदु लोक दिवाळीमध्यें विपुल दिवे लावतात, त्याप्रमाणें ह्या स्टेशनच्या आजूबाजूस दिवेच दिवे लावले होते. तेथें चोरी फार होते, म्हणून दिवे जास्त असें चौकशीअंतीं आम्हांस कळलें. थंडी खूप पडली होती व धुकेंही खूप पसरलेलें होतें. संध्याकाळ झाल्यामुळें आजूबाजूची सृष्टीशोभा आम्हांस पाहण्यास मिळाली नाहीं. कांहीं वेळानें आम्ही शोण नदीच्या कांठीं देहरी गावांजवळ आलों. देहरी स्टेशनमास्तरांस आमची मोटारगाडी नदीच्या पैलतीरावर नेण्याविषयीं बनारसहून आम्ही तारेनें आगाऊ कळविलें होतें. त्याप्रमाणें स्टेशनमास्तरांस भेटून आम्ही आमची गाडी उघडया वॅगनमध्यें ठेवून दिली. तुमची गाडी १२-२५ च्या ट्रेननें जाईल, असें स्टेशनमास्तरकडून आम्हांस सांगण्यांत आलें. तोंपर्यंत आपण वेटिंग रूममध्यें बसावें, असें म्हणून त्यांनीं पोर्टरला फर्स्ट क्लास वेटिंग रूम उघडण्यास सांगितलें. शोण नदीच्या पैलतीरीं किंवा ऐलतिरीं मोटारीची नेआण करण्यास रेल्वेस १० रु. भरावें लागतात, व प्रत्येक प्रवाश्याकडून सेकंड क्लासचें भाडें ८ आणे घेतात; ते सर्व पैसे भरून आम्ही वेटिंग रूममध्यें गेलों, त्या वेळीं ८-५५ झाले होते. जवळ जवळ तीन तास आम्हांस तेथें काढावयाचें होते. खाण्याचे डबे काढण्यास आम्ही गेलों. डबे काढतांना श्री. भाऊसाहेबांच्या हातून मोठा टॉर्च लाईट पडला; परंतु तो सुरक्षित राहिला. माझ्याही हातून एक डबा रेल्वेलाइनवर पडला, परंतु त्यांतील कांहीं सांडलें नाहीं.

वेटिंग रूममध्यें बनारसहून आणलेलें पुरीचें व भाजीचें गांठोडें उघडून खाण्यास सुरुवात केली. भाजी फारच थोडी होती. आम्हीं सर्वांनीं कावकाव करून रा. नारायणरावांस पुष्कळच त्रास दिला. वाटेल तें बोललों पण नारायणराव फारच शांत व गंभीर राहून, हंसण्यावारी त्यांनीं सर्व घालविलें. साठ वर्षांचे म्हातारे, पण वृत्ति अगदीं गौतमबुद्धासारखी शांत होती. कितीही चेष्टा करा ते हूं कां चूं करीत नसत. आम्ही तेथील चहावाल्यास चहा करण्यास सांगितलें होतें, तो चहा घेऊन आला. त्याचा अवतार व घाणेरडया कपबशा पाहून, श्री. भाऊसाहेबांनीं त्यास पैसे देऊन

चहा परत घेऊन जाण्यास सांगितलें. नंतर आम्ही स्टेशनमास्तरांकडे गेलों. स्टेशनमास्तर एक छोटीशी वामनमूर्ति टेलिफोन हातांत घेऊन "देहरी-दे-ह-री, हॅलो....देहरी, माय डीअर देहरी" असे शब्द उच्चारून मध्येंच एकदम हांसत व पुन्हां देहरी म्हणत. आम्ही थोडा वेळ उभें राहून मी व भाऊसाहेब, 'ओ देहरी, ओ देहरी,' म्हणत प्लॅटफॉर्मवर आलों. त्या वेळीं आकाशांत असंख्य तारा, आपल्या स्फटिकशुभ्र तेजानें पृथ्वीस रुपेरी मुलामा देण्यांत गुंग झाल्या होत्या व चंद्रराज त्यावर हांसत-खिदळत देखरेख करीत होता. सर्वत्र शांतता पसरलेली होती. थंडीही खूप पडलेली होती. आमचा 'बुधा' विडीचे झुरके मारण्यांत गुंग झालेला दिसत होता. रा. देसाई पान खाण्यांत दंग झाले होते; मी व भाऊसाहेब एकमेकांच्या गळ्यांत हात घालून, चांदण्या रात्रींचें निरीक्षण करीत व गप्पा मारीत प्लॅटफॉर्मवर फिरत होतों. आगगाड्यांची ये-जा सारखी सुरू होती.

देहरी ऑन शोण

देहरी हें गांव शोण नदीवर वसलें आहे. गांव लहान असून स्टेशनामुळें त्याला फार महत्त्व आलें आहे. देहरीपासून शोण नदीवर पूल बांधिला आहे. शोण नदीच्या पलीकडील बाजूस 'ईस्ट सोन बँक' नांवाचें स्टेशन आहे. येथें शोण नदीची रुंदी कमींत कमी दोन किंवा अडीच मैल आहे. रेल्वे कंपनीनें बरेच पैसे खर्चून तीन मैल लांबीचा पूल बांधिला आहे. दळणवळणासाठीं दुसरा पूल नाहीं. जवळच आसाम, बंगाल, ब्रह्मदेश असल्यामुळें लाकूड, तांदूळ, रॉकेल वगैरे मालाची वाहतूक सारखी चालू असते. एका मालगाडीस आमच्या मोटारचा डबा जोडला. आम्हांसही त्या डब्यांत आमच्या मोटार गाडींतच बसावें लागलें. आगगाडी व मोटार या दोन्हींत एकदम बसण्याचा आमचा हा आयुष्यांतील पहिलाच प्रसंग. रात्रौ १-५ ला आम्ही 'ईस्ट सोन बँक' स्टेशनवर येऊन पोहोंचलों. आमचा डबा विभक्त

करण्यांत आला. मोटारगाडींत रा. देसाई, नारायणराव व भाऊसाहेब हे झोंपले होते. इतक्यांत भाऊसाहेबांस कसलेंसें वाईट स्वप्न पडून तें खाडकन् उठून मला म्हणालें, "मास्तर येथें भुतें असावींत, मला फारच वाईट स्वप्न पडलें." मीं त्यांची समजूत करून, पोर्टरास डबा दुसऱ्या प्लॅटफॉर्मवर नेण्यास जरा दम देऊनच सांगितलें. नंतर दोन तासांनीं म्हणजे रात्रीं तीन वाजतां गाडी बाहेर काढून, स्टेशननजीक उभी केली. रात्रीचा मुक्काम तेथेंच करण्याचें ठरलें. श्री. भाऊसाहेब व देसाई मोटारमध्यें झोंपलें. मी, नारायणराव व जोसेफ, तेथील इमारतीच्या पडवींत झोंपलों. मला कांहीं झोंप आली नाहीं. आम्ही झोंपलों ती जागा एका मुसलमान हॉटेलची होती. तेथें कांद्याचा व कसला कुजकट वास सारखा येत होता. पहांटे पांचाच्या सुमारास, एक थंडीनें कुडकुडत असलेलें कुत्रें नारायणरावांच्या पायथ्यास येऊन झोंपलें. आळसानें नारायणरावांनीं आपले पाय जरा जोरानें ताणलें, त्याबरोबर तें कुत्रें कँव कँव करीत उठलें. नारायणराव डोक्यावर पांघरूण घेऊन झोंपले होते, ते अर्धवट झोपेंत, मास्तर कोण आया ? असें म्हणाले. मी थट्टेनें चोरबीर असेल, असें म्हणालों. 'क्या' म्हणून ते उठले व पाहतात तों कुत्रें !

नव्या वर्षाची तिसरी सकाळ उजाडली (३-१-१९३४). आम्हीं सकाळचें विधी उरकून, जवळच असलेल्या हॉटेलमधील पेटविलेल्या शेगडीभोंवतीं बसून शेक घेऊं लागलों. गरम गरम जिलबी, पुरी व आलूकी भाजी (बटाटा भाजी) खाऊन गरम चहा प्यालों. एका आण्यास पावशेरप्रमाणें पुढील चहासाठीं थरमॉसमध्यें दूध घेतलें. तेथील लोक चहा न घेतां सकाळीं पुरी व भाजी खातात. तसेंच, पाणी किंवा दूध लाल बोळक्यांत देतात. त्यास ते 'कटोरी' म्हणतात. त्याचा उपयोग झाल्यावर तें फोडून टाकतात. कपबशा मिळत नाहींत. सर्व विधि होण्यास आम्हांस सकाळचें ८ वाजलें. ईस्ट सोन स्टेशन ८-३५ ला सोडलें व ग्रँड ट्रंक रोडनें मार्गक्रमण सुरू केलें. ईस्ट सोन येथें संयुक्त प्रांताची (U. P.) हद्द संपून बिहार-ओरिसा प्रांतांची हद्द सुरू होते.

पांच सहा मैलांवर बिहार प्रांतांतील एक खेडेगांव लागलें. तेथें एक शाळा दिसली. मुलें रस्त्याच्या बाजूस एका झाडाखालीं बसून शिकत

होतीं. त्यांचा मास्तर सुतार असावा. कारण तो लांकडें ताशीत होता. लांकडें ताशीतच तो मुलांचे तास घेत होता, व कांहींसें पुटपुटून शिकवीत होता. थंडी फारच लागू लागली म्हणून मोटारचे पडदे सोडले. जवळच मैल दर्शविणारा दगड होता. तो कलकत्ता ३२८ मैल आहे असें दर्शवीत होता. 'क्या' कितना लंबा कलकत्ता होया?" म्हणून नारायणरावांनीं विचारलें. ईस्ट सोनपासून २२ मैलांवर ससराम गांव लागलें. बिहार प्रांतांतील शहाबाद हें जिल्ह्याचें ठाणें आहे. या गांवीं हुमायूनचा पराभव करून ज्यानें स्वपराक्रमानें दिल्लीची बादशाही मिळविली होती, त्या इतिहासप्रसिद्ध शेरशहाची कबर आहे. गांव टुमदार असून तेथें डाक बंगला आहे. ससरामपासून ३० मैलांवर औरंगाबाद लागलें.

औरंगाबाद, गया जिल्ह्याची व्यापाराची पेठ असून तेथें सरकारकचेरी आहे. येथें शाळा, हॉस्पिटल् व डाक बंगला आहे. आम्हीं पेट्रोल भरलें, त्या वेळीं आमच्या घड्याळांत ९-१० झाले होते. औरंगाबादेच्या पुढें ३० मैलांवर सरकाटी हें अद्री नदीवर बसलेलें गांव लागलें. येथें डाक बंगला असून आवश्यक वस्तू मिळूं शकतात.

सूर्याचे किरण आपलें उग्र स्वरूप दाखवूं लागले व त्यामुळें थंडी साधारण कमी वाजूं लागली, म्हणून आम्ही मोटारचे पडदे वर केले. १० वाजले होते. सरकाटीहून गयेस रस्ता फुटतो. तेथून गया २१ मैल आहे. आम्हीं गयेस जाण्याचा बेत रहित केला. पुढें ७ मैलांवर 'धोबी' लागलें. तेथें जरा विचारपूस करून तेथून २७ मैलांवर असणाऱ्या चोपरानचा रस्ता पकडला.

जिकडे तिकडे गगनचुंबित पर्वतांचीं शिखरें दिसूं लागलीं. 'हाच तो पूर्वघाट!' असें आम्ही आपसांत म्हणूं लागलों. पूर्वघाटाची शोभा कांहीं औरच. पूर्वघाटाच्या कड्यांमधून ग्रँड ट्रंक रोड गेलेला असल्यामुळें आम्हांस अपूर्व शोभा पाहण्यास मिळाली. रस्त्यावर गारगोटीचा बारीक चुरा पसरलेला होता. ह्या गारगोटीचा बनारसच्या औद्योगिक शाळेमध्यें कपबशा व हरतऱ्हेचीं चित्रें करण्यांत उपयोग करितात. इतक्यांत कलकत्ता येथून २५१ मैल आहे असें दाखविणारा दगड दिसला, व दोन रस्ते दाखविणारी पाटी लागली. एक रस्ता पाटणाला जातो व दुसरा कलकत्त्यास जातो. पाटणा येथून १२५ मैल व कलकत्ता २५१

मैल आहे असें त्या पाट्या दर्शवीत होत्या. येथील रस्ता १८२९ मध्यें W. B. Mack कंपनीनें तयार केल्याच्या पाट्या रस्त्याच्या दुतर्फा लावल्या होत्या. मोंगीर जिल्ह्यांतून आम्ही प्रवास करीत होतों. इतक्यांत चोपरान लागलें. चोपरान येथें न थांबतां आम्ही तेथून २९ मैलांवर बहारी येथें थांबलों. बाराला पांच मिनिटें कमी होती. पांच मिनिटें विसावा घेऊन निघालों. बहारीपासून रांची ८२ मैल आहे. बहारी येथें डाक बंगला आहे. पुढें करायतपूर लागलें.

भुकेचीं चिन्हें सर्वांच्या तोंडावर दिसूं लागलीं, म्हणून कोठें तरी नदी–ओढ्याकांठीं मुक्काम करण्याचें आम्हीं ठरविलें. ओढे व नाले पुष्कळ लागले, पण त्यांत पाणी अगदीं थोडें असून सांचलेलें व गलिच्छ होतें. कोठें पाण्याची सोय आहे कीं काय याचा शोध करितां करितां आम्हीं अगदीं कंटाळून गेलों. पुढें एक दोन गृहस्थ भेटले. त्यांनीं २ मैलांवर इसरी नांवाची नदी असून डुंबरी गांव आहे असें सांगितलें. तेवढें अंतर आम्हीं फारच थोड्या वेळांत तोडलें, पण तेथेंही आमची निराशाच झाली. इतक्यांत आम्हांस बगोदर गांव लागलें. बगोदरपासून हजारीबागचा रस्ता फुटतो. बहारीपासून ३२ मैलांवर बगोदर आहे. तेथें विहिरीजवळ जाऊन कांहींतरी खावें, असें नारायणराव म्हणाले, पण त्यांचें म्हणणें न ऐकतां आम्ही पुढें प्रवास करूं लागलों. शेवटीं बगोदरपासून १२ मैलांवर अटक गांवांतील डाक बंगल्यांत आम्ही गेलों. बंगला पाहून, विहिरींतील पाणी पाहण्याकरितां विहिरीजवळ गेलों, तों पाण्यावर तवंग येऊन त्यांत नाना तऱ्हेचे किडे जलक्रीडा करीत असल्याचें दिसलें. तें पाहून भाऊसाहेबांनीं तेथें उतरण्याचा बेत रहित केला. तेथील म्हातारी मोठमोठ्यानें रखवालदारास हांका मारूं लागली. आमची गाडी चालू होतांच तो आला व त्यानें नमस्कार केला. तो स्वीकारून आम्हीं गाडी चालू केली.

पिण्यालायक पाणी कोठें दिसतें कीं काय इकडे आम्हां सर्वांची नजर होती. प्रवास फार रुक्ष वाटत होता. तों पुढें बकू खेड्याजवळ एक उत्कृष्ट ओढा दिसला व आम्हीं गाडी झाडांच्या शीतल छायेंत उभी केली. २–३० वाजलें होतें. सर्वजण पाण्याच्या आशेनें ओढ्याजवळ गेलों. पाणी पिऊन

झाल्यावर नेहमीचें साहित्य काढिलें. मीं स्टोव्ह पेटविला. भाऊसाहेब पाव कापण्याच्या व त्यास जाम व मस्का लावण्याच्या तयारीस लागले. नारायणराव कांदा कापूं लागले. देसाई अंडीं फोडून ऑमलेट करण्याच्या उद्योगास लागले. जोसेफ पाणी आणण्यास गेला. जो तो आनंदानें आपापलें काम करण्यांत गर्क झालेला दिसत होता. गाडीमधील बसण्याच्या गिर्द्या काढून, त्या झाडांच्या छायेंत पसरून, अधाशाप्रमाणें पानांचा व १५–२० अंड्यांचा आम्हीं फन्ना उडविला. नंतर ओढ्यावर जाऊन हातरुमाल धुतले. थोडा वेळ पाण्यांत हातपाय घालून, अडविलेल्या पाण्याचे बंधारे मोडून टाकिले. हा ओढा फारच रमणीय होता, म्हणून आम्ही लहान मुलांप्रमाणें त्यांत खेळत बसलों. वाहात जाणाऱ्या पाण्याचा तो रुमझुम आवाज; मध्येंच वाळलेल्या काटक्या व पानें बळजबरीनें तो आपल्या ओघांत ओढून नेत होता; कोठें कोठें लहान लहान बुडबुडे आपल्या क्षणभंगुर आत्मप्रौढीचा तोरा मिरवून नाहींसे होत होते. चिमण्या, सुतार व इतर पक्षी स्वच्छंदानें स्नान करून, आपले पंख फडफडवीत सूर्याकडे चोंच करून पाहात होते; गाईंची व इतर जनावरांचीं खिल्लारें मनसोक्त पाणी पिण्यांत गुंग झालेलीं दिसत होतीं व आम्ही सर्व हें पाहण्यांत दंग होऊन, मोटारगाडीजवळ येऊन स्वस्थ विश्रांति घेत पडलों होतों.

बिहार प्रांत

प्राचीन काळीं या प्रदेशांस मगध देश म्हणत असत. या प्रांतांत पूर्वीं बौद्धधर्मी लोकांनीं पुष्कळ विहार म्हणजे मठ बांधिले, यावरून त्यास बिहार किंवा बहार हें नांव प्राप्त झालें. हा प्रांत उंचवटचाचा असून पूर्वघाटांनीं वेष्टिला आहे. जमीन फार सुपीक असून कालव्याच्या पाण्याचा भरपूर पुरवठा आहे. त्यामुळें गहूं, तांदूळ, सातू या देशांत फार पिकतात. अफू व नीळही होते. आम्ही तेथें गेलों तेव्हां हवा फारच थंड होती. हिंदु-

स्थानच्या पूर्वघाटानजीक बिहार व पश्चिम घाटाजवळील कोंकण प्रांत, ह्यांमध्यें बरेंच साम्य आहे. येथील लोक सशक्त असून काटक आहेत. कोळ, उरावण वगैरे जातींचे रानटी लोक, इकडे सतत गुरांचीं खिल्लारें घेऊन भटकत असतात. येथील स्त्रिया अंगांत चोळी घालीत नाहींत. शेती, गुरें पाळणें व लांकडें तोडणें हे मुख्य धंदे. जनावरें फारच ठेंगू आहेत. बैल आणि गाय २ ते २॥ फूट उंच असतात. शेळीची उंची शिकस्त १॥ फूट असेल. हें पाहून आम्हांस मजा वाटली. ह्या जनावरांची पैदास जवळच असणाऱ्या नेपाळ प्रांतांत झालेली आहे, असें एका गृहस्थानें आम्हांस सांगितलें. ह्या जनावरांस नेपाळी जनावरें म्हणतात.

बिहार प्रांताचें सृष्टिसौंदर्य फारच मनोवेधक व नयनमोहक आहे. करडया रंगाचें रांकट कडेपठार व त्यांचीं उंच उंच शिखरें, त्यांमधन वाहणारे चिमुकले ओढे व नाले, त्यांच्यानजीक सागाचे व लांबलचक लतापल्लवांनीं शृंगारलेले नाना तऱ्हेचे प्रचंड वृक्ष, हाडांच्या सांपळयासारखे पांढरट कळकाचे व बांबूचे ताटवे, त्यांमधून प्रशांत जागीं गवती छपराचे मातीचे आश्रम, त्या आश्रमाभोंवतीं घातलेलें कुंपण, व त्या तीन फूट उंचीच्या व २ फूट रुंदीच्या कुंपणावर असलेलें कौलारी छप्पर पाहून मोठें कौतुक वाटलें. जागजागीं विहिरी दृष्टीस पडतात. त्यांचें पाणी शॅडुफच्या पद्धतीनें काढतात. त्यास ते लाट म्हणतात.

चार वाजण्यास पांच मिनिटें कमी असतांना आम्हीं विश्रांतीच्या जागेवरून उठून सामानसुमान व्यवस्थित लावन चार वाजतां पुढील प्रवासास सुरुवात केली. भरपूर विश्रांति मिळाल्यामुळें आम्ही मोठ्या उत्साहानें प्रवास करूं लागलों. मध्येंच भाऊसाहेब नारायणमहाराजांची चेष्टा करीत. मला झोंप न मिळाल्यामुळें माझ्या तोंडावरील तजेला नाहींसा झालेला होता. तें पाहून "काय मास्तर घरची काळजी लागली वाटते; आणि इतक्यांतच थकलात वाटतें!" असें म्हणून ते मलाही चिडवीत. माझें लक्ष रस्त्याच्या बाजूच्या भातांच्या शेतांकडे होतें. मी, भाऊसाहेब व देसाई बनारसच्या पानांत, कानपूरचा सुवासिक मसाला घालून विडे खात व गप्पा मारीत प्रवास करीत होतों.

लगबगीनें घरट्याकडे परतणाऱ्या पक्षांचें थव्यांचे थवे दिसूं लागले,

संध्याकाळीं तांबूस किरणांची छटा पसरून सूर्य पश्चिमेकडे जाऊं लागला व आमचे नारायणराव झोंपेनें गुंग झाले. गाडी एकदम थांबली, नारायणराव जागे झाले; रेल्वेचें फाटक उघडलें व आम्ही रेल्वे लाईन ओलांडून छोटा नागपूरच्या हद्दींतील पारसनाथ डोंगराच्या पायथ्यालगत प्रवास करूं लागलों. **पारसनाथ** हें जैन लोकांचें पवित्र स्थान सुमारें ४५०० फूट उंचीच्या डोंगराच्या माथ्यावर आहे. देऊळ फार अंतरावरून दिसतें; त्यास पांढरा रंग दिलेला आहे. येथें बरेच जैन लोक यात्रेस येतात. ह्या डोंगरास पारसनाथाचा डोंगर म्हणतात. देखावा फारच रम्य दिसतो. पारसनाथाच्या डोंगरासभोंवार पसरलेली ती हिरवीगार वनशोभा पाहून, आमच्या थकलेल्या मनाला हुषारी वाटत होती. वनदेवीच्या या बिलोरी राजमहालांत आमची गाडी शिरतांच, प्रवासाचे श्रम आम्ही केव्हांच विसरून गेलों. हिरवीगार गर्द झाडी; व पांढरी सुवासिक फुलें आपला सुगंध दशदिशांत उधळीत होतीं, व तें सर्व अवलोकन करण्यांत आम्ही रंगून गेलों होतों.

बनारस ते देहरी ऑन सोन ८० मैल, शेरकाटी ते चोपरान ३४ मैल, देहरी ते औरंगाबाद २७ मैल, चोपरान ते बहारी ३० मैल, औरंगाबाद ते शेरकाटी ३० मैल, बहारी ते बगोदर ३२ मैल.

पारसनाथ ते कलकत्ता

आजूबाजूस भातांच्या शेतांच्या अरुंद पट्टया सारख्या दिसत होत्या. इतक्यांत धनबादेकडे जाणारा रस्ता दर्शविणारी पाटी लागली. येथून कलकत्ता १६९ मैल आहे. नंतर निरशण खेडेगांव लागलें. येथून कलकत्ता १५७ मैल आहे. पुढें सहा मैलांच्या अंतरावर असन्सोल व राणीगंज येथील कोळशाच्या खाणी दिसूं लागल्या. ग्रँड ट्रंक रोड कोळशाच्या खाणीमधून गेला आहे. रस्त्यावर 'Kataspi Coal Mines' अशी पाटी

आम्हांस दिसली. येथून कलकत्ता १५१ मैल आहे. कोळशाच्या खाणीच्या बाजूस थोडा वेळ गाडी उभी करून, कामगार लोक कोळसा कसा काढतात हें आम्हीं पाहिलें.

भूमातेच्या गर्भांतून कोळशांचे ढीगच्या ढीग काढून, ते बैलगाडींत भरीत होते. जिकडे तिकडे लाल ज्वाळा दिसत होत्या, व सभोंवतालच्या प्रदेशावर कोळशाच्या धुराळ्याची काळोखी पसरलेली होती. आम्ही गाडीचे दिवे लावून मंद गतीनें गाडी चालू केली. घड्याळांत ५–१२ वाजले होते. खाणीच्या आवारापासून सुमारें ५ मैलांवर असन्सोल लागलें. असन्सोल हें बरद्वान जिल्ह्यांत असून, राणीगंजमधील खाणींच्या जवळ आहे, त्यामुळें त्यास फार महत्त्व प्राप्त झालें आहे. हें East Indian Railway and Bengal Nagpur Railway चें जंक्शन आहे. विजेच्या दिव्यांनीं सुशोभित केलेले उत्तम बंगले ह्या गांवीं दिसतात. नंतर आम्ही चिरकुण्डा गांवापाशीं आलों. येथें गाडींत पेट्रोल भरलें. बंगाली भाषेस येथून सुरुवात झाली. आमच्या मोटारभोंवतीं बंगाली मुलांची गर्दी होऊन ते आपापसांत कुजबजूं लागले. आम्ही आमच्या माकडी टोप्या घातल्या होत्या, त्या चिरकुण्डा येथें काढल्या. आमच्या नारायणरावांचा तो नाना फडणविसी अवतार (डोक्यावर मागील बाजूस मोठा घेरा व त्यांवर लोंबत असलेली शेंडी व कानांत मोठी भिकबाळी) पाहून तेथील बंगाली मुलें त्यांना हंसूं लागलीं. थोडा वेळ थांबून आम्ही बंगालमधून प्रवास करूं लागलों.

इकडे सूर्यास्त ५–१० ला होतो. श्री. भाऊसाहेब गाडी चालवीत होते. मी त्यांच्या शेजारीं गप्पा मारीत बसलों होतों. माझ्या हातांत टॉर्च लाईट होता, त्याचा उपयोग, विरुद्ध दिशेनें येणाऱ्या मोटारगाडीस रस्ता दाखविण्याकडे करण्यास भाऊसाहेबांनीं मला सांगितलें. "मास्तर, ड्रायव्हरच्या तोंडावर मात्र उजेड पाडूं नका, नाहीं तर अपघात व्हावयाचा!" असें मात्र त्यांनीं मला बजावून सांगितलें.

निबिड अंधःकार, त्यामुळें आजूबाजूस काय आहे हें आम्हांस कांहींच दिसेना. गप्पा मारीत बरद्वान येथें रात्रीं ८–२५ ला पोहोंचलों. बरद्वान स्टेशनवर जाऊन बाररूममध्यें चहा घेतला. नंतर प्लॅटफॉर्मवर फिरून बाररूममध्यें जेवण घेतलें. माशांचा सूप व भात हे दोनच पदार्थ

होते. इंग्रजी वर्तमानपत्र वाचण्यास मागितलें, तेव्हां तेथील मुलानें एक बंगाली वर्तमानपत्र दिलें. कडबोळ्यासारखीं अक्षरें पाहून, अदमासानें आम्ही 'ऑल इंडिया 'च्या खेळाडूंचीं नांवें वाचलीं. नंतर ९–३० ला आम्हीं स्टेशन-नजीक डाक बंगल्यांत जाऊन रात्रींचा मुक्काम केला. येथील डाक बंगला खूपच मोठा असून गलिच्छ व घाणेरडा आहे. जवळच पाण्याचें तळें असल्या-मुळें डास फार होते. नंतर गप्पा मारीत आम्ही झोंपी गेलों.

बरद्वानपासून कलकत्ता अवघें ७५ मैल आहे. बरद्वान ही जमीन-दारी असून बरद्वान शहर तिची राजधानी आहे. स्टेशनपासून मैलाच्या अंतरावर बरद्वान शहर आहे. राजवाडा व बागबगीचे पाहण्यासारखे आहेत. येथें पुरातन कालाचीं पवित्र १०८ देवस्थळें असून त्यांस 'शिवालय' म्हणतात. बरद्वान येथील साडचा व धोतरें फार प्रसिद्ध आहेत.

बरद्वानच्या डाक बंगल्यांत झोंपी गेलों असतां, बंगालविषयीं पडलेलें स्वप्न :—

बंगाल

हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांत बंगाल देश अतिशय सुपीक व संपन्न म्हणून प्रसिद्ध आहे. येथील मुख्य रहिवाशी बंगाली लोक होत. बुद्धिमत्ता व वक्तृत्व यांविषयीं त्रिखंडांत त्यांची ख्याति आहे. डॉ. रविंद्रनाथ टागोर, सर जगदीशचंद्र बोस, व कै. चित्तरंजन दास, ह्या थोर विभूतींच्या देशांत आम्ही आहोंत याबद्दल स्वप्नांत आम्हांस खूपच आनंद होत होता. गंगेच्या कांठचा गाळ सांचून बनलेल्या 'सुंदरबना' चा आल्हादकारक देखावा दृष्टीस पडणार म्हणून मोठी उत्कंठा वाटत होती. या देशांतील ज्या सुपीक जमिनींतून भाताचीं व तागाचीं दरवर्षीं तीन पिकें काढितात, ती सुपीक जमीन दृष्टीस पडणार, म्हणून आश्चर्यानें आमचे डोळे गाढ झोंपेंत मिटले होते. तुतीच्या झाडांचीं पानें रेशमाच्या किडयांचें अन्न होय. हीं झाडें बंगालच्या हवेंत चांगली होतात, व म्हणून तेथें रेशीम तयार करतात, असें स्वप्नांत दिसल्यामुळें आपल्या अंगावरील पांघ णें रेशमाचीं आहेत या कल्पनेनें रा. नारायणराव हे मोठमोठयानें घोरूं लागले.

इतक्यांत ? " ये–बुढा–ओ–बुढा, ये–मास्तर–उठा, फारच आळशी

तुम्ही ! " असें म्हणत श्री. भाऊसाहेब उठले. तोंडावरील पांघरुण काढून डोळे चोळीत व डासांस इकडे तिकडे घालवीत मी उठलों. " ये मास्तर, आजकू कोणता तारीख रहया ? " म्हणत नारायणराव उठले. आज ता. ४–१–१९३४, वार गुरुवार असें मीं त्यांस सांगितलें. रा. देसाई हे साहेबी शौचकूपांत केव्हां गेले तें आम्हांस माहीतच नव्हतें. नंतर प्रार्तविधि उरकून, खाण्याच्या जिनसांचा एकच डबा करून, सर्व सामानसुमान नीट-नेटकें मोटारमध्यें ठेविलें. नंतर स्टेशनवर येऊन सकाळची न्याहारी केली. नारायणराव " छोटी हजेरी करकर निकल गया " म्हणत मोटारींत बसले. अवघे ७५ मैलच जावयाचें होतें. स्टेशननजीक रु. १८९८६ दरानें पेट्रोल भरलें. रस्त्यावर एक बाई हातांत मातीची घागर घेऊन, रस्त्यावर पाणी शिंपडतांना दिसली. आपण ज्याप्रमाणें सडा टाकतों, त्याप्रमाणें तेथील रस्त्यावर म्युनिसिपालिटी स्त्रियांकडून पाणी शिंपडविते. थंडी बेताबाताची होती. प्रवास सुरू झाल्यावर पालसीट स्टेशन लागलें. पालसीटपासून रस्ता-दुरुस्ती चाललेली होती, त्यामुळें गाडी मंद गतीनें चालवावी लागली. अशा रीतीनें रासलपूर खेडेगावांत आलों. हें स्टेशन आहे. पण येथें डाक बंगला नाहीं.

बंगालमध्यें खेडीं फारच जवळ जवळ आहेत. सुपीक जमीन, त्यांतून कालव्याचें पाणी असल्यामुळें दुतर्फा भातांचीं शेतें लांब पल्ल्यापर्यंत पसरलेलीं दिसतात. तसेंच दर एक फर्लांगवर पाण्याचीं तुडुंब भरलेलीं तळीं सारखीं दृष्टोत्पत्तीस येतात. पुढें आम्हांस उंच मनोरे दिसूं लागले, ते मुसलमानांनीं बांधिले आहेत. ते ज्या गांवांत आहेत, त्यांस 'पांडुवा' म्हणतात. घरें (किंवा झोंपड्या) कळकाचीं व गवताचीं बांधलेलीं आहेत. तांदुळाच्या गिरण्या ठिकठिकाणीं आहेत. हे सर्व पाहात पाहात आम्ही चिन्सुरा नामक छोटेखानी शहरांत आलों. येथील रस्ते चांगले असून पोलिसांची देखरेख उत्तम आहे. पोलिस उघडी छत्री डोक्यावर धरून, एका उंच चौथाऱ्यावर उभें राहातात. छत्रीवर पांढरा अभ्रा असतो. नंतर आजूबाजूंचीं व लता-पल्लवांनीं आणि सुगंधी रंगीबेरंगी फुलांनीं सुशोभित झालेलीं तळीं व इतर सृष्टिसौंदर्य पाहात पाहात फरेंचांच्या ताब्यांतील चंद्रनगरांत आम्हीं प्रवेश केला. येथें रस्त्याची जरा चुकामूक झाली. " De Paris Grand

Hotel " वगैरे पाट्या दिसूं लागल्या. येथील रस्ते फारच वाईट स्थितींत होते. चंद्रनगरपासून २० मैलांवर कलकत्ता आहे. जवळच गंगा नदी ऊर्फ हुगळी नदी वाहते. तिच्या कांठचीं खेडीं पाहात व ओलांडीत आम्ही कलकत्त्यामधील 'वेलिंग्टन ज्यूट मिल' जवळ आलों. दुपार झाली. मजूर लोकांचा तांडा घरीं जाण्यास निघाला होता, बरोबर १२ वाजले होते. नंतर बाटा (Bata) बूट कंपनीचा प्रचंड व विस्तीर्ण कारखाना लागला. मोटार उभी करण्याचा इषारा पोलिसकडून मिळाला. आम्ही प्रसिद्ध **'हावरा फ्लोटिंग'** पुलाजवळ आलों होतों. १२–२० ला आम्हीं मोठ्या उत्साहानें व कौतुकानें **'कलकत्ता गेट'** नांवानें संबोधिला जाणाऱ्या हावरा पुलांत प्रवेश करून तो ओलांडून गेलों. क्लाइव्ह रोडची विचारपूस करीत, रा. देसाई यांच्या मुख्य ऑफिसच्या दरवाज्यापाशीं आम्ही गाडी उभी केली.

'अरे, हम् तो कलकत्ता में आया," म्हणत नारायणराव विडच्या आणण्यास गेले. नंतर रा. देसाई यांचे बंगाली स्नेही श्री. गांगुली यांजकडे आम्ही गेलों. गांगुली भेटले नाहींत. त्यांच्या भावानें आम्हांस 'कलकत्ता हॉटेल' मध्यें नेऊन आमची उतरण्याची सोय केली. हॉटेलच्या पांचव्या मजल्यावर आम्ही एक स्वतंत्र ब्लॉक घेतला. सामानसुमान ठेवून चहा वगैरे घेतला. अशा रीतीनें आम्ही कलकत्त्यास सुखरूप पोहोंचलों म्हणून घरीं तारा केल्या. एकंदर प्रवास, मुंबई ते कलकत्ता, आमच्या माइलेज मीटरप्रमाणें :—

मुंबईहून निघतांना ३१२७३
कलकत्त्यास पोहोंचल्यावर ३३२०२
शहरें पाहण्यांत खर्च झालेले मैल
त्यामध्येंच आहेत.

कलकत्ता.	३३२०२
मुंबई.	३१२७३
एकंदर	०१९२९

शहरें वगैरे पाहून प्रवास.

———

कलकत्ता

हें बंगाल इलाख्याचें मुख्य शहर असून, हिंदुस्थानांत पहिलें, व ब्रिटिश साम्राज्यांतील दुसऱ्या नंबरचें शहर आहे. कांहीं वर्षें कलकत्ता हें हिंदुस्थान सरकारचें राजधानीचें शहर होतें. हें हुगळी नदीच्या दोन्ही तीरांवर वसलेलें, प्रचंड, व विस्तीर्ण शहर आहे. हुगळी नदीचें पात्र अजमासें एक मैल रुंद असून जलमार्ग म्हणून याचा फार उपयोग होतो. नदीवर व्यापारासाठीं हावरा पूल बांधला आहे.

पूर्वीं ह्या शहरास कालिकाता असें नांव होतें. काली नामक देवीचें फार पुरातन देऊळ येथें आहे. ह्या देवीवरून त्यास कालिकाता नंतर कालिघाट व हल्लीं कलकत्ता असें नांव प्राप्त झालें आहे. हें उत्कृष्ट बंदर असून समुद्रापासून ८० मैल आंत आहे. बंगालच्या उपसागरापासून कलकत्त्यापर्यंत हुगळी नदीच्या जलमार्गानें मालाच्या बोटींची रहदारी सतत चालू असते. समुद्रापाशीं डायमंड हार्बर या नांवाचें बंदर आहे. कलकत्त्याहून दर वर्षीं अदमासें १०० कोट रुपयांचा माल रवाना होतो. ह्या शहरांतील गगनचुंबित भव्य व सुंदर इमारतींमुळें त्यांस युरोपियन लोक 'राजवाड्यांचें–हवेल्यांचें (The City of Palaces) शहर म्हणतात. शहराच्या संरक्षणार्थ **'फोर्ट वुइल्यम,'** किल्ला इ. स. १६९८ त बांधिला आहे. हें शहर मुंबईच्या सव्वापट मोठें असून लोकसंख्या अजमासें १५ लाख आहे. १२५ फूट रुंदी व ८ मैल लांबीचा मुख्य डांबरी रस्ता असून दुतर्फा आठ नऊ मजली भव्य इमारती उभारल्या आहेत. ट्रॅम, बसेस, रिक्शा, टुरिंग मोटारगाड्या, वगैरे पुष्कळ वाहनें कमी खर्चांत मिळूं शकतात. ट्रॅमला प्रत्येक वेळेस २ पैसे; शिवाय '**डे तिकिट**' असतें; तें दोन आण्यांस मिळतें. तें घेऊन सबंध दिवस त्याच दिवसांपुरतें, कितीही वेळां बसलें तरी चालतें. बसेस दोन मजली असून, त्यांचा धंदा कोणासही स्वतंत्र लायसेन्स काढून चालवितां येतो. बहुतेक बसेसचें मालक पंजाबांतील शीख लोक आहेत. त्यांचे दर १ आण्यांपासून ४ आण्यांपर्यंत आहेत. रिक्शा ही छोटेखानी गाडी एक मजूर माणूस ओढून नेतो. ही गाडी फारच सुंदर असते. तीमध्यें तीन माणसें बसूं शकतात. अंतराप्रमाणें त्यांचें भाडें असतें.

रस्ते डांबराचे असल्यामुळें, रिक्शा चालविणारा माणूस ती सारखी पळत नेत असतो. आंतील गादी निरनिराळ्या रंगीबेरंगी रेशमाची बनविलेली असते. रिक्शा आली हे तिच्या घंटेच्या (ठक्–ठक्–ठक्–ठक्) आवाजावरून तावडतोब ओळखतां येतें.

लोकांच्या आरोग्यासाठीं व सुखसोयीसाठीं ह्या शहरामध्यें दोन दोन फर्लांग अंतरावर एक मैदान, बगीचा व पाण्यांनीं तुडुंब भरलेलीं तळीं केलेलीं आहेत. अशा तऱ्हेची बहुजन समाजासाठीं केलेली सोय दुसरीकडे कोठेंही नाहीं. पहांटे व संध्याकाळीं मैदानावर लहान मुलें बॅडमिंग्टन, फुटबॉल खेळतांना व इकडे तिकडे वागडतांना दिसतात. तसेंच तरुण लोक तळ्यांत पोहत असलेले किंवा बागेंत चेष्टा करीत असलेले दृष्टीस पडतात; तर कांहीं वृद्ध मान हालवीत, झाडाच्या शीतळ छायेंत, कंटाळवाण्या जीविताचें कोडें सोडवीत बसलेले आढळतात. पहांटे ५ वाजतां रस्त्यावर पाणी शिंपडून ते स्वच्छ ठेवले जातात.

वस्ती बहुतेक बंगाली लोकांची असून, युरोपियन, मारवाडी, जैन व इतर तत्सम व्यापाऱ्यांनीं शहर नुसतें गजबजलें आहे. बंगाली लोकांत 'बाबू' म्हणण्याचा प्रघात फार आहे. बंगाली लोकांच्या खांद्यावर एक शाल व तेलानें लडबडलेल्या डोक्यावर भांग हा असावयाचाच. अफू खाऊन ज्याप्रमाणें माणूस गुंगलेला असतो, तसे ते गुंगीत असल्यासारखे दिसतात. त्यांचें अन्न भात व मासे; त्यामुळें ते सशक्त नसतात, पण स्वभावानें फार खुनशी असतात. पुष्कळ बंगाली लोकांस दारूचें व वेश्यागमनाचें घातुक व्यसन असतें. चितपुरा रोडवरील दुतर्फा घरें वेश्यांनीं भरून गेलेलीं आहेत.

आम्ही चहा घेऊन कलकत्ता शहरांत भटकण्यास निघालों. अगोदर, बरोबर आणिलेल्या बंदुका पोलिसांच्या ताब्यांत देण्याचें ठरवून मुख्य पोलिसठाण्यावर गेलों. परंतु तेथें आम्हांस कलकत्ता हॉटेलपाशीं अम्हर्स्ट रोडवर असलेल्या पोलिस ठाण्यावर बंदुका नेऊन देण्याबद्दल सांगण्यांत आलें, त्याप्रमाणें आम्हीं तेथें जाऊन बंदुका दिल्या. तेथील असिस्टंट पोलिस कमिशनर मुकर्जी नांवाचें बंगाली गृहस्थ होते. ते स्वभावानें मोठे दिलदार असून त्यांनीं श्री. भाऊसाहेब व रा. देशाई यांस सर्व आवश्यक गोष्टींची पूर्ण माहिती देऊन, आम्ही मुंबईहून कलकत्त्यास मोटारनें आलों म्हणून

आमचें मनःपूर्वक अभिनंदन केलें. दुसऱ्या दिवशीं एक पोलिस शिपाई आम्हांला सर्व शहर दाखविण्यासाठीं पाठवून देण्याचें त्यांनीं अभिवचन दिलें. नंतर आम्ही विजेच्या दिव्यांनीं प्रकाशित केलेल्या शहरांतील रस्त्यांतून बराच वेळ हिंडलों. तो कलकत्त्यांतील आमचा पहिला दिवस, त्यांतून रात्र; आम्हांस आमच्या हॉटेलचा रस्ता कांहीं सांपडेना. एका शिखानें त्यास ज्या ठिकाणीं उतरावयाचें होतें तेथें नेऊन, आतां उजव्या हातास वळा, म्हणजे तुमचे हॉटेल लागेल असें सांगून तो पसार झाला. त्याप्रमाणें उजव्या हातास वळलों तों मार्केट लागलें. नंतर एका सुशिक्षित गृहस्थास विचारून आम्ही रात्रीं ८–३० वाजतां मुक्कामीं पोहोंचलों.

कलकत्ता हॉटेलमधील मौजा

हॉटेलमधील मौजा कांहीं मजेदारच. तेथील नोकरांस आमची भाषा कळत नसे व त्याची भाषा आम्हांस कळत नसे. त्यास अमुक आण म्हटले कीं तो भलतेंच घेऊन येई. भाजी आणावयास सांगितली कीं तो पाणी आणी; पाणी सांगितल्यास मीठ आणी व मीठ सांगितल्यास दही घेऊन येई. दोन गडी आमच्या तैनातीला होते. त्यांपैकीं एक सोनदेश हा हाडू, काडू, बहोत अच्छा व आं-हें-हें म्हणत असे. दुसऱ्यास इंग्रजी भाषेंतील थोडेसे शब्द येत होते. पण, एकाद्या पटाईत इंग्लिश भाषा बोलणाराचा आव आणून, तो 'साहेब Rice goes good. Yes. Fish–no salt bring. Yes.–Oh–yes saheb. Bread very burn good fine. Yes.' असें वेडेंवांकडें इंग्रजी बोलत असे व त्यामुळें आमची बरीच करमणूक होत असे. त्यास कांहींही सांगा. तो कधीं No म्हणत नसे. मीं एकदां त्यास विचारलें, What is your name ? तो म्हणाला Yes. नंतर पुन्हां म्हणालों "I think, you are a donkey. " तो हंसत हंसत Yes–Yes असें म्हणाला.

पहिल्या दिवशीं एका गड्यास (त्याचें नांव लखी) गादी आणण्यास

सांगितलें, तर त्यानें मजजवळ येऊन "साब, निचू लाया" म्हणून रस्त्यावर घोड्याची गाडी आणिली. नारायणरावांनीं स्वतःच्या हिंदी भाषेंत लखीस प्रश्न विचारला. 'ये लखी, हमारा धोतर धुया ? ' तोंच लखीनें कपबशा धुऊन त्यांच्यापुढें ठेविल्या.

दुसरी टेस्ट मॅच

जवळ जवळ १६०० मैलांचा प्रवास ज्याकरितां आम्ही केला तो ता. ५-१-१९३४ शुक्रवारचा दिवस उजाडला. आज दुसरी टेस्ट मॅच होती. कलकत्त्यांत इकडे तिकडे फिरून १०-३० ला आम्ही परत आलों. जेवण करून ११-१५ ला आम्ही मॅच पाहण्यास गेलों. दुसरी टेस्ट मॅच 'एडन गार्डन, नांवाच्या फुटबॉल ग्राउंडवर होती. मुंबईच्या व कलकत्त्याच्या मॅचमध्यें सर्वच जमीनअस्मानाचा फरक दिसून येत होता. मुंबईंत दहा रुपयांचें तिकिट मिळविण्यास किती मारामारी करावी लागे. पण इकडे २ रु. ८ आ. चीं तिकिटें कांहीं त्रास न होतां आम्हांस मिळूं शकलीं ! रा. नारायणराव मॅच पाहण्यास आले नाहींत, ते शहरांत फिरावयास गेले.

दुसरी टेस्ट मॅच, अगदीं रूक्ष व कंटाळवाणी वाटत होती. प्रेक्षक फार झाले तर पांच किंवा सहा हजार असतील. ग्राउंड आकुंचित असून बसण्याची कायमची व्यवस्था लॉर्ड्स् ग्राउंडसारखी केलेली आहे. मुंबईच्या पहिल्या टेस्ट मॅचमध्यें जी एक मजा वाटत होती, ती इकडे मुळींच दिसून येत नव्हती. कारण बंगाली प्रेक्षकगण मोठा वाईट. ते आपल्या भाषेंतून व मधून मधून इंग्रजींतून, कॅ. नायडू व कॅ. जार्डीन यांस व इतर फिल्डर्सना शिव्या देत. आरडाओरड करून सर्व मैदानांत एकच गोंधळ करून टाकीत. मॅचचें वर्णन सर्वत्र आलेलें आहेच. तरी पण इंडियाच्या खेळाडूंनीं फिल्डिंग फारच उत्कृष्ट केलें. कसावसा पहिला दिवस संपला. आम्हांस कोल्हा, जमशेटजी, चंपक मेहता व मुंबईचे इतर चार पांचजण तेथें भेटले. मॅच पाहून आम्ही हॉटेलमध्यें आलों. नंतर, कलकत्ता येथें पाहण्यालायक

असलेल्या स्थलांची यादी करून, तीं पाहण्यास आम्ही दर दिवशीं ता. (५-६-७) जात होतों. आम्हांबरोबर एक पोलिस होता. इलेक्ट्रिक हॉर्न वाजविण्याची मनाई आहे असें कळतांच, आम्ही साधा हॉर्न खरेदी केला. पण नंतर तो मनाईचा हुकूम फक्त लॉरीज व बसेसकरितां आहे असें कळलें. असो.

कलकत्ता येथें पाहण्यालायक काय ?

येथील सुंदर रस्ते व भव्य इमारती, त्याचप्रमाणें तळीं व बगीचे पाहण्यालायक आहेत. कलकत्ता येथील प्रसिद्ध व मुख्य रस्ते खालील-प्रमाणें :—

हेरिसन रोड, मिरझापूर स्ट्रीट, स्ट्रँड रोड, क्लाइव्ह रोड, डलहौसी स्क्वेअर, सेन्ट्रल ॲव्हेन्यू, अम्हर्स्ट रोड, शशिभूषण स्ट्रीट, चित्तरंजन ॲव्हेन्यू, विवेकानंद ॲव्हेन्यू, शाम बझार स्ट्रीट, एडन गार्डन रोड, हेस्टिंग्ज, ऑकलंड, कॅनिंग, बेंटिक वगैरे रोड; चितपुरा रोड, पार्क स्ट्रीट, चौरंगी स्क्वेअर, धरमटोला स्ट्रीट, मैदान रोड, माचू बझार स्ट्रीट, कॉलेज स्ट्रीट, लोअर सर्क्युलर रोड, एस्पनेड रोड वगैरे अनेक रस्त्यांचें नुसतें जाळें पसरलेलें आहे.

व्हिक्टोरिया मेमोरियल:—ही इमारत फारच मोठी असून कला-कौशल्याचा हा ताजमहालनंतरचा उत्कृष्ट नमुना होय. कलकत्त्याच्या दक्षिण भागांत ही इमारत असून जवळच प्रेसिडेन्सी तुरुंग आहे. दर-वाज्यापाशीं एक मोठी कमान असून तीवर घोड्यावर बसलेला किंग सातवे एडवर्ड यांचा पुतळा आहे. ह्या इमारतींत फार पुरातन वस्तूंचा, लेखांचा, चित्रांचा, ऐतिहासिक वस्तूंचा, जुन्या मूर्तींचा व अनेक प्रेक्षणीय वस्तूंचा संग्रह करून ठेविला आहे. इमारत बांधण्यास ७६ लक्ष रुपये खर्च आलेला असून, तो हिंदुस्थानांतील राजेरजवाड्यांनीं दिलेला आहे. सोमवार-

शिवाय दररोज सकाळीं १० वाजल्यापासून संध्याकाळीं ५ वाजेपर्यंत इमारत उघडी असते. सर्व वस्तुसंग्रहालय पाहण्यास ४ आणे फी घेतात. पण शुक्रवारीं मात्र ८ आणे द्यावे लागतात. पुष्कळ ऐतिहासिक व्यक्तींचें पुतळे सर्वत्र दिसतात.

क्लाइव्ह रोड :—या रस्त्याच्या दुतर्फा सुंदर व भव्य इमारती आहेत. या इमारतींतून निरनिराळ्या बँका व विमा कंपन्या आहेत. त्यामुळें रस्त्यांत फारच रहदारी चालू असते. Lloynds Bank, Mercantile Bank; National Bank; Chartered Bank; India Bank; Central Bank, Concul for Switzerland, Concul for Netherlands and Greece यांचीं ऑफिसें व इतर अनेक इमारती प्रामुख्यानें दिसतात. जवळच **कलकत्ता अंधार कोठडीचें 'हॉलवेल स्मारक'** म्हणून स्फटिकाच्या दगडाचा बनविलेला अदमासें २५ फूट उंचीचा स्तंभ उभारलेला आहे.

डलहौसी स्क्वेअर :—अर्ल ऑफ डलहौसीचें हें स्मारक म्हणून याला त्याचें नांव दिलें आहे. हा हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल होता. या रस्त्यावर फारच सुंदर इमारती असून, उत्कृष्ट तळीं आहेत. येथें प्रेसबिटेरीयन मिशनचें इ. स. १८१५ त बांधलेलें उत्तम चर्च असून जवळच पूर्वीचे **'हायकोर्ट ऊर्फ न्यायमंदिर'** आहे; ह्याच न्यायमंदिरांत प्रसिद्ध **नंदकुमाराचा** खटला चालला होता. न्यायाधीश एलिजा इंपे, यांनीं **नंदकुमारास** फांशीची शिक्षा येथील न्यायासनावर बसूनच फर्माविली. नंतर नंदकुमारास " कुली बझार " मध्यें फांशीं देण्यांत आलें. तसेंच कौन्सिलचा सभासद **फिलीप फरान्सिस** यावरील खटला येथेंच चालला होता. नवीन हायकोर्टची इमारत फारच मोठी असून जनरल पोस्ट ऑफिसची भव्य इमारत तिच्या जवळच आहे.

चौरंगी स्क्वेअर :—अनेक मोठमोठे रस्ते या ठिकाणीं एकत्र होतात. सर्व रहदारी पोलिसांशिवाय चालते. सर्वांत मोठी टॉवर नामक ९ मजली इमारत, तसेंच कार्पोरेशन, स्टेट्स्मन वर्तमानपत्राची इमारत, इलेक्ट्रिक हाऊस व हॉटेलांच्या वगैरे इतर इमारतींनीं चौरंगी स्क्वेअर नुसता फुलून गेलेला आहे. जवळच अदमासें १५० फूट उंचीचें

ochterlony Monument, उभारलेलें असून, त्यावरून सर्व कलकत्ता शहर दिसतें.

न्यू मार्केट :—न्यू मार्केट किंवा सर स्टुअर्ट हॉग मार्केट हें नवीन धर्तीवर बांधिलेलें आहे. हें एकमजली असून त्याचें आवार फारच मोठें आहे. असें मार्केट सर्व हिंदुस्थानांत दुसरें नसेल. जैन लोकांचें देऊळ पाहण्यासारखें आहे. **काली देवीचें** फार पुरातन देऊळ आहे. देवीपुढें बकरीं, बोकड व रेडे कापण्याची चाल अजून चालू आहे. कालीघाट या नांवानें तें देऊळ प्रसिद्ध आहे. हुगळी नदीला उत्तम घाट असून, त्यावर सतत लोकांची गर्दी असते. रॉयल एक्सचेंज, संगमरवरी राजवाडा, अनेक चर्चेस व इमारती पाहण्यासारख्या आहेत.


हावरा पूल :—हा पूल म्हणजे एक अजब चीज आहे. हा हुगळी नदीवर बांधिलेला असून तो बराच लांब व रुंद आहे. हा पूल फळ्यांचा बनविलेला आहे. ह्यास फ्लोटिंग (तरता) पूल म्हणतात. नदीचा उपयोग जलमार्गासारखा करितात. बंगालच्या उपसागरापासून कलकत्ता ८० मैल दूर आहे. तरी आगबोटी नदीच्या मार्गानें कलकत्त्यापर्यंत येऊं शकतात. आगबोटी आल्यावर विजेच्या साहाय्यानें पूल दुभंग होतो. नंतर बोटी त्यांतून जातात. बोटी गेल्यावर पुन्हां तो पूर्ववत् मिळून त्यावर रहदारी सारखी सुरू होते. आगबोटी जाण्याच्या पूर्वी कमींत कमी अर्धा तास घंटा वाजत असते, व ती घंटा म्हणजे रहदारीच्या बंदीची सूचना किंवा इषारा होय. पुलामुळें हावरा व कलकत्ता यांजमधील दळणवळण सुलभ होऊन, व्यापाराची चांगली सोय झालेली आहे. जवळच हावरा स्टेशन आहे.

एडन गार्डनवर **ब्रह्मी पॅगोडा** पाहण्यासारखा आहे. येथें गव्हर्नरचा बंगला असून, त्यासमोरील भव्य पटांगणांत प्रसिद्ध गव्हर्नर जनरलांचे व योद्ध्यांचे पुतळे उभारलेले आहेत. त्यांपैकीं लॉर्ड रॉबर्टस् यांचा सुंदर घोड्यावर बसलेला पंचधातूंचा बनविलेला पुतळा आहे. तसेंच लॉर्ड किचनेर, लॉर्ड हार्डिंग्ज, लॉरेन्स, मिन्टो, लॅन्सडाऊन, डलहौसी, बेंटिक वगैरेंचे पुतळे आहेत. त्यांच्या जवळ ग्वाल्हेर स्मारक आहे. तसेंच लॉर्ड कर्झन, नॉर्थब्रुक, चित्तरंजन दास इत्यादिकांचीं स्मारकें उभारून शहरास बरीच शोभा आणिली आहे. कलकत्त्याच्या मध्यभागीं Indian


Museum; Belivedere व Zoological Gardens पाहण्यालायक आहेत. करमणुकींचीं साधनें बरींच आहेत. सिनेमा व नाटकगृहें फार असून, त्यांच्या इमारती पाहण्यालायक आहे. त्यांपैकीं न्यू एम्पायर, एम्पायर, धी प्लाझा, ग्लोब, पॅलेस ऑफ व्हरायटीज्, वगैरे सिनेमागृहें फारच प्रेक्षणीय आहेत. येथील लोक गायनाचे फार शोकी दिसतात. कारण प्रत्येक घरावर रेडिओचे दोन बांबू व तार ही दृष्टीस पडते. हें केंद्रस्थान म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. चिनी, जपानी व शीख लोकांचा भरणा फार दिसून येतो. चिनी व जपानी, बूट व इतर वस्तूंच्या व्यापारांत गर्क झालेले दिसतात कॉलेज स्ट्रीटवर शहरांतील सर्व कॉलेजेस् असून, कलकत्ता युनिव्हर्सिटीची टोलेजंग इमारत आहे. **मारवाडी हॉस्पिटल** व इतर दवाखाने विपुल आहेत. कलकत्त्याच्या जवळ अलिपूर गांवीं बंगालच्या गव्हर्नरचा बंगला आहे. तागाच्या अदमासें ७० गिरण्या आहेत.

प्रवाश्यांस उतरण्याकरितां हिंदु व युरोपियन हॉटेल्स अनेक आहेत. त्यांपैकीं महाराष्ट्र लॉज, कलकत्ता हॉटेल (मिर्झापूर पार्कवर आहे), पंजाबी लॉज (ॲम्हर्स्ट रोडवर); ग्रॅण्ड हॉटेल (चौरंगी रोड); कॉन्टिनेन्टल हॉटेल (चौरंगी स्क्वेअरजवळ); स्पेन्सेस हॉटेल (वेलस्ली रोडजवळ); टॉर्पोज रेस्टॉरन्ट (चौरंगी स्क्वेअरजवळ); इत्यादि प्रसिद्ध आहेत.


अशा रीतीनें आम्ही कलकत्ता शहर पाहात पाहात चार दिवस खूप हिंडलों. हावरा स्टेशनवर 'टाइम्स' आणण्यास गेलों असतां तेथें प्रत्येकांची दोन तीन पत्रें मिळालीं. कलकत्त्याचें हावरा हें मुख्य स्टेशन असून कलकत्ता स्टेशन नाहीं, त्यामुळें, आम्हीं कलकत्ता स्टेशनमास्तरचा पत्ता दिला होता, त्या पत्त्यावर एक तांबडी रेघ मारून त्यावर हावरा म्हणून लिहिलें होतें. येथें मुंबईस "श्री. भाऊसाहेबांचीं मुलें आजारी आहेत," अशी तार मिळाली. ती पाहतांच आम्हीं तावडतोब तेथून निघण्याचा विचार केला. शेवटच्या दिवशीं मॅच न पाहतां जगन्नाथपुरीस जाण्याचा केलेला बेत रहित करून आम्ही निघण्याच्या तयारीस लागलों. रा. नारायणराव यांस आनंद झाला, कारण त्यांच्या मुलाचें लग्न असल्यामुळें ते घरीं जाण्यास फारच आतुर झालेले दिसले. कलकत्ता हॉटेलचें बिल चुकतें करून आम्ही ता. ७–१–१९३४



'बुद्ध', अजिंठा (पान ६६)



'चंद मिनार' दौलताबाद किल्ला (पान ६८)



'कैलास लेणीं', वेरुळ (पान ७०)



बिबी मुखीरा किंवा मुख़बर, औरंगाबाद (पान ६७)

रविवार रोजीं कलकत्ता सोडून पुन्हा ग्रॅण्ड ट्रंक रोडनें मुंबईचा मार्ग मोठ्या कष्टानें धरला.

गाडीचा वेग ताशीं ५० ते ६० मैल ठेवून शक्य तों मुंबईस लौकर पोंचण्याचा बेत रा. भाऊसाहेबांनीं केलेला होता. भयंकर वेगामुळें मैलाचे दगड, झाडेंझुडपें, पर्वत, वगैरे आमच्याबरोबर झपाट्यानें पळून मागें राहिलेले दिसत होते. आम्ही मधून मधून गप्पा मारीत व कांहीं वेळ अगदीं गप्प राहून प्रवास करीत होतों. जिवाचा आटापिटा करून, अहोरात्र गाडीस व स्वतःस विश्रांति न देतां पहांटे पांच वाजतां बनारसला पोंचलों. एकंदर ४२० मैलांची मजल मारून, गंगा नदीच्या थंड व धुकें पसरलेल्या शांत किनाऱ्यावर आम्हीं तोंडें धुतलीं. येथेंच जरा विश्रांति घेऊन पुढील मार्ग आक्रमण करण्यास सुरुवात केली. थंडी फारच पडली होती व त्यामुळें श्री. भाऊसाहेब व देसाई यांस श्री. आजगांवकरांची आठवण झाली. कारण याच थंडीस भिऊन ते आमच्याबरोबर आले नव्हते. नंतर बनारस शहरांत प्रवेश करून पेट्रोल भरलें. व्हाइसरॉय येणार असल्यामुळें शहर लतापल्लवांनीं शृंगारिलें होतें. बनारसच्या तिन्ही स्टेशनांवर जाऊन घरची तार वगैरे आलेली आहे काय याची चौकशी केली. पोलिस बंदोबस्ताची खूपच धांदल उडालेली दिसत होती. आमच्या मोटारीचें आगमन होतांच, अॅलर्टमध्यें उभे राहून पोलिस सॅल्यूट करीत. कॅन्टोन्मेन्ट स्टेशनभोंवतीं, त्याच्या पिछाडीनें आम्ही चार वेळां चकरा घातल्या, पण जातांना जें स्टेशन पाहिलें होतें तें आम्हांस सांपडेना. स्टेशनच्या मागील बाजूस अर्धा तास उभे राहिलों. ही चूक स्टेशनच्या पुढील बाजूनें गेल्यावर आमच्या लक्षांत आली. श्री. भाऊसाहेबांच्या घरीं तार करून व चहा वगैरे घेऊन आम्ही अलाहाबादेस निघालों. अलाहाबादेस आम्ही १२ वाजतां पोंचलों. तेथील स्टेशनवरील बाररूममध्यें जेवण घेऊन, विश्रांति न घेतां पुढील प्रवासास सुरुवात केली. फत्तेपूर, कानपूर, काल्पी ओलांडून झांशी शहरीं पोंचलों. तेथें आमचे मित्र रा. वामनराव यांजकडे रात्रींचा मुक्काम केला. श्री. भाऊसाहेबांच्या घरून आलेली सर्व मुलें खुशाल आहेत अशी तार मिळतांच, सर्वांचीं मनें प्रफुल्लित झालीं. दुसऱ्या दिवशीं सकाळीं जेवण करून आम्ही सिप्री ओलांडून, गुणा मुक्कामीं

संध्याकाळीं पोंचलों. तेथील स्टेशनवर जाऊन मागील पत्रें घेतलीं व पुढील प्रवासास सुरुवात केली. रात्र फार होऊं लागल्यामुळें सारंगपूर येथील डाक बंगल्यांत मुक्काम केला. सकाळीं उठून व न्याहारी करून आम्ही पुनः प्रवास करण्यास सुरुवात केली. पाचोरा येथें रा. देसाई यांचे मेहुणे पोस्टमास्तर आहेत. त्यांस आम्ही येत आहोंत, अशी तार केली. टोल सुरू झाला. धुळयाच्या अलीकडील टोलनाकेवाल्याशीं जरा भांडण करून सुमारें ७–३० ला धुळयास पोंचलों. तेथें, पाचोरा किती लांब आहे व रस्ता कोणता याची चौकशी केली. नंतर जळगांववरून रात्रीं ११–२५ ला पाचोरा मुक्कामीं आम्ही पोंचलों. तेथें रा. देसाई यांचे मेहुणे व त्यांची थोरली बहीण आमची वाट पाहात जागीच होती. तयार करून ठेविलेल्या जेवणाचा यथेच्छ समाचार घेऊन आम्ही गप्पा मारीत झोंपी गेलों.

सकाळीं उठून गाडीची साफसुफी केली. आमच्या जवळील पैसे संपल्यामुळें, रा. जोशी यांस "तारेनें पैसे पाठवून द्या," अशी तार मुंबईस केली. तोंपर्यंत जेवण वगैरे आटोपून, जवळ असलेली अजिन्ठा लेणी, औरंगाबाद, वेरूळ, दौलताबाद वगैरे स्थळें पाहण्याचें ठरविलें, पैसे आल्यावर आम्ही निघालों.

सुमारें ५ वाजतां अजिन्ठा लेण्याच्या पायथ्याशीं आम्ही पोंचलों. तेथील रखवालदार निघून गेला आहे असें आम्हांस कळलें. तरी आम्ही वर जाऊन सर्व लेणीं पाहिलीं. हीं लेणीं अजिन्ठा डोंगरांत फार पुरातन काळीं कोरलेलीं आहेत. आंतील भागांत गौतम बुद्धाच्या व इतर रंगीबेरंगी चित्रांनीं रंगविलेल्या भिंती आहेत. कांहीं ठिकाणीं पाण्याचीं तळीं आहेत. देखावा फारच रमणीय दिसतो.

हा प्रदेश निजाम सरकारच्या ताब्यांत असून, व्यवस्था फारच उत्तम ठेवलेली आहे. जवळ डाक बंगला आहे. लेणीं सकाळीं ९ पासून संध्याकाळीं ४ पर्यंत उघडीं असतात येथून औरंगाबाद ६० मैल आहे. त्या रस्त्याकडे आम्हीं आमचा मोर्चा वळविला. वाटेंत ५९ मैलांवर अजिंठा घाट लागला. काळोख पडूं लागला. थंडी बेताबाताची वाजूं लागली. रात्रीं ९ च्या सुमारास औरंगाबादेंत प्रवेश करून तेथील डाक बंगल्यांत रात्रीचा मुक्काम केला.

सकाळीं सामानसुमान बांधून व डाक बंगल्याचे पैसे देऊन औरंगाबाद शहर पाहण्यास गेलों. श्री. भाऊसाहेबांनीं पूर्वी हें शहर पाहिलेलें असल्यामुळें त्यांनीं आम्हांस सर्व माहिती दिली.

औरंगाबाद

हें मोगलाईंत असून उत्तम शहर आहे. सफेती दिलेलीं घरें दुतर्फा दृष्टीस पडतात. आम्ही औरंगजेब बादशहाच्या बायकोची कबर पाहण्यास गेलों. त्यांस **बिबी मुखीरा,** किंवा **मुखबर** म्हणतात. ही इमारत चुन्याची वनविलेली ताजमहालची हुबेहूब दुसरी प्रतिमा आहे. ताजमहाल संगमरवरी दगडाचा आहे व ही चुन्याची आहे. एवढाच काय तो फरक. मध्यभागीं औरंगजेब बादशहाची बायको, **राब्या दौराणी** हिची कबर आहे. येथें ती निजधामास गेल्यामुळें तिला तेथें पुरण्यांत आलें. मुख्य कबर संगमरवरी दगडांची असून अष्टकोनी आहे. जवळच प्रार्थना–मंदिर आहे. आजुबाजूस गुलाबांची सुंदर बाग असून, लहान लहान पाण्याचीं कारंजीं आहेत. हें पाणी कोठून येतें याचा शोध अजून इंजिनीयर लोकांस लागला नाहीं. येथें पाण्याचे ३२ नळ होते, आतां फक्त १३ राहिले आहेत. जवळच पवनबावडी पाहण्यासारखी असून स्थापत्य कलेचा उत्तम नमुना आहे. मलिकंबरानें ती योजना केली आहे असें म्हणतात. नंतर ८ मैलांवर असलेला दौलताबादेचा किल्ला पाहण्यास निघालों. मैल दर्शविणारे पिवळे दगड दिसूं लागले. ३ न्या पिवळ्या दगडापाशीं **मिटमिटा** खेडेगांव लागलें. गप्पा मारीत दौलताबाद गांवांत आम्हीं प्रवेश करून किल्ल्याच्या पायथ्याशीं गाडी उभी केली.

दौलताबाद

दौलताबाद हें फार पुरातन पण लहान गांव आहे. गांवाभोंवतीं तट बांधिला आहे. तेथें डाक बंगला किल्ल्याच्या पायथ्याशीं आहे. संत्रीं व पपया घेऊन किल्ला पाहण्यास आम्ही निघालों, तोंच वारकरी व आंधळे टाळ वाजवून

" विठोबा तुझा मला छंद। कपाळीं केशरी गंध॥ "

असें गाणें गात असलेले दिसले. त्यांस पैसा पैसा देऊन, किल्ल्याच्या दरवाज्यापाशीं आलों. तेथील निजामशाही शिपाई जांभया देत बसले होते. त्यांनीं आमचा साहेबी पोषाख पाहून, ताबडतोब आपली निजामशाही पगडी धांदलीनें डोक्यावर चढवून, आम्हांस एकदम सॅल्यूट ठोकला!

त्यांपैकीं एकानें पेन्सिल, चाकू व काड्याची पेटी आम्हीं घेऊन जाऊं नये म्हणून मोठ्या नम्रतेनें आम्हांस विनंति केली. मला नोटस् घ्यावयाच्या होत्या, म्हणून पेन्सिल मोज्यामध्यें लपवून मीं ती बरोबर नेली.

किल्ला डोंगरी असून दगडामातीच्या तीन तटांनीं वेष्टिला आहे. दगडामातीचा बांधिलेला हा किल्ला जणूं पोलादाचें पाणी पिऊन बळकट बनलेला आहे असें वाटतें. दरवाज्याच्या उजव्या बाजूस गंजलेल्या जुन्या तोफा, तरवारी व ढाला लटकविलेल्या आहेत. दुसऱ्या तटाच्या जवळ, दरवाज्यापाशीं तंबाखूचें फार पुरातन कोठार आहे. तेथें अजून जमीन उकरल्यास तंबाखू सांपडते व त्याप्रमाणें जमीन पोखरून थोडी तंबाखू आम्हीं बरोबर घेतली. उजव्या बाजूस अदमासें २०० फूट उंचीचा, शत्रूची टेहळणी करण्याकरितां बांधिलेला मनोरा आहे. त्यास '**चंद मिनार**' म्हणतात. आंत मधमाशांचीं पुष्कळ पोळीं असल्यामुळें आम्ही वर गेलों नाहीं. पुन्हां डाव्या बाजूस **हत्ती हौद** व **जुम्मा मशीद** आहेत. थोडें पुढें चढून गेल्यावर पडक्या स्थितींत **चिनी महाल** लागतो. तेथील बुरुजावर **मेन्धा** नांवाची १० हात लांब व १½ फूट रुंद तोंडाची तोफ आहे. तिच्या मागील बाजूस मेंढ्याचें तोंड काढिलें आहे. त्या तोफेवर उर्दूमध्यें महमद हुसेन, शकीब लोफन, अबुलफजल, उद्दीन मोये महमंद, औरंगजेब बादशहा अशीं अक्षरें

कोरलीं आहेत. पुढें **रंगमहाल** लागतो. त्या रंगमहालाच्या नुसत्या भिंतीच दिसतात. नंतर तिसरा तट लागतो. त्या तटाभोंवतीं म्हणजे किल्ल्याच्या मुख्य आवाराभोंवतीं पाण्यानीं तुडुंब भरलेला खंदक आहे. खंदक ओलांडल्या-वर डोंगर पोखरून शत्रूला शह देण्यासाठीं अनेक धोक्याच्या जागा–चोरवाटा काढिल्या आहेत. त्यांतून शत्रूस वाट सांपडणें फारच कठीण. आंतील भागांत खूप काळोख आहे. मशाली पेटवून आम्ही आंतील सर्व भाग पाहात, किल्ल्याच्या मुख्य इमारतीकडे जाण्यास निघालों. जवळच गणपतीचें देऊळ मोडून तेथें कबरस्तान केलेली छोटीशी पडकी इमारत लागली. एक जुनी फिरती ८ फूट लांबीची तोफ होती ती आम्हीं फिरवून जरा गंमत केली.

नंतर **बाला हिसारी**जवळ श्री संतशिरोमणि एकनाथ महाराजांचें गुरु श्री जनार्दन**स्वामी** यांची समाधि पाहण्यास निघालों. डोंगराच्या दगडी माथ्यावर असलेल्या तळ्यांतील पाण्यांत हातपाय धुऊन थोडीं संत्रें खाल्लीं. श्री जनार्दनस्वामींच्या समाधीची जागा डोंगरांत कोरलेली असून तेथें निबिड काळोख असतो. त्या शांत जागीं श्री दत्तमहाराज व श्री जनार्दनस्वामी यांच्या पादुका आहेत. आम्हीं घेतलेलीं फुलें, मिणमिण जळत असलेल्या पणतीच्या उजेडाच्या साहचानें, मोठ्या मनोभावानें व भक्तिपूर्वक अर्पण करून, पादुकांचें दर्शन घेतलें. एकादशीमुळें आज दर्शनास फार गर्दी होती. पवित्र पुण्यशील पुरुषांच्या समाधीचें एकादशीच्या दिवशीं दर्शन घडलें म्हणून आम्हांस फारच आनंद वाटला. दर्शन घेऊन किल्ल्याच्या माथ्यावरील इमारत पाहून तेथील तोफेजवळ जरा विश्रांति घेतली. या तोफेचें नांव '**श्री दुर्गा**' असून ती १४ हात लांब आहे. तीस कोणी धुळधाणही म्हणतात. तेथें बसून बरोबर आणिलेल्या संत्र्यांचा व पोपयांचा समाचार घेतला. किल्ला हंसत खेळत उतरून आम्ही १० मैलांवर असलेलीं वेरूळचीं लेणीं पाहण्यास गेलों. पांचव्या मैलांवर **खुलदाबाद** लागलें. येथें औरंगजेब बादशहाची कबर आहे. वाटेंत घाट लागून, काजीपूर, निजामउद्दीन दर्गा, नद्राबाद वगैरे खेडीं लागतात. आम्ही वेरूळच्या लेण्याजवळ १२–१५ ला पोंचलों.

वेरूळचीं लेणीं

हीं लेणीं डोंगरांत कोरलेलीं असून, त्यांचे तीन विभाग निरनिराळ्या तीन धर्मांचे आहेत. (१) **बुद्ध**, (२) **ब्राह्मण**, (३) **जैन**, एकंदर लेणीं ३५ असून त्यांची लांबी सुमारें दोन मैलांपर्यंत आहे. खालील लेणीं मुख्य आहेत :—

घेडवाडा, पारसनाथ, जगन्नाथसभा, इंद्रसभा, छोटा कैलास, सीतेची आंघोळीची जागा, द्वारपाल, जनवासा, दुधवालीचें लेणें, रामेश्वर, कैलास, रंगमहाल, दासअवतार, रावण काकै, तीन महाल, दुधाल, विश्वकर्मा; महारवाडा. नंतर भूक लागल्यामुळें आम्ही थोडे लाडू वगैरे खाऊन तेथील थंडगार टाक्यांतील पाणी प्यालों. माहिती देणारा गाईड यांस पैसे देऊन आम्ही पैठणास जाण्यास निघालों. वेरूळ हें लहानसें खेडें असून तेथें अहिल्याबाईनें बांधिलेला मोठा सुंदर घाट आहे.

आम्हीं पुन्हां औरंगाबाद रस्त्यानें परत येऊन, पैठणच्या रस्त्यानें प्रवासास सुरुवात केली. दुपारीं ५ वाजतां पैठणास पोंचलों. तेथील श्री एकनाथ महाराजांच्या पादुकांचें व ते ज्याची पूजा करीत त्या देवाचें दर्शन घेऊन श्री ज्ञानदेवांनीं ज्या ठिकाणीं रेड्याकडून वेद म्हणविले, तें ठिकाण पाहण्यास आम्ही गेलों. त्या ठिकाणीं रेडा कोरलेला एक दगड दिसला. नंतर घाट पाहून परत आलों. येथें गोदावरी नदी असून तीस तेथील लोक गंगा म्हणतात. पैठणांत भटभिक्षुकांचा फारच सुळसुळाट आहे. त्यांनीं आमच्याभोंवतीं गराडा घालून भिक्षेची याचना केली. आम्हांस नदी ओलांडून जावयाचें असल्यामुळें, एंजिनमध्यें पाणी शिरूं नये म्हणून, एंजिन काढून सामानसुमान नीट ठेवलें. गाडी ओढण्यास बैल लाविले. अर्धी नदी ओलांडून गेल्यावर बैलांना गाडी ओढवेना. सहा बैल लाविले तरी गाडी हलेना. रात्र होऊन थंडी खूप वाजूं लागली. रा. देसाई व नारायणराव शेकोटी करून शेकत बसले. निजामाचें राज्य असल्यामुळें येथें परक्यांचा झाडा घेतात. त्याप्रमाणें दोन मुसलमान आमचा झाडा घेण्यास आले. पण आमचा पोषाख व साहेबी रुबाब पाहून ते दचकले. विशेषतः रा. देसाई यांच्या कोटावर असलेल्या बॅजिस् पाहून व

रा. भाऊसाहेबांची भव्य मूर्ति पाहून, "आपण ब्रिटिश ऑफिसर आहांत कां?" म्हणून त्यांनीं आम्हांस विचारिलें. श्री. भाऊसाहेब व रा. देसाई 'होय' म्हणाले, तेव्हां ते मुसलमान निघून गेले. जाण्यापूर्वीं त्यांस आम्हीं थोडीशी दक्षिणा दिली.

आमची गाडी पाण्यांत जवळ जवळ दोन तास अडकून बसली. नंतर नेहमीं मोटार गाड्या ओढून नेणारा माणूस आला. त्याचे दोन बैल लागतांच गाडी बाहेर निघाली. रात्रीचें सुमारें ११ वाजले होते. नंतर गाडीचें एंजिन बसवून आम्ही पुण्याचा मार्ग धरिला. विश्रांति व झोंप न घेतां आम्ही ता. १३ शनिवारीं सकाळीं पहांटे पुण्यास आलों. मला पुण्यास सोडून, जेवण वगैरे घेऊन रा. भाऊसाहेब, देसाई व रा. नारायणराव आळंदीहून मुंबईस त्याच रात्रीं १० ला सुखरूप पोहोंचलें.

(इति कलकत्ता प्रवासवर्णनम् समाप्तम्)

मुंबई ते कलकत्ता

गांवांमधील अंतर

मुंबई	ते	ठाणा	२४	मैल
ठाणा	,,	नाशिक	७५	,,
नाशिक	,,	मालेगांव	६८	,,
मालेगांव	,,	धुळें	३१	,,
धुळें	,,	सोनगीर	१३	,,
सोनगीर	,,	महू	११६	,,
महू	,,	इंदूर	१२	,,
इंदूर	,,	गुणा	१८२	,,
गुणा	,,	बादुरा	३०	,,
बादुरा	,,	शिवपुरी	३२	,,
शिवपुरी	,,	झांशी	६०	,,
झांशी	,,	मोथ	३२	,,
मोथ	,,	ओराई	३८	,,
ओराई	,,	काल्पी	२६	,,
काल्पी	,,	कानपूर	४४	,,

कानपूर	ते	फत्तेपूर	५०	मैल
फत्तेपूर	,,	रवागा	२१	,,
रवागा	,,	अलाहाबाद	५४	,,
अलाहाबाद	,,	बनारस	७९	,,
बनारस	,,	देहरी आन शोण	८३	,,
देहरी	,,	औरंगाबाद	२७	,,
औरंगाबाद	,,	शेरकाटी	३०	,,
शेरकाटी	,,	धोबी	७	,,
शेरकटी	,,	गया	२१	,,
धोबी	,,	चोपरान	२७	,,
चोपरान	,,	बिहारी	३०	,,
बिहारी	,,	बगोदर	३२	,,
बगोदर	,,	असन्सुल	८१	,,
असन्सुल	,,	बरद्वान	५३	,,
बरद्वान	,,	कलकत्ता	७५	,,

पुढील प्रकाशनें

मुंबई ते रामेश्वर व मद्रास

(मोटारचा प्रवास : वर्णन)

सिताराम
(अभिनव लघुकथा संग्रह)

पंचारती
(नावीन्यपूर्ण कवितासंग्रह)

लौकरच प्रसिद्ध होणार.

१२४८ शुक्रवार पेठ,
पुणें २

केशवराव शिरोळे,
बी. ए., बी. टी.